दैनिक

# संध्या

नि:पक्ष समीक्षणाचे....निर्भीड दैनिक

७० वर्ष निर्भीड पत्रकारीतेची

शुक्रवार, दि. २२ मे २०२६

www.dainikesandhya.com www.youtube.com/@sandhyalivenews

संस्थापक : कै. वसंत काणे | नोंदणी क्रमांक : १६६३/१९५७ | पुणे आवृत्ती | पाने : ८ | अंक : १४६ | Gmail : news.sandhya@gmail.com | किंमत : ७ रूपये


# जास्तीत जास्त शेतकऱ्यांना कर्ज देण्याचा प्रयत्न

## कुठल्याही शेतकऱ्याची सिबीलसाठी अडवणूक करायची नाही, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांचे बँकांना आदेश

मुंबई (दै. संध्या)



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली सह्याद्री अतिथीगृहात शेतकऱ्यांच्या कर्जमाफी संदर्भात बैठक पार पडली. या बैठकीत अनेक शेतकऱ्यांच्या तसेच शेतीच्या अनेक विषयांवर चर्चा करण्यात आल्याची माहिती फडणवीस यांनी दिली आहे. तसेच जास्तीत जास्त शेतकऱ्यांना कर्जमाफी कर्ज कसे मिळू शकेल यावर विशेष भर दिल्याचे त्यांनी सांगितले आहे. तसेच कोणत्याही शेतकऱ्याची सीबीलसाठी अडवणूक करायची नाही, असे आदेशही त्यांनी बँकांना दिले आहेत. देवेंद्र फडणवीस म्हणाले, एचएसबीसीच्या बैठकीत एकूण कर्ज वाटपाच्या संदर्भात चर्चा झाली आणि जास्तीत जास्त शेतकऱ्यांना कर्ज कसे मिळू शकेल या संदर्भात तजवीज करण्यात आली. विशेषतः असे लक्षात आले की, साधारणपणे आपल्या ज्या जिल्हा सहकारी बँक आहेत आणि ग्रामीण बँक, या मिळून 67 टक्के शेतकऱ्यांना कर्ज दिले जाते आणि राष्ट्रीयकृत बँका या 26 टक्के शेतकऱ्यांना फक्त कर्ज देतात.

पुढे बोलताना देवेंद्र फडणवीस म्हणाले, डीसीसीचे जे काही टार्गेट अचिव्हमेंट आहे ते 80 टक्क्यांच्या वर आहे. मात्र राष्ट्रीयकृत बँकांचे मात्र 67 टक्के आहे. त्यामुळे आज अतिशय कडक शब्दांत राष्ट्रीयकृत बँकांना असे सांगण्यात आले आहे की त्यांनी 80 टक्क्यांच्या वर टार्गेट पूर्ण केले पाहिजे. दुसरे त्यांना हे सांगण्यात आले आहे की सीबीलची मागणी केली जाऊ नये. या संदर्भात मी सगळ्या बँकांना सांगितले आहे की हेडक्वार्टरमधून प्रत्येक ब्रांचला त्यांनी पत्र पाठवून सांगितले पाहिजे की क्रॉप लोडसाठी सीबीलची आवश्यकता नाही. तसेच सीबीलसाठी कुठल्याही शेतकऱ्याची अडवणूक करायची नाही. या संदर्भात आज आपण आदेश काढले आहेत. यासोबतच या बँकांसोबत कर्ज माफीच्या संदर्भात आम्ही चर्चा केली आहे. जी काही कर्ज माफी करायची आहे त्या संदर्भात जुन्या खात्यांवर जो काही त्यांना कट घ्यायचा असतो त्या संदर्भात आणि एकूण कर्जमाफीची माहिती ही कुठल्या फॉरमॅटमध्ये त्यांनी द्यायची, कुठल्या फॉरमॅटमध्ये आम्ही ती करायची, याबाबत चर्चा झाल्याची माहिती देवेंद्र फडणवीस यांनी दिली आहे. देवेंद्र फडणवीस म्हणाले, आपल्याला कल्पना आहे की महाराष्ट्रात विशेषतः सगळ्यात मोठा हंगाम हा खरीपाचा असतो, त्यानंतर रबी आणि उन्हाळी पीक लोक घेतात. साधारणपणे खरीपाचे जे क्षेत्र आहे ते 152 लाख हेक्टरचे क्षेत्र आहे आणि यात साधारणपणे सगळ्यात मोठे क्षेत्र हे सोयाबीन आणि कापूस जवळपास 88 लाख हेक्टर त्या ठिकाणी असते. आत्ता जो काही या वर्षीचा खरीप हंगाम आहे यात मोठे संकट आहे ते अल निनोचे संकट आहे. आज हवामान खात्याने जी काही मांडणी केली आहे त्यात जे काही लॉन्ग टर्म ॲवरेज आहे पावसाचे ते 88 टक्के असेल, असा अंदाज त्यांनी वर्तवला आहे.


### उतरत्या क्रमाने पाऊस असण्याची शक्यता

आजच्या खरीप हंगामच्या बैठीत आपल्याला हवामानाच्या अंदाजानुसार प्लॅनिंग कसे करता येईल हा प्रयत्न आपण केला आहे. विशेषतः साधारणपणे उतरत्या क्रमाने पाऊस असण्याची शक्यता जास्त आहे. जूनमध्ये येईल, त्या पेक्षा कमी जुलैमध्ये, त्यापेक्षा कमी ऑगस्टमध्ये आणि त्यापेक्षा कमी सप्टेंबरमध्ये असेल हा प्राथमिक अंदाज आहे. पावसाच्या दोन दिवसांमध्येही अंतर येण्याची शक्यता आहे आणि याचा परिणाम पिकांवर होऊ शकतो. त्यामुळे पडलेला पाऊस थांबवू शकलो तर त्यात प्रोटेक्टिव्ह इरीगेशन करता येईल, असे देवेंद्र फडणवीस म्हणाले.

# पुणे रेल्वे स्थानकाजवळ मोठा छापा!

## वन्यजीव तस्करीचे आंतरराष्ट्रीय रॅकेट उघड; वन विभागाकडे तपास सुपूर्द

पुणे (दै. संध्या)




पुणे रेल्वे स्थानक परिसरात महसूल गुप्तचर संचालनालयाने मोठी कारवाई करत प्रतिबंधित वन्यजीव प्रजातींच्या तस्करीचा पर्दाफाश केला आहे. या कारवाईत दोन संशयितांना ताब्यात घेण्यात आले असून त्यांच्याकडून दुर्मिळ आणि संरक्षित वन्यजीव जप्त करण्यात आले आहेत. या घटनेमुळे पुण्यात खळबळ उडाली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, गुप्त माहितीच्या आधारे महसूल गुप्तचर संचालनालयाच्या पुणे प्रादेशिक पथकाने 20 मे रोजी संशयितांवर पाळत ठेवून कारवाई केली. पुणे रेल्वे स्थानकाजवळ प्रतिबंधित वन्यजीव प्रजातींचा अवैध ताबा आणि विक्रीचा प्रयत्न होत असल्याची माहिती मिळाल्यानंतर ही कारवाई करण्यात आली. तपासादरम्यान पहिल्या संशयिताकडून दोन कागदी बॉक्समध्ये लपवून ठेवलेल्या 3 जिवंत मलबार जायंट स्क्विरल (शेकरू) आढळून आल्या. त्यानंतर दुसऱ्या कारवाईत आणखी एका संशयिताला ताब्यात घेण्यात आले. त्याच्याकडून 7 जिवंत इंडियन स्टार कासव जप्त करण्यात आले. जप्त केलेले सर्व वन्यजीव, आरोपी आणि संबंधित साहित्य पुढील कायदेशीर कारवाईसाठी पुणे वन विभागाकडे सुपूर्द करण्यात आले आहे. दोन्ही संशयितांची चौकशी सुरू असून या तस्करीमागील मोठे रॅकेट आहे का, याचा तपास केला जात आहे. मलबार जायंट स्क्विरल आणि इंडियन स्टार टॉर्टोईज या दोन्ही प्रजाती वन्यजीव संरक्षण कायदा 1972 अंतर्गत अनुसूची-1 मध्ये समाविष्ट आहेत. त्यामुळे या प्रजातींना सर्वोच्च कायदेशीर संरक्षण देण्यात आले आहे. त्यांची शिकार, वाहतूक, ताबा किंवा विक्री करणे कायद्याने गुन्हा मानला जातो. महसूल गुप्तचर संचालनालयाकडून वन्यजीव तस्करी आणि शिकारीविरोधात सातत्याने कारवाया सुरू असून पर्यावरण आणि जैवविविधता संरक्षणासाठी अशा कारवाया अधिक कडक करण्यात येणार असल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले आहे.

# विकास लवांडेंना अखेर अटक

## वारकरी संप्रदायावरील वक्तव्य भोवले; अंतरिम अटकपूर्व जामीन रद्द होताच पोलिसांची कारवाई

मुंबई (दै. संध्या)



राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रवक्ते विकास लवांडे यांना अखेर पोलिसांनी अटक केली आहे. वारकरी संप्रदायाबाबत केलेल्या वादग्रस्त वक्तव्याप्रकरणी दाखल गुन्ह्यात पुणे न्यायालयाने त्यांचा अंतरिम अटकपूर्व जामीन रद्द केल्यानंतर ही कारवाई करण्यात आली. न्यायालयाने मुदतवाढीचा अर्ज फेटाळून लवांडे यांचे संरक्षण काढून घेतल्याने वाघोली पोलिसांनी त्यांना ताब्यात घेतले. या प्रकरणामुळे राजकीय आणि वारकरी वर्तुळात मोठी चर्चा रंगली आहे.

वारकरी संप्रदायात घुसखोरी होत असल्याचा दावा विकास लवांडे यांनी केल्याचा आरोप होता. या वक्तव्याविरोधात नलिनी आशिष वायाळ (वय 41, रा. येरवडा) यांनी वाघोली पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली होती. त्यानंतर लवांडे यांच्याविरोधात गुन्हा नोंदवण्यात आला होता. या प्रकरणात अतिरिक्त सत्र न्यायालयाने यापूर्वी 20 मेपर्यंत अंतरिम अटकपूर्व जामीन मंजूर केला होता. तसेच तपास अधिकारी, सरकार पक्ष आणि वाघोली पोलिसांना याबाबत भूमिका मांडण्याचे निर्देशही देण्यात आले होते.

दरम्यान, तपासादरम्यान विकास लवांडे यांनी अटकपूर्व जामिनाच्या अर्जात स्वतःविरोधातील पूर्वी दाखल असलेल्या 4 गुन्ह्यांची माहिती लपविल्याचे समोर आले. सरकारी वकील राजेश कावेडिया यांनी न्यायालयात यावर जोरदार आक्षेप घेत लवांडे यांचे संरक्षण रद्द करण्याची मागणी केली. न्यायालयाने हा युक्तिवाद ग्राह्य धरत त्यांचा अंतरिम अटकपूर्व जामीन रद्द केला. न्यायालयाच्या निर्णयानंतर पोलिसांनी तत्काळ हालचाली करत लवांडे यांना अटक केली.

# संतोष देशमुख हत्या प्रकरण : वाल्मीक कराड गँगची कोर्टात मुजोरी

## *सुनावणीवेळी जजसमोर उडवली 'कॉलर'; पुढील सुनावणी ४ जूनला*



बीड (दै. संध्या)

मस्साजोग येथील सरपंच संतोष देशमुख यांच्या खून प्रकरणातील आरोपींची मुजोरी तुरुंगात गेल्यानंतरही तसूभरही कमी झालेली नाही. आरोपींना आज सुनावणीसाठी न्यायालयासमोर हजर करण्यात आले होते. यावेळी त्यांनी कायद्याचा वा न्यायालयाचा कोणताही धाक उरला नसलेले संतापजनक वर्तन केल्याचे समोर आले. व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे कोर्टासमोर हजर केलेले असताना आरोपींनी थेट स्क्रीनवर कॉलर उडवून दाखवल्याची धक्कादायक घटना घडली. आरोपींच्या या उद्धट वर्तनामुळे आज दिवसभर बीडच्या न्यायालयीन आणि राजकीय वर्तुळात तीव्र संतापासह उलट-सुलट चर्चा रंगली होती. या प्रकरणाची पुढील सुनावणी आता ४ जून २०२६ रोजी निश्चित करण्यात आली आहे.

संतोष देशमुख हत्या खटल्याची नियमित सुनावणी आज न्यायालयात पार पडली. सुरक्षेच्या कारणास्तव कारागृहातून सर्व आरोपींना व्हिडिओ कॉन्फरन्सिंग प्रणालीद्वारे न्यायाधीशांसमोर सादर करण्यात आले होते. मात्र, न्यायालयीन प्रक्रियेचे गांभीर्य आणि आदर बाजूला ठेवून आरोपींनी थेट कॅमेऱ्यासमोर आपली कॉलर उडवून दाखवत एक प्रकारे मुजोरीचे प्रदर्शन केले. आरोपींचे हे निर्ढावलेले कृत्य पाहून सुनावेळी उपस्थित वकील, पोलीस आणि उपस्थित नागरिक अवाक झाले.

आरोपींच्या या कृत्यावर मृत सरपंच संतोष देशमुख यांचे बंधू धनंजय देशमुख यांनी तीव्र संताप व्यक्त केला आहे. "या नराधम आरोपींना आपण केलेल्या अमानुष कृत्याचा यत्किंचितही पश्चाताप झालेला नाही, हेच आज पुन्हा सिद्ध झाले. त्यांची आजची उद्धट वागणूक सन्माननीय न्यायाधीश महोदय आणि आम्ही सर्वांनी डोळ्यांनी पाहिली आहे. हे आरोपी किती भयंकर आणि निर्ढावलेले आहेत, हे स्पष्ट होते. त्यामुळे न्यायाधीशांनी या वर्तनाची अधिकृतपणे केस डायरी, चार्जशीट आणि कोर्टाच्या रेकॉर्डवर नोंद करावी, अशी आमची विनंती आहे," असे धनंजय देशमुख म्हणाले.

दुसरीकडे, आरोपींच्या वकिलांनी न्यायालयीन प्रक्रियेला लांबवण्यासाठी पुन्हा एकदा 'लॅपटॉप'चा तोच जुना तांत्रिक मुद्दा पुढे करत वेळकाढूपणा करण्याचा प्रयत्न केल्याचा थेट आरोप धनंजय देशमुख यांनी केला आहे.

आजच्या खटल्याच्या कामकाजादरम्यान इतरही अनेक महत्त्वाच्या घडामोडी घडल्या. या प्रकरणातील प्रमुख आरोपी जयराम चाटे याने न्यायालयात जामीन अर्ज दाखल केला होता. या अर्जावर आज सरकारी पक्षाच्या वतीने न्यायालयात भक्कमपणे कायदेशीर म्हणणे मांडण्यात आले. या संदर्भात माहिती देताना सरकारी पक्षाचे वकील ॲड. बाळासाहेब कोल्हे यांनी सांगितले की, आरोपी विष्णू चाटे याच्या वतीने न्यायालयात एक विशेष अर्ज सादर करण्यात येणार असल्याचे त्यांच्या वकिलांनी सांगितले होते. मात्र, कोर्टाची वेळ संपेपर्यंत प्रत्यक्षात असा कोणताही अधिकृत अर्ज आरोपींच्या बाजूने न्यायालयात सादर करण्यात आलेला नव्हता.

### आता ४ जूनच्या सुनावणीकडे लक्ष

आरोपींच्या या उद्दाम वर्तनानंतर त्यांच्यावर अधिक कडक कारवाई करण्याची मागणी जोर धरत आहे. न्यायालयाने या प्रकरणाची पुढील सुनावणी आता ४ जून रोजी निश्चित केली आहे. त्यामुळे पुढील तारखेला न्यायालय या मुजोरीची दखल कशी घेते, याकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.


क्युआर स्कॅन करून दै. संध्याच्या युट्युब चॅनलला सबस्क्राईब करा

SUBSCRIBE

www.sandhyaepaper.com


### ढिंग-टांग




## रेल्वे भरती २००८ च्या आंदोलन प्रकरणी ठाणे सत्र न्यायालयाचा निकाल

# राज ठाकरेंची निर्दोष मुक्तता

ठाणे (दै. संध्या)

■ चिथावणीखोर भाषण केल्याचा होता आरोप



महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांची रेल्वे भरती आंदोलन प्रकरणी निर्दोष मुक्तता करण्यात आली आहे. ठाणे सत्र न्यायालयाने हा महत्त्वपूर्ण निकाल दिला आहे. 2008 साली रेल्वे भरतीच्या वेळी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या कार्यकर्त्यांनी आंदोलन केले होते. तसेच राज ठाकरे यांच्यावर चिथावणीखोर भाषण केल्याचा आरोप करण्यात आला होता. मात्र या प्रकरणातून राज ठाकरे यांची निर्दोष मुक्तता करण्यात आली आहे.

या संदर्भात वकिलांनी दिलेल्या माहितीनुसार, पुरावे आढळून न आल्याने या प्रकरणातील सर्वच आरोपींना निर्दोष मुक्त करण्यात आले आहे. तसेच सादर करण्यात आलेल्या सीडीला काडीचीही किंमत नसल्याचे न्यायालयाने म्हटले आहे. तसेच राज ठाकरे यांनी प्रक्षोभक भाषण केल्याचे देखील पुरावे सरकारी पक्षाला सादर करता आले नाहीत. तसेच परप्रांतीय विद्यार्थ्यांना मारहाण करणारे मनसैनिक होते हे देखील सिद्ध करता आले नाही.

मागील सुनावणीच्या वेळी (13 मे) राज ठाकरे उपस्थित होते. यावेळी देखील राज ठाकरे यांनी माझ्यावर लावण्यात आलेले आरोप मान्य नसल्याचे त्यांनी म्हटले होते. 'माझा या गुन्ह्याशी संबंध नाही' असे त्यांनी न्यायालयात म्हटले होते. त्यानंतर आजच्या निकालाच्या दिवशी राज ठाकरे उपस्थित होते. यावेळी अनेक कार्यकर्ते तसेच अविनाश जाधव देखील उपस्थित होते.

2008 मध्ये कल्याण रेल्वे स्थानकावर पार पडलेल्या रेल्वे भरतीदरम्यान, 'मराठी तरुणांच्या नोकऱ्या परप्रांतीयांनी हिरावल्या' असा आरोप करत मनसे कार्यकर्त्यांनी उत्तर भारतीय उमेदवारांना मारहाण करून रेल्वेच्या मालमत्तेचे मोठे नुकसान केल्याचा आरोप होता. या आंदोलनाद्वारे परप्रांतीयांना लक्ष्य करून हिंसाचाराला प्रोत्साहन दिल्याचा ठपका ठेवत, या प्रकरणी मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांच्यासह एकूण सात जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला होता.

2008 च्या ऑक्टोबर महिन्यात देशभरात रेल्वे भरतीची चाचणी परीक्षा घेण्यात आली होती. मुंबई केंद्रावर परीक्षा द्यायला आलेल्या उत्तर भारतीय विद्यार्थ्यांची संख्या जास्त होती. त्यातच राज्यातील अनेक केंद्रांवर मराठी तरुणांना तिकीट न मिळाल्याचे प्रकरण समोर आले होते तसेच मराठी तरुणांना प्रवेश देखील नाकारण्यात आल्याचा आरोप करण्यात आला होता.

वादाची ठिणगी पडताच आक्रमक झालेल्या मनसे कार्यकर्त्यांनी थेट परीक्षा केंद्रांमध्ये घुसून उत्तर भारतीय परीक्षार्थींना मारहाण केली आणि केंद्रांची मोठी तोडफोड केली. या घटनेनंतर हिंसक आंदोलनाचे हे लोण संपूर्ण महाराष्ट्रभर पसरले, ज्यामध्ये राज्यभरात ठिकठिकाणी उत्तर भारतीयांना लक्ष्य करून मारहाण करण्यात आली आणि मोठ्या प्रमाणावर सार्वजनिक बसेसचीही तोडफोड करण्यात आली.

# आजपासून 'पुरंदर कृषी एक्स्पो २०२६'

## १६० व्यावसायिक स्टॉल्स, आधुनिक तंत्रज्ञान आणि ट्रॅक्टरचे बंपर बक्षीस; शेतकऱ्यांचे वेधले लक्ष





"पुरंदर आणि परिसरातील शेतकऱ्यांना आधुनिक शेतीची योग्य दिशा मिळावी, तसेच जागतिक पातळीवरील नवीन तंत्रज्ञानाची माहिती एकाच छताखाली उपलब्ध व्हावी, हाच या प्रदर्शनाचा मुख्य उद्देश आहे."

**- संजय जगताप, माजी आमदार (आयोजक)**

सासवड (दै. संध्या) :

सासवड येथील शरद कृषी व पर्यावरण विकास प्रतिष्ठानच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या भव्य 'पुरंदर कृषी एक्स्पो २०२६'ची तयारी आता पूर्ण झाली आहे. प्रदर्शनस्थळी स्टॉल उभारणी, आधुनिक यंत्रसामग्रीची मांडणी आणि विविध विभागांचे सजावटीचे काम युद्धपातळीवर अंतिम टप्प्यात आले आहे. २२ ते २५ मे दरम्यान सासवड येथील शिवाजी इंग्लिश मीडियम स्कूलच्या मैदानावर होणाऱ्या या भव्य कृषी प्रदर्शनाकडे संपूर्ण जिल्हयातील शेतकरी, कृषी उद्योजक आणि नागरिकांचे लक्ष लागले आहे. या चार दिवसीय कृषी महोत्सवात आधुनिक कृषी तंत्रज्ञान, एआय आधारित शेती उपाय, ड्रोन फवारणीची थेट प्रात्यक्षिके, आधुनिक कृषी यंत्रसामग्री, बियाणे, खते, प्रगत सिंचन व्यवस्था, पशुपालन तसेच महिला बचत गटांच्या उत्पादनांचे स्टॉल्स सज्ज करण्यात येत आहेत. तब्बल १६० व्यावसायिक स्टॉल्स आणि ५० महिला बचत गटांचे स्टॉल्स हे या प्रदर्शनाचे प्रमुख आकर्षण ठरणार आहेत. प्रदर्शनाच्या पार्श्वभूमीवर मैदानावर भव्य विद्युत व्यवस्था, विस्तीर्ण पार्किंग, चोख सुरक्षा, पिण्याच्या पाण्याची सुविधा तसेच शेतकऱ्यांसाठी विशेष मार्गदर्शन सभागृह उभारण्यात आले आहे. महोत्सवात दररोज कृषी क्षेत्रातील तज्ज्ञांचे मार्गदर्शन, पशुधन प्रदर्शन आणि विविध कृषी स्पर्धा रंगणार आहेत. विशेष म्हणजे, प्रदर्शनात येणाऱ्या शेतकऱ्यांसाठी दररोज लकी ड्रॉद्वारे कृषी अवजारे दिली जाणार असून, शेवटच्या दिवशी ट्रॅक्टर आणि ट्रेलरचे भव्य बंपर बक्षीस ठेवण्यात आले आहे.

आयोजक माजी आमदार संजय जगताप, ग्रामीण संस्थेच्या अध्यक्षा राजवर्धिनी जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली संयोजक डॉ. एम. एस. जाधव, प्रकाश पवार, संभाजी गरुड, विलास जगताप व सहकारी जय्यत तयारी करीत आहेत.

## संपादकीय

# अमेरिका उतरणीला, तर चीन उदयाला येत आहे...

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांचा २०१७ मधील चीनचा दौरा त्यांच्या अध्यक्षीय कार्यकाळातील अत्यंत महत्त्वाचा दौरा म्हणून गणला जातो. दौऱ्यात झालेले त्यांचे भव्य स्वागत, अब्जावधी डॉलर करारांच्या घोषणा आणि 'ट्रम्प - शी जिनपिंग' यांच्यातील मैत्रीचे प्रदर्शन.. या त्यावेळच्या काही ठळक गोष्टी. चिनी माध्यमांनीदेखील ट्रम्पसारख्या प्रतिष्ठित पाहुण्यांचे स्वागत शक्तिशाली आणि आत्मविश्वासू चीन करीत आहे, असे दाखविले. हे एक अत्यंत काळजीपूर्वक आखलेले राजनैतिक नाट्य होते, ज्यातून चीनचा वाढता आत्मविश्वास आणि शी जिनपिंग यांची मजबूत राजकीय पकड जगासमोर आली. जिनपिंग शांत, संयमी आणि आत्मविश्वासपूर्ण दिसत होते, तर ट्रम्प समारंभांच्या भव्यतेने प्रभावित झालेले. जवळ-जवळ एका दशकानंतर, मागच्या आठवड्यात ट्रम्प पुन्हा चीनला गेले. जागतिक युद्धे, इंधनटंचाई, रशिया - चीनचा इराणला पाठिंबा आणि ट्रम्प सरकारने चीनवर लागू केलेले शुल्क या पार्श्वभूमीवर या भेटीदरम्यान चीनने निराळे धोरण अंगीकारले. चिनी प्रसारमाध्यमांनी या भेटीला फारसे महत्त्व दिले नाही. अमेरिकेतील प्रभावशाली उद्योगपतींच्या मोठ्या प्रतिनिधी मंडळासह झालेल्या या भेटीतून माफक आर्थिक करार निष्पन्न झाले; कोणतेही मोठे यश किंवा ठोस आश्वासने मिळाली नाहीत. ट्रम्प यांची ही भेट अत्यंत निरस आणि कंटाळवाणी ठरली. शी यांनी चीनच्या संवेदनशील बाबींवर चर्चा टाळली. तैवान, लोकशाही, मानवाधिकार याबाबतीत काही चर्चा झाल्या का, असे एका पत्रकाराने ट्रम्पना विचारल्यावर त्यांनी उत्तर देण्याचे टाळले. हे त्यांच्या स्वभावाच्या विपरीत आहे! १४ मे रोजी 'टेंपल ऑफ हेवन'च्या भेटीला प्रतीकात्मक महत्त्व होते. राष्ट्रीय समृद्धी आणि सौहार्दासाठी, प्राचीन सम्राट प्रार्थना करीत असलेल्या या ऐतिहासिक स्थळाचा उपयोग अध्यक्ष शी जिनपिंग यांनी जाणीवपूर्वक केला असावा तो ट्रम्पना 'शांतता, सौहार्द आणि सहअस्तित्व' या पारंपरिक चिनी तत्त्वज्ञानाची ओळख करून देण्यासाठी. द्विपक्षीय संबंध हे स्पर्धेवर आधारित नसून, स्थिरतेवर आधारित असायला हवेत याचा पुनरुच्चार जिनपिंग यांनी केला. प्रस्थापित आणि एका उदयोन्मुख महासत्तेमध्ये होणाऱ्या संघर्षाच्या सापळ्यात अडकण्यापासून दूर राहिले पाहिजे, असे जिनपिंग यांनी परत एकदा ठसवले. बीजिंगमध्ये झालेली बैठक केवळ द्विपक्षीय राजनैतिक भेट नाही, तर वाढत्या प्रमाणात जागतिक व्यवस्थेला आकार देणाऱ्या संरचनात्मक सत्तांतराचे व्यवस्थापन करण्याचा प्रयत्न होता. या चर्चांमधून अमेरिकेतील महत्त्वाच्या उद्योगांवरील चीनची वाढती पकड स्पष्ट झाली. चीनचा वाढता आर्थिक प्रभाव अमेरिकेसाठी आव्हान आहे. तैवानच्या प्रश्नाचे चुकीचे व्यवस्थापन द्विपक्षीय संबंधांना संघर्षाच्या दिशेने ढकलू शकते, असा इशारादेखील चीनने दिला. एकेकाळी प्रगत सेमिकंडक्टर चिप्ससाठी अमेरिकेवर मोठ्या प्रमाणात अवलंबून असलेला चीन आज अनेक महत्त्वाच्या तांत्रिक क्षेत्रांत, सुमारे ४५% स्वयंपूर्णतेकडे पोहोचला आहे. अमेरिकेने लादलेल्या निर्बंध आणि शुल्कांना प्रत्युत्तर म्हणून चीनने 'रेअर अर्थ' संसाधनांचा प्रभावी वापर केला. हेच निर्बंध आणि शुल्कांनी चीनला तंत्रज्ञान, इलेक्ट्रॉनिक्स, मोबाइल सर्किट्स आणि उत्पादन क्षेत्रात आत्मनिर्भरतेकडे ढकलले. पश्चिम आशियातील संघर्ष आणि होर्मुझ सामुद्रधुनीच्या प्रश्नावर चीनची भूमिका स्पष्ट आणि आहे. चीनने होर्मुझ बंद होण्याच्या परिस्थितीसाठी अमेरिकेलाच जबाबदार धरले. मात्र, चीन स्वतःही या परिस्थितीबद्दल सावध आहे. चीनकडे प्रचंड मोठे तेलसाठे असले, तरी होर्मुझ कायमस्वरूपी बंद राहणे चीनलाही परवडणारे नाही. म्हणूनच चीन 'freedom of navigation' आणि कोणताही अतिरिक्त टोल न लावण्याच्या भूमिकेचा आग्रह धरतो आहे. चीनने जागतिक पुरवठा साखळीवर प्रचंड पकड निर्माण केली आहे. जगातील जवळपास एक-तृतीयांश औद्योगिक उत्पादन चीनमध्ये तयार होते आणि २०३० पर्यंत हा वाटा ४० ते ४५ टक्क्यांपर्यंत जाऊ शकतो.

## संस्कृत सुभाषित

अमृतं वै गवां क्षीरमित्याह त्रिदशाधिपः।
तस्माद्ददाति यो धेनममृतं स प्रयच्छति ।।

अर्थ –गाईचे दूध हे अमृतच असते असे इंद्रदेव म्हणाला, म्हणून जो गाईचे दान देतो तो खरे तर अमृताचेच दान देत असतो.

## गुरु वचन

### मजबूत मन हेच सामर्थ्य

एखाद्या शास्त्रीय नर्तिकेचा अपघातात एक पाय निकामी होऊनही तिची नृत्याची जिद्द कमी होत नाही. ती नकली पाय बसवून व्यासपीठावर नाचते. एखाद्या क्रिकेटपटूने चांगला खेळ केला तरीही त्याला संघाबाहेर जाण्याचा रस्ता दाखविला जातो. परंतु, तो हार न मानता पुन्हा संघात दाखल होतो. एका महान चित्रपट निर्मात्याच्या महत्त्वाकांक्षी चित्रपटाला दर्शकांनी नकार दिल्यानंतर तो पुन्हा एक चित्रपट निर्माण करतो आणि तो चित्रपट इतिहास घडवितो किंवा मैलाचा दगड ठरतो.

असे नेहमीच होते. कारण जगात दोन प्रकारचे लोक असतात. एक म्हणचे कमजोर मनाचे आणि दुसरे म्हणजे मजबूत मन असलेले. कमजोर मन असणाऱ्या लोकांमध्ये संकटाचा सामना करण्याचे धाडस नसते. त्यामुळे ते अधिकधिक कमजोर होऊन तक्रार करणे, रडणे यामुळे अयशस्वी होतात. मात्र आपल्या अपयशाचे खापर दुसऱ्याच्या माथ्यावर फोडण्यासाठी कारणे शोधतात.

मजबूत मन असणारे लोक असे नसतात. ते प्रत्येक संकटाचा धैर्याने सामना करतात. टीकाकारांनी केलेली टीका त्यांचे मन बदलू शकत नाही. ते आपली हिंमत गमावत नाहीत, ते तक्रार करत नाहीत. ते प्रत्येक घटनेचा सकारात्मक बाजूने विचार करून एक दिवस यशस्वी होतात. कारण, त्यांच्यामध्ये संकटाच्याकाळी आत्मविश्वास आणि महत्त्वाकांक्षा असते. ते जीवनातील प्रत्येक आव्हानाचा अधिकाधिक फायदा घेण्याचा प्रयत्न करत असतात.

आपण यापैकी कसे आहात आणि कसे बनू इच्छिता, ते ठरविण्याचा अधिकार आपल्याला आहे. कारण, जीवनात प्रत्येकाला एक प्रश्न विचारला जातो तो म्हणजे, आपण साहसी बनू इच्छिता की भित्रे? सकारात्मक विचार करणारा कधीच भित्रा बनू शकत नाही. कारण, त्याचा स्वत:वर, जीवनावर आणि ईश्वरावर विश्वास असतो. ते उच्च विचारशक्ती आणि आत्मविश्वासाने आपले काम करतात. असे लोक आपल्यासाठी काम करतातच पण त्यांच्यामुळे देश आणि समाजाची प्रगती होत असते. असेच लोक देश आणि समाजाची अनमोल संपत्ती असतात. म्हणून नेहमी आपले मन मजबूत ठेवा. कारण, ए. पी. जे. अब्दुल कलाम, धीरूभाई अंबानी, अमिताभ बच्चन आणि सचिन तेंडूलकर या महान लोकांनी जन्म घेतला नसता तर एवढे मोठे कर्म त्याच्या हातून झाले नसते.

## उपदेशकथा

एक गारूडी साप आणि माकड यांना खेळवून पैसे मिळवीत असे. माकडाला काही चूक झाली की त्याच्याकडून काठीचा प्रसाद मिळत असे. गारूडी एके दिवशी माकडाला दोरीला बांधून ठेवून झोपी गेला तेव्हा संधी साधून माकडानंदेखील पळ काढला. हातातून निसटलेलं माकड पाहून गारूडी चिंतेत पडला. पैसा मिळविण्याचं साधन होतं ते माकड. खूप फिरल्यावर गारूड्याला माकड दिसलं. त्यानं माकडाला परत येण्याची विनंती केली. तो म्हणाला, 'तू तर माझ्या मुलासारखा. माझी सर्व संपत्ती मी तुलाच देईल पण मला असा दु:खात सोडून जाऊ नकोस. चल ये खाली. आपण घरी जाऊ. माकड त्याला म्हणालं, तुझ्या गोड शब्दाला भुलून मी परत येईन असं वाटतं का तुला? अरे मी तुझ्या काठीचे तडाखे विसरलेलो नाही. तुझ्या पैशापेक्षा मला स्वातंत्र्य प्रिय आहे. तू घरी परत जा कसा!

कथा उपदेश : शहाणी माणसं गोड शब्दाला भुलत नाहीत आणि आपल्या स्वातंत्र्याची किंमत ओळखतात.

## पंचांग

| | |
|---|---|
| पंचांग | तिथि:सप्तमी २९:०४:३९+ |
| २२ मे २०२६ | नक्षत्र:ओषा २६:०७:५०+ |
| शुक्रवार | योग:वृद्धि ०८:१८:२४ |
| विक्रम संवत्– २०८२ | करण:तैतिल ०६:२४:४८ |
| अधिक ज्येष्ठ शके | करण:गर १७:३९:२१ |
| संवत्– १९४८ | करण:वणिज |
| संवत्सर – पराभवनाम | २९:०४:३९+ |
| अयन– उत्तरायणारंभ | सूर्य:वृषभ |
| मास– अधिक ज्येष्ठ | चन्द्र:कर्क |
| ऋतु– सौर ग्रीष्म | हिजरी सन् – १४४६ |
| शुक्ल पक्ष | मुस्लिम मास – जिल्हेज |
| तिथि:षष्टी ०६:२४:४८ | तारीख – ५ |

## दै. 'संध्या' धमाल सूडोकु क्र. ९५६

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | 8 | | 4 | | | | |
| 9 | | 3 | 8 | 6 | | 2 | 4 | |
| | | | 3 | 1 | | | | 9 |
| | 6 | 9 | 2 | | | | 1 | 5 |
| | 8 | 4 | | | | 7 | 6 | |
| 1 | 7 | | | | 6 | 9 | 8 | |
| 7 | | | | 2 | 4 | | | |
| | 9 | 6 | | 7 | 3 | 5 | | 4 |
| | | | | 5 | | 1 | | |

### : सूडोकु :

खेळाचे नियम : प्रत्येक उभी लाइन, आडवी लाइन आणि ३–३ च्या वर्गात १ ते ९ पर्यंतची संख्या भरा. परंतु ही अट आहे की, नंबरची पुनरावृत्ति कोणत्याही उभ्या किंवा आडव्या लाइन आणि चौकानात आली नाही पाहिजे. प्रत्येक कोडयाचे केवळ एकच उत्तर आहे.या कोडयाला भरण्यासाठी आपण पेन्सिलचा आणि खोड रबराचा उपयोग केला तर ते आपल्यासाठी अधिक सुविधा जनक होईल.

– उत्तर उद्याच्या अंकात

### सूडोकु क्र. ९५५ चे उत्तर

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 7 | 8 | 4 | 3 | 1 | 9 | 2 | 5 | 6 |
| 2 | 1 | 9 | 6 | 4 | 5 | 8 | 7 | 3 |
| 3 | 5 | 6 | 7 | 2 | 8 | 1 | 4 | 9 |
| 4 | 7 | 1 | 8 | 3 | 6 | 5 | 9 | 2 |
| 9 | 6 | 2 | 4 | 5 | 1 | 7 | 3 | 8 |
| 8 | 3 | 5 | 9 | 7 | 2 | 4 | 6 | 1 |
| 5 | 9 | 7 | 1 | 8 | 3 | 6 | 2 | 4 |
| 6 | 2 | 8 | 5 | 9 | 4 | 3 | 1 | 7 |
| 1 | 4 | 3 | 2 | 6 | 7 | 9 | 8 | 5 |

## इतिहासात आजचा दिवस

### आंतरराष्ट्रीय

- ११७६ – ईराकी सम्राट सलाद्दीन वर खूनी हल्ला.
- १३७७ – पोप ग्रेगोरी अकराव्याने पाच पोपचे फतवे काढून ईंग्लिश तत्त्वज्ञानी जॉन वायक्लिफची मते खोडून काढण्याचा प्रयत्न केला.
- १७६२ – स्वीडन व प्रशिया मध्ये हॅम्बुर्गचा तह.

### राष्ट्रीय

- १९६१ – हुंडाबंदी कायद्याला राष्ट्रपतींची मान्यता.
- २००४ – भारताचे पंतप्रधान म्हणून मनमोहन सिंग यांचा शपथविधी.
- २००७ – उत्तरप्रदेशातील गोरखपूरमध्ये एकापाठोपाठ झालेल्या तीन बॉम्बस्फोटात १२ जण जखमी झाले.

### जन्म

- १६८८ – अलेक्झांडर पोप, इंग्लिश कवीचा जन्म.
- १७७२ – राजा राममोहन रॉय, आधुनिक भारतातील अग्रगण्य धर्मसुधारक, समाजसुधारक आणि ब्राह्मो समाज संस्थापकाचा जन्म.
- १८१३ – रिचर्ड वॅग्नर, जर्मन संगीतकारचा जन्म.
- १८५९ – सर आर्थर कॉनन डॉईल, ईंग्लिश लेखक व डॉक्टरचा जन्म.
- १८७१ – विष्णू वामन बापट, संस्कृत–मराठी अनुवादनकारचा जन्म.

### निधन

- ०३३७ – कॉन्स्टन्टाईन, रोमन सम्राटचे निधन.
- १०६८ – गो–राइझाइ, जपानी सम्राटचे निधन.
- १६६७ – पोप अलेक्झांडर सातवा याचे निधन.
- १८५९ – फर्डिनांड दुसरा, सिसिलीचा राजाचे निधन.
- १९६० – गुलाम हुसेन ऊर्फ गामा या लाहोरच्या कुस्तीगीराचे निधन. स्वातंत्र्यपूर्व काळात तो भारत खंडातील मोठा कुस्तीगीर होता.
- १९६६ – टॉम गॉडर्ड, इंग्लिश क्रिकेटपटूचे निधन.

## : SMS :

Koe Apko Pagal
Kahe Tou!
Dukhi mt hona
Afsos mt krna
Rona b nhe
Darna b nhe
Himmat se khare
ho kr Puchna..!
Oye! Tujhe kese
pata chala?

## हवामानाचा अंदाज

| | | |
|---|---|---|
| औरंगाबाद | ३९ | २७.८ |
| अहमदनगर | ३७.६ | २५.२ |
| अकोला | ४३.३ | ३०.५ |
| अमरावती | ४१.८ | ३१.७ |
| बीड | ४३.१ | ३४.३ |
| भंडारा | ४७.५ | ३१.९ |
| बुलढाणा | ४३.१ | २९.३ |
| चंद्रपूर | ४४.८ | ३५.१ |
| चेन्नई | ४८.४ | ३१.३ |
| नवी दिल्ली | ४२.४ | ३१.१ |
| धुळे | ४३ | २७ |
| गोंदिया | ४६.५ | ३०.८ |
| जळगाव | ४४.४ | ३०.१ |
| कोल्हापूर | ३६.५ | २३.६ |
| लातूर | ३६.८ | २९.५ |
| मुंबई | ३८.९ | ३२.८ |
| नागपूर | ४३.५ | ३३ |
| नांदेड | ४१.९ | ३१.१ |
| नंदूरबार | ३९.२ | २९.५ |
| नाशिक | ३९ | २४.३ |
| पुणे | ३५ | २३.७ |
| पंढरपूर | ३९.४ | ३० |
| सातारा | ३७.४ | २२.३ |
| सांगली | ३८.२ | २४.४ |
| सोलापूर | ३९.५ | ३१.८ |
| वर्धा | ४२.७ | ३२.२ |

## आजचे राशिभविष्य

**मेष :** शुभ रंग:पांढरा, शुभ दिशा:उत्तर व्यापारात विचारपूर्वक निर्णय घ्या. कौटुंबिक सहकार्य कमी प्रमाणात मिळेल.

**वृषभ :** शुभ रंग:निळा, शुभ दिशा: उत्तर आर्थिक बाबतीमधील प्रकरणे विद्यार्थी वर्गासाठी आजचा दिवस शुभ आहे.

**मिथुन :** शुभ रंग :काळा,शुभ दिशा:पश्चिम जीवनात नवीन संधी निर्माण होईल. तणावमुक्त होऊन कार्य करा.

**कर्क :** शुभ रंग:निळा, शुभ दिशा:दक्षिण व्यवसायातील विस्ताराच्या दृष्टीने केलेल्या योजना यशस्वी होतील. मुलांची काळजी राहील.

**सिंह :** शुभ रंग–काळा, शुभ दिशा: दक्षिण लोकांशी संपर्क वाढल्यामुळे आपली कामे पार पडतील. व्यापार व्यवसायात विस्तार होईल. दुसऱ्यावर रोष करू नका.

**कन्या :** शुभ रंग:काळा, शुभ दिशा :पश्चिम सामजिक कामात वेळ जाईल. अचानक लाभ होण्याचा योग आहे.

**तूळ :** शुभ रंग: जांभळा, शुभ दिशा :पश्चिम नवीन व्यवसायास सुरूवात करू शकता.

**वृश्चिक :** शुभ रंग–भूरा, शुभ दिशा:उत्तर संततीकडून चांगल्या बातम्या कळाल्यामुळे आनंदी रहाल. देण्या–घेण्याच्या व्यवहारात सावधानी बाळगा.


**धनू :** शुभ रंग:क़ाळा, शुभ दिशा: पश्चिम व्यावहारीक समस्यांमुळे आपण त्रस्त व्हाल. व्यापार, नोकरीमधील स्थिती मध्यम राहील.

**मकर :** शुभ रंग:निळा,शुभ दिशा: उत्तर व्यवसायात किंवा रोजगारात मोठे परिवर्तन घडून येण्याची शक्यता आहे. लोकप्रियता वाढणार आहे.

**कुंभ :** शुभ रंग:जांभळा, शुभ दिशा:पश्चिम राजकारणात चांगली संधी मिळण्याची आवश्यकता आहे. विश्वास दृढ होईल.

**मीन :** शुभ रंग: पांढरा, शुभ दिशा: दक्षिण प्रतिष्ठित व्यक्तींची भेट आपल्यासाठी फायदेशीर ठरणार आहे. मानसिक संतोष निर्माण होईल. व्यवसाय चांगला चालेल.

## 'दै. संध्या' जम्बो शब्दकोडे क्र. ९५६



### आडवे शब्द

१. प्रतिनिधी निवडण्याची क्रिया
५. उत्कंठा वाढवणारा (आडवा १ च्या) पुढचा टप्पा
८. पराजय
११. नेहमी, पक्का
१२. जाणकार
१३. हजार किलो
१४. दुप्पट (इंग्रजी)
१५. मोठा भाऊ
१६. चिखलाची मऊ जमीन
१९. सारखा
२०. हिंदीत शेतकरी
२२. खराब
२३. मुस्लिम प्रार्थना पद्धत
२५. शरीर
२६. वस्तू, माल
२७. मन, विचार
२८. उदार, महात्मा
२९. दक्ष
३१. दागिना
३२. 'हरिणीचे ---, व्याघ्रे धरियले' (संत कान्होपात्रा)
३५. पुरुष
३६. दरवळ
३८. हिम्मत
३९. कापड विणणारा
४१. क्रिकेटमधील धाव
४२. अदृश्य, गुप्त (होणे)
४३. मोठा, भव्य
४४. मान्यतेचे अक्षर
४५. धाक, जरब
४६. रेशमी धोतर
४७. पालिकेतील लोकप्रतिनिधी
५१. कारकून
५३. सोन्या–चांदीचा धागा
५४. नारायण नारायण मंत्र जपणारा
५५. खोटे आश्वासन देणारा
५७. मज्जाव, बंदी
५८. मोगऱ्याची एक जात
६१. कावळा
६२. गणपतीचे एक नाव
६४. पोरका
६५. हार, सर
६७. तपासणी (इंग्रजी)
६८. सांकेतिक चिन्ह, शब्द (इंग्रजी)
६९. शहर
७०. वरवर, दिखाऊ
७३. फुलांची मोठी माळ
७५. सीतेचे वडील
७६. अखेर, शेवट
७७. लक्ष्मीपूजनाचा प्रसाद, पेढ्यांऐवजी वाटण्याचा पदार्थ
७८. दया

### उभे शब्द

१. निर्णय
२. उमर
३. डमरू वाजवताना होणारा आवाज
४. जास्तीत जास्त व कमीत कमी
५. मत देणे
६. मागणीची भुणभुण
७. मयूर
८. लाकूड छिलण्याचे हत्यार
९. ब्राह्मण
१०. सिंह
१६. जमीनदोस्त
१७. मोठी उथळ वाटी
१८. सर्वस्व
१९. क्वचित
२१. लहान
२२. रंग, वर्ण
२४. धूळ, दुर्दशा
२६. सामान्य
२७. वाड्यातील मधली खोली
२८. चर्चा
३०. जंगलात मजेखातर भटकणे
३१. चाणक्यनीतीतील पहिला उपाय, समजुतीने चर्चा
३३. मध
३४. माजलेला बैल, वळू
३६. निवासस्थान
३७. माणूस
४०. पार्थिव शरीर
४२. आकड्यांनी संख्या लिहिण्याची पद्धत
४३. सुसर
४६. ज्वारीचे वाळलेले खुंट, गुरांचे खाद्य
४७. टकम, दृष्टी
४८. सेनापती, सेनाप्रमुख
४९. पाऊल (हिंदी)
५०. थोर, मोठा
५२. गोष्टी सांगणे
५६. 'खरा तो एकचि धर्म, --- प्रेम अर्पावे' (साने गुरुजी)
५७. संत रामदासांनी मनाला केलेला उपदेश
५९. थकवा
६०. वडील
६१. 'आ'काराची रेघ
६३. लाकूड कापण्याचे हत्यार
६४. सुपारी कातरण्याचे साधन
६५. मारझोड
६६. शिकार
७१. वानवा, नेहमीची बोंब
७२. सडक
७४. आवाज, कीर्ति

### जम्बो शब्दकोडे क्र. ९५४ चे उत्तर

आडवे उत्तर १.आगबोट ५.पालट ८.खरवस ११.रज १२.पतन १३.लहरबहर १६.साम १७.मारामारी १९.वाचावीर २१.दस्तखत २२.रजक २३.वानवा २४.कली २५.गदा २६.डमरु २८.कसम ३०.बातमीदार ३१.खास ३३.गाळचेपी ३५.माळकरी ३६.सरोवर ३८.कळकळ ४०.गजरा ४१.काना मागून आली ४४.गो ४५.तडक ४७.नटनागर ५१.महाभारत ५३.हाट ५५.अनाथ ५६.जननी ५७.कपबशी ५८.फाटक ५९.जव ६०.कडक ६२.पोरगा ६३.बरकत ६४.पगार ६५.काळा ६६.रगडापुरी ६९.तोरा ७०.लगेच ७२.नवा ७४.बेल ७५.ततपप ७७.वाचक ७८.सरबर ७९.पाणी ८०.दडस ८१.वाढण

उभे उत्तर : १.आरमार २.गजराज ३.टपरी ४.धनवान ५.पालवी ६.लहर ७.टर ८.खरखरीत ९.वसा १०.समजदार १४.बदली १५.हस्त १८.माकड २०.चावा २३.वारुळ २४.कमळ २५.गदारोळ २७.मगर २९.समाधानकारक ३०.बारीक ३१.खासगत ३२.सरोज ३४.चेतना ३७.वरात ३९.कजाग ४१.काक ४२.मानहानी ४३.लीन ४६.डबी ४८.नाडी ४९.रहाटगाडगे ५०.अनावर ५१.मनकवडा ५२.तपकीर ५४.टक ५५.अजब ५६.जड ५८.फार ६०.कतरबेत ६१.विपरीत ६२.पोळा ६५.कारावास ६७.गल ६८.पुतणी ७०.लकवा ७१.चरण ७२.नस ७३.वार ७६.पद

RNI No. 1663/1957 (DAILY SANDHYA) |
दैनिक संध्या पब्लिकेशन्स प्रा. लि. यांच्या मालकीचे हे दैनिक मुद्रक व प्रकाशक ज्योती नाळे यांनी सामना प्रेस (प्रबोधन प्रकाशन) सिंहगड रोड, वडगांव खुर्द पुणे–४११०४१ येथे छापून, १०३८ आकार भवन, दुसरा मजला, टिळक रोड, पुणे – ४११००२ येथे प्रसिद्ध केले.
संपादिका : ज्योती नाळे (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) (फोन : ०२०–२४४७९२९२)
Daily "Sandhya" News paper is owned by Dainik Sandhya Publications Pvt. Ltd. Printed & Published by Jyoti Nale, Printed at Saamana Press (Prabodhan Prakashan) Pvt. Ltd. Sihagad Road, Vadgaon Khurd, Pune 411 041, published at 1038, Aakar Bhavan, Tilak Road, Pune 411002. Editor - Jyoti Nale.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### भाजप ओबीसी मोर्चाच्या सरचिटणीसपदी यशोधन आखाडे यांची निवड

पुणे (दैनिक संध्या) : भारतीय जनता पार्टी ओबीसी मोर्चा पुणे शहरच्या सरचिटणीसपदी यशोधन आखाडे यांची निवड करण्यात आली आहे. कसबा मतदारसंघाचे आमदार हेमंत रासने यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच शहराध्यक्ष धीरज घाटे यांच्या नेतृत्वात ही निवड जाहीर करण्यात आली. ओबीसी मोर्चा अध्यक्ष विकास लवटे यांच्या अध्यक्षतेखाली आणि अमित कंक यांच्या विशेष प्रयत्नातून ही निवड प्रक्रिया पूर्ण झाली. यावेळी कसबा उत्तर मंडल सरचिटणीस किरण जगदाळे, निलेश कदम, पुणे शहर युवा मोर्चा सरचिटणीस प्रणव गंजीवाले, ओबीसी मोर्चा उपाध्यक्ष दिलीप पवार, कसबा उत्तर मंडल चिटणीस पुरण हुडके, मनीष जाधव, अभिजीत सावंत तसेच सर्व ओबीसी मोर्चाच्या पदाधिकाऱ्यांचे सहकार्य लाभल्याबद्दल यशोधन आखाडे यांनी सर्वांचे आभार मानले.



### एलपीजी टंचाईवर रॉकेल वितरण योजना कागदावरच; राज्यभर अंमलबजावणी ठप्प

पुणे (दैनिक संध्या) : एलपीजी गॅसटंचाईच्या पार्श्वभूमीवर सामान्य नागरिकांना दिलासा देण्यासाठी राज्य सरकारकडून मोठा गाजावाजा करीत रॉकेलपुरवठ्याचा निर्णय घेतला होता. मात्र, प्रत्यक्षात तीन महिने उलटूनही राज्यातील बहुतांश जिल्ह्यांमध्ये रॉकेलवितरण सुरूच झालेले नाही. अपुरे कमिशन, वाढते डिझेल दर आणि पुरवठादारांच्या अटींमुळे ही योजना कागदावरच अडकून पडल्याचे वास्तव समोर आले आहे. राज्य सरकारने स्वस्त धान्य दुकानांमार्फत रॉकेल वितरणासाठी तब्बल 37 लाख 44 हजार लिटरचा कोटा निश्चित केला होता. त्यामध्ये पुणे जिल्ह्यासाठी 2 लाख 4 हजार लिटर रॉकेल मंजूर करण्यात आले. बारामती तालुक्याला सर्वाधिक 33 हजार लिटर, तर इंदापूरला 27 हजार लिटर रॉकेल देण्याचे नियोजन करण्यात आले होते. जिल्हा पुरवठा विभागाने तीन पुरवठादार निश्चित केले; मात्र प्रत्यक्षात एक थेंबही रॉकेल नागरिकांपर्यंत पोहचलेले नाही. योजनेच्या अंमलबजावणीत सर्वांत मोठा अडथळा ठरला तो कमिशनचा मुद्दा. स्वस्त धान्य दुकानदारांना प्रतिलिटर केवळ एक रुपया कमिशन मिळणार असल्याने अनेक दुकानदारांनी रॉकेल उचलण्यास नकार दिला आहे. घाऊक विक्रेत्यांना सुमारे तीन रुपये कमिशन मिळत असले, तरी वाढत्या डिझेल दरामुळे तेही नाराज आहेत. कमिशन वाढवून मिळावे, अशी त्यांची मागणी असून, त्यावर निर्णय न झाल्याने पुरवठा प्रक्रियेला ब्रेक लागला आहे.

### पुण्यात जनगणना वेगात; पाच दिवसांत 10 टक्के घरांचे सर्वेक्षण पूर्ण

पुणे (दैनिक संध्या) : राष्ट्रीय जनगणना मोहिमेच्या दुसऱ्या टप्प्यात महापालिका हद्दीत घरोघरी जाऊन कुटुंबनोंदणीचे काम वेगाने सुरू असून, पहिल्या पाच दिवसांतच 10 टक्के घरांचे सर्वेक्षण पूर्ण झाले आहे. ही संपूर्ण प्रक्रिया 15 जूनपर्यंत पूर्ण करण्याचे उद्दिष्ट असल्याची माहिती जनगणना विभागाचे प्रमुख विजय लांडगे यांनी दिली. यंदा राष्ट्रीय जनगणना प्रक्रिया सुरू करण्यात आली असून, पहिल्या टप्प्यात मोबाईल ॲपच्या माध्यमातून स्वगणना उपक्रम राबविला होता. या उपक्रमात जिल्ह्यातील 1 लाख 73 हजार नागरिकांनी स्वतःहून कुटुंबांची नोंदणी केली. त्यापैकी जवळपास 50 टक्के सहभाग पुणे महापालिका क्षेत्रातील नागरिकांचा होता. दुसऱ्या टप्प्याला 15 मेपासून सुरुवात झाली असून, यामध्ये प्रगणकांकडून प्रत्यक्ष घरोघरी जाऊन माहिती संकलित केली जात आहे. या कामासाठी 12 हजार प्रगणकांची नियुक्ती केली आहे. प्रत्येक प्रगणकाला सरासरी 800 घरांपर्यंत पोहचून प्राथमिक माहिती घेणे आणि घरांना क्रमांक देण्याची जबाबदारी देण्यात आली आहे.




### सिंबायोसिस अभियांत्रिकी परीक्षेत ‘रेबॅन मेटा’ चष्म्याचा वापर; दोन विद्यार्थी प्रतिबंधित

पुणे (दैनिक संध्या) : वैद्यकीय अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी झालेल्या ‘नीट’ पेपरफुटीचा कसून तपास सुरू असतानाच सिंबायोसिस आंतरराष्ट्रीय अभिमत विद्यापीठात अभियांत्रिकी अभ्यासक्रमाच्या परीक्षेदरम्यान विद्यार्थ्यांकडून अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर झाल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. परीक्षेदरम्यान दोन विद्यार्थ्यांनी कॅमेरा असलेला अत्याधुनिक चष्म्याचा वापर केल्याचे दिसून आले. संबंधित विद्यार्थ्यांना परीक्षेपासून प्रतिबंधित केले असून या प्रकरणाची संस्थेच्या परीक्षेतील गैरप्रकार समितीमार्फत (अनफेअर मीन्स कमिटी) चौकशी करण्यात येत आहे. सिंबायोसिस इन्स्टिट्युट ऑफ टेक्नॉलॉजीमधील अभियांत्रिकी अभ्यासक्रमाच्या परीक्षेदरम्यान दोन विद्यार्थी ‘रेबॅन मेटा ग्लास’ वापरत असल्याचे पर्यवेक्षकांच्या निदर्शनास आले. या प्रकारच्या चष्म्याचा वापर छायाचित्र काढणे, व्हिडिओ काढणे, कृत्रिम बुद्धीमत्तेच्या वापराची संधी उपलब्ध करून देणे, यासाठी केला जाऊ शकतो. परंतु, संबंधित विद्यार्थ्यांनी या चष्म्याचा परीक्षेदरम्यान गैरवापर केल्याचा कोणताही पुरावा अद्याप आढळून आलेला नाही. मात्र, या प्रकरणाची तक्रार संस्थेतील गैरप्रकार समितीकडे नोंदविण्यात आली आहे. संस्थेच्या संबंधित समितीमार्फत चौकशी झाल्यानंतर तो अहवाल विद्यापीठाच्या समितीकडे पाठविण्यात येईल. विद्यापीठ स्तरावरून विद्यार्थ्यांशी संवाद साधून त्यांची बाजू घेतली जाईल. त्यानंतर पुढील कारवाईबाबत निर्णय घेण्यात येईल, अशी माहिती विद्यापीठाच्या प्र-कुलपती आणि प्रधान संचालक डॉ. विद्या येरवडेकर यांनी दिली.

# तुळजाई - महादेवाच्या अलौकिक विवाहाचा अद्भुत महिना!

पुणे (दै. संध्या)

कलर्स मराठी मराठीवरील आई तुळजाभवानी मालिकेत सध्या तुळजाभवानी आणि महादेवांचा लग्नसोहळा आणि त्याच्या संदर्भातले विधी मोठ्या जल्लोषात सुरु आहेत. हा विवाह संपूर्ण त्रिखंडातील अभूतपूर्व आणि भव्य दिव्य सोहळा ठरणार आहे. या विवाहसोहळ्यासाठी अखिल देवी-देवता, ब्रह्मा, विष्णूंसह तिन्ही खंडातील ऋषी-मुनी, योग-योगिनी यांचा दिव्य लवाजमा पाहायला मिळणार आहे. जवळपास १५० ते १७५ कलाकार आणि तंत्रज्ञांचा मोठा क्रू, जवळपास २ महिन्यांपासून या सोहळ्यासाठी कार्यरत आहे. सौंदर्याची खास ओळख ठरणाऱ्या विविध रंगसंगतीच्या मनमोहक ४०-४५ आकर्षक उंची साड्या, पारंपरिक दागदागिने तसेच भव्य सेट आणि सजावट यामुळे हा सोहळा अधिक दिमाखदार होणार आहे. ‘अलौकिक विवाहाचा अद्भुत महिना’ म्हणून रंगणाऱ्या या विशेष पर्वात देवी आणि महादेवांच्या विवाहाची बातमी त्रिलोकात पसरते आणि हा विवाह सृष्टीच्या संतुलनाचा क्षण मानला जातो. तेव्हा नक्की पहा आई तुळजाभवानी - विवाह सोहळा विशेष महिना २८ एप्रिल ते २८ मे दररोज रात्री ९ वाजता आपल्या कलर्स मराठीवर.

या विवाहासाठी वैकुंठातून विष्णू आणि लक्ष्मी महालात येतात. वधूसारखी सजलेली देवी पाहून लक्ष्मी आनंद व्यक्त करते, तर विष्णू पुढील संघर्षाची अप्रत्यक्ष चाहूल देतात. या दरम्यान महादेवांना मिळणारे आदिशक्तीचे गूढ संकेत, आदिशक्तीने या संकेतांचा अज्ञात ठेवलेला अर्थ, महिषासुराची देवीच्या आश्रयास आलेली पत्नी असुर सम्राज्ञी शुंभाचे हळूहळू उघडकीस येणारे कारस्थान, देवीची वाड्यातून बहिष्कृत केलेली सखी पद्माचा एका दुसऱ्या शक्तीच्या शोधाचा प्रवास या साऱ्या नाट्यमय घडामोडीच्या पार्श्वभूमीवर अनेक मनमोहक भव्य



विवाहविधी संपन्न होत आहेत, यात देवीच्या हातात चुडा भरण्याचा कार्यक्रम विशेष ठरणार असून देवीच्या हातात प्रत्यक्षात हा चुडा कोण भरते, हे रहस्य प्रेक्षकांना चकित करणारे असेल. त्यानंतर देवीचा मांडव उभारण्यात येणाऱ्या अडचणी दूर व्हाव्यात म्हणून समस्त शक्तीरुपिणी देवींद्वारे उभे केले जाणारे प्रतिरक्षा शक्ति कवच हे अद्भुत नयनरम्य आणि डोळ्याचे पारणे फेडणारे आहे.मराठी टेलिव्हिजनवर पहिल्यांदाच इतके भव्य ग्राफिक्स साकारले जाते आहे.

या विवाहसोहळ्यात हळदीच्या विधीत यमाई, मायाक्का, काळुबाई, आंबेजोगाई आणि मळगंगा सहभागी होत भव्य नृत्य-गायनाचा सोहळा रंगतो. मात्र, इथून एक नव्या दैवी अध्यायाचे रहस्य उलगडू लागते. हळद, महादेवांचं वऱ्हाड आणि प्रत्यक्ष लग्न यात उलगडणारे हे रहस्य एका वेगळ्या दैवी अनुभवाचा प्रत्यय प्रेक्षकांना देईल, ज्याला एका भव्य साग्रसंगीत विवाहसोहळ्याची जोड आहे. तेव्हा नक्की पहा आणि अनुभवा आई तुळजाभवानीच्या अलौकिक विवाहाचा अद्भुत महिना !

मकरंद माने (मालिकेचे निर्माते - लेखक) याविषयी बोलताना म्हणाले, "आई तुळजाभवानीच महात्म्य दृश्य स्वरुपात साकारण्याच कार्य आम्हा सर्व टीमला मिळाले हे आमचे खूप मोठे भाग्य आहे.

गेले ५००-६०० भागांचा टप्पा पूर्ण केला आणि आता आई तुळजाभवानी महात्म्य मधील महत्वाच्या टप्प्यावर आपण आहोत ते म्हणजे लग्न विधी. या संपूर्ण लग्न सोहळा मांडताना विशेष आनंद पण होतो आणि दडपण पण येतय की आपण या सोहळ्याला पूर्ण न्याय द्यायला हवा. त्या दिशेने काम करताना एक वेगळा संचार संपूर्ण टीममधे आहे. गेले दोन महिने चॅनेल आणि प्रॉडक्शन टीम दिवसरात्र सर्वजण झपाटल्यासारखे काम करत आहेत. लग्नाचा काळ हा पौराणिक काळ आहे त्यामुळे प्रत्येक विधी हा अभ्यासपूर्वक करण्याचा आमचा ध्यास आहे. संपूर्ण महाराष्ट्राची कुलस्वामिनी असलेल्या आईचा महिमा तेवढाच भव्य असण्याकडे जाणीवपूर्ण लक्ष दिले जात आहे. हे साकारणाऱ्या कलाकारांची साथ तेवढीच मोलाची ठरते आहे.

आता सेटवर जणू लग्नघर असल्याचा माहोल आहे. जो-तो उत्साहाने, जबाबदारीने आपली-आपली कामे पार पाडतो आहे. मी स्वतःला नशीबवान समजतो आहे की या मालिकेचा मी एक भाग आहे. आपली असलेली आईराजावरची श्रद्धा आणि तिची अश्या पद्धतीने भक्ती करण्याचं सौभाग्य मिळतय या पलीकडे आयुष्यात अजून काय साध्य करायचे. हा भव्य दिव्य लग्नसोहळा आई चरणी आम्ही अर्पण करत आहोत."

## विद्यार्थिनींनी साकारले 'पारगाव तर्फ खेड'च्या अभ्यासावरील प्रदर्शन

पुणे (दै. संध्या)



ग्रामीण भागातील पारंपरिक पद्धतीने बांधलेली घरे ही स्थानिक भौगोलिक स्थिती व हवामानपूरक शाश्वत बांधकामे असतात. हाच विचार विद्यार्थिनींमध्ये रुजवण्याच्या उद्देशाने साठी महर्षी कर्वे स्त्रीशिक्षण संस्थेच्या डॉ.भानूबेन नानावटी कॉलेज ऑफ आर्किटेक्चर फॉर वूमेनच्या पहिल्या वर्षातील विद्यार्थिनींनी पुणे जिल्ह्यातील राजगुरुनगर तालुक्यातील पारगाव या छोट्या वस्तीचा केलेला अभ्यास प्रदर्शनाच्या स्वरुपात मांडला आहे.

ऊर्वी पब्लिक ट्रस्टच्या सेक्रेटरी अमृता नायडू यांच्या सहकार्याने पारगाव तर्फ खेड येथे १३ ते १६ मार्च २०२६ या काळात हा अभ्यास केला गेला. या अभ्यासाचे प्रदर्शन पाहण्यासाठी पारगाव तर्फ खेड यथील बीएनसीए येथे उपस्थित होते.

बीएनसीएमधील पहिल्या वर्षातील ४३ विद्यार्थिनी यामध्ये सहभागी झाल्या असून त्यांना महाविद्यालयातील प्राध्यापक डॉ. ध्रुव चंदवानिया, प्रा. अपर्णा कुलकर्णी, प्रा. श्वेता अलबाळ, प्रा. सायली कुलकर्णी आणि प्रा. दीप्ती नातू यांनी या प्रकल्पास मार्गदर्शन केले. दगड, विटा, माती आणि लाकडाचा वापर केलेली पारंपरिक घरे हीच खऱ्या अर्थाने शाश्वत घरे असतात, हा विचार वास्तूरचनाशास्त्राच्या विद्यार्थिनींमध्ये सुरुवातीपासूनच ठसवण्यासाठी दरवर्षी हा उपक्रम घेतला जातो, असे बीएनसीएचे प्राचार्य डॉ. अनुराग कश्यप यांनी सांगितले. हे या उपक्रमाचे चौथे वर्ष असल्याचे त्यांनी सांगितले.

## चासकमान डावा कालवा परिसरात ३१ मे पर्यंत प्रतिबंधात्मक आदेश लागू – जिल्हाधिकारी

पुणे (दै. संध्या)



भारतीय नागरिक सुरक्षा संहिता-२०२३ च्या कलम १६३ अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारानुसार कायदा व सुव्यवस्था अबाधित राहण्यासाठी चासकमान डावा कालवा परिसरातील कालव्याचे दोन्ही बाजूस १०० मीटर हद्दीत ३१ मे २०२६ रोजीपर्यंत प्रतिबंधात्मक आदेश लागू करण्याबाबतचे जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी जितेंद्र डूडी यांनी प्रतिबंधात्मक आदेश जारी केले आहे.

या प्रतिबंधात्मक आदेशाचे उल्लंघन करणारी व्यक्ती भारतीय न्याय संहिता २०२३ मधील कलम २२३ मधील तरतूदी व प्रचलित कायद्यान्वये शिक्षेस पात्र राहिल, असेही आदेशात नमूद केले आहे.

## 'हृदयाचे आरोग्य आणि चांगल्या जीवनमानासह दीर्घायुष्यासाठी रक्तदाब नियंत्रित ठेवणे अत्यावश्यक'

पुणे (दै. संध्या)

उच्च रक्तदाब तसेच त्यासोबत इतर सहव्याधी असलेल्या रुग्णांच्या वाढत्या संख्येमुळे भविष्यात उद्भवू शकणाऱ्या गुंतागुंतीच्या धोका लक्षात घेता, हृदयाचे आरोग्य चांगले राखण्यासाठी व चांगल्या जीवनमानासह दीर्घायुष्यासाठी रक्तदाब नियंत्रणात ठेवणे अत्यंत आवश्यक असल्याचे मत तज्ज्ञांनी व्यक्त केले.

दरवर्षी १७ मे रोजी जागतिक उच्च रक्तदाब दिनाच्या निमित्ताने अनेक जनजागृती उपक्रम हाती घेतले जातात . या वर्षीची संकल्पना आहे ' कंट्रोलिंग हायपरटेंशन टुगेदर, चेक युअर ब्लड प्रेशर रेग्युलर्ली, डिफिट द सायलंट किलर' ही आहे , जगभरात अकाली मृत्यू होण्याचे उच्च रक्तदाब हे एक प्रमुख टाळता येण्याजोगे कारण आहे. जागतिक स्तरावर, सुमारे १.४ अब्ज लोक उच्च रक्तदाबाने ग्रस्त आहेत. प्रभावी आणि परवडणारे उपचार पर्याय मोठ्या प्रमाणावर उपलब्ध असूनही, अनेक व्यक्तींना त्यांच्या स्थितीबद्दल माहिती नसते आणि उच्च रक्तदाब असलेल्या चारपैकी केवळ एक व्यक्ती आपला रक्तदाब पुरेशा नियंत्रणात ठेवण्यात यशस्वी होते.

पुण्यातील नोबल हॉस्पिटल येथील फिजिशियन, डॉ. दत्तात्रय पाटील म्हणाले की, नियमित तपासणी आता केवळ ४० वर्षांवरील लोकांसाठीच आवश्यक राहिलेली नाही. वाढता ताण आणि बैठी जीवनशैली यामुळे उच्च रक्तदाब लवकर दिसून येत आहे; वयाच्या विशीतच हे कल ओळखल्यास पुढे संभाव्य गुंतागुंत व औषधोपचार टाळता येऊ शकतात. वाढत्या संख्येमुळे रक्तदाब तपासणीच्या वयाचा पुनर्विचार करण्याची वेळ आली आहे. हृदयाच्या आरोग्यासाठी आणि दीर्घायुष्यासाठी रक्तदाब नियंत्री ठेवणे महत्त्वाचे आहे.

डॉ. पाटील यांनी पुढे सांगितले की, रक्तदाबाशी संबंधित अनेक चिंतांपैकी एक म्हणजे 'सेकंडरी हायपरटेन्शन'. मूत्रपिंडाचे आजार, अंतःस्रावी ग्रंथींचे विकार किंवा स्लीप ॲप्निया यांसारखे आजार असलेल्या लोकनामध्ये सेकंडरी हायपरटेन्शन दिसून येते . शहरी भागांमध्ये लठ्ठपणाचे वाढते प्रमाण तसेच सततचा गोंगाट आणि वायू प्रदूषण यांसारख्या इतर घटकांमुळे त्याची जोखीम वाढत आहे.

आणखी एक चिंतेची बाब म्हणजे एकाच वेळी अनेक सह-व्याधींची वाढती संख्या. विशेषतः, मधुमेह किंवा लठ्ठपणासोबत उच्च रक्तदाब अधिक धोकादायक असतो. मधुमेहामुळे रक्तवाहिन्या कडक होतात, तर लठ्ठपणामुळे संपूर्ण शरीरात दाह निर्माण होतो आणि मूत्रपिंडावर दाब येतो. जर यावर योग्य प्रकारे नियंत्रण ठेवले नाही, तर हे सर्व घटक मिळून हृदय, मूत्रपिंड आणि डोळ्यांच्या पडद्याचे (रेटिना) नुकसान अधिक वेगाने वाढवतात.

## 'दगडूशेठ'ट्रस्टतर्फे मोफत महाआरोग्य शिबीर शनिवारी; जिल्ह्यातील ९० रुग्णालये व संस्थांचा सहभाग

पुणे (दै. संध्या)

श्रीमंत दगडूशेठ हलवाई सार्वजनिक गणपती ट्रस्ट, सुवर्णयुग तरुण मंडळातर्फे रुग्णसेवा हीच ईश्वरसेवा हे ब्रीद अंगिकारून जय गणेश रुग्णसेवा अभियान अंतर्गत मोफत महाआरोग्य शिबीराचे आयोजन शनिवार, दि. २३ मे रोजी सकाळी ९ ते दुपारी ४ यावेळेत करण्यात आले आहे. श्रीमंत थोरले बाजीराव पेशवे रस्त्यावरील नू.म.वि. प्रशाला व कनिष्ठ महाविद्यालयात हे शिबीर होणार आहे, अशी माहिती ट्रस्टचे अध्यक्ष सुनील रासने यांनी दिली.

शिबीरात हृदय आजार, किडनी, नेत्र आजार, दंत उपचार, स्त्री रोग, लहान मुलांच्या शस्त्रक्रिया, अपंगांना मोफत जयपूर फूट वाटप, रक्त तपासणी, रक्तदान शिबीर, ईएनटी, आयुर्वेदिक, होमिओपॅथी उपचार, अस्थिरोग, विविध थेरपी, रेडिओलॉजी, श्रवण आणि स्पीच थेरपी उपचार विनामूल्य करून देण्यात येणार आहे. नागरिकांसाठी वाहने पार्किंग व्यवस्था नू.म.वि. प्राथमिक शाळा, प्रभात थिएटर समोर, अप्पा बळवंत चौक येथे करण्यात आली आहे. पुणे जिल्ह्यातील ९० रुग्णालये व संस्थांचा शिबीरात सहभाग आहे. यावेळी फिरता दवाखाना उपक्रमाचे उद्घाटनही होणार आहे.

सुनील रासने म्हणाले, महाराष्ट्र शासन आरोग्य विभाग व पुणे महानगरपालिकेच्या विविध योजनांचा लाभ कसा घ्यावा, हे अनेक रुग्णांना माहीत नसते. त्या रुग्णांना ट्रस्टतर्फे योजनांचा लाभ करून दिला जातो. तसेच, ज्या रुग्णांकडे अपुरी कागदपत्रे असतील, त्यांना नागरी सुविधा केंद्राच्या माध्यमातून कागदपत्रे मिळवून देण्याकरिता देखील ट्रस्ट सदैव तत्परतेने कार्य करीत आहे. 'आरोग्य गणेशा' अंतर्गत मागील दोन वर्षांमध्ये विविध प्रकारच्या शस्त्रक्रिया, तपासण्या, साहित्य व औषधे वाटप अशी विविध प्रकारची सर्वतोपरी मदत हजारो रुग्णांना करण्यात आली आहे. तरी रुग्णांनी या मोफत महाआरोग्य शिबीराचा देखील लाभ घ्यावा, असे आवाहनही त्यांनी केले.

**१४ रुग्णवाहिकांच्या माध्यमातून अखंडीतपणे विनामूल्य सेवा**

ट्रस्टच्या एकूण १४ रुग्णवाहिका असून अखंडपणे २४ तास पुणे शहर पिंपरी चिंचवड व जिल्ह्यात विनामूल्य सेवा दिली जाते. तसेच महाराष्ट्रात डिझेल खर्चात सेवा दिली जात आहे. यामध्ये कान, डोळे, दंत तपासणी व्हॅन रुग्णवाहिकेचा देखील समावेश आहे. याचा लाभ देखील नागरिकांनी घ्यावा, असे आवाहन ट्रस्टतर्फे करण्यात आले आहे.

## हिंदू इकॉनॉमिक फोरम पुणे जिल्हा चॅप्टरतर्फे सहा जूनला 'शक्ती समिट'चे आयोजन

### गौरव त्रिपाठी यांची पत्रकार परिषदेत माहिती; मुरलीधर मोहोळ, आशिष शेलार यांची प्रमुख उपस्थिती

पुणे (दै. संध्या)

हिंदू इकॉनॉमिक फोरम (एचईएफ) पुणे जिल्हा चॅप्टरतर्फे 'शक्ती समिट २०२६', उद्योजकता परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. शिवराज्याभिषेक दिनाच्या निमित्ताने शनिवार, दि. ६ जून २०२६ रोजी सकाळी ९ ते सायंकाळी ६.३० या वेळेत पाषाण येथील पुणे इंटरनॅशनल सेंटरमध्ये (पीआयसी) ही परिषद होणार आहे. वर्ल्ड हिंदू इकॉनॉमिक फोरमचे संस्थापक व चेअरमन परमपूज्य स्वामी विज्ञानानंद, भारतीय जनता पार्टीच्या नेत्या श्वेता शालिनी, महाराष्ट्र इन्स्टिट्यूट ऑफ ट्रान्सफॉर्मेशनच्या नियामक मंडळाचे सदस्य दीपक करंजीकर, उद्योजक डॉ. मनोज पोचट यांच्या हस्ते या परिषदेचे उद्घाटन होणार आहे.

परिषदेमध्ये संरक्षण व अंतराळ क्षेत्रावरील सत्रात ‘रेअर अर्थ’चे भू-राजकीय महत्त्व, संरक्षण क्षेत्रातील उदयोन्मुख तंत्रज्ञान आणि बदलते युद्धतंत्र यांवर चर्चा होणार आहे. ‘अश्विनी मॅग्नेट्स’चे मुख्य कार्यकारी अधिकारी विक्रम धूत, अलिकॉन कास्टअलॉयचे हर्षवर्धन गुणे, आर्मामेंट अँड कॉम्बॅट इंजिनिअरिंगचे महासंचालक डॉ. प्रतिक किशोर, एमसीसीएआय'च्या संरक्षण व उच्च शिक्षण समितीचे संचालक प्रशांत जोगळेकर, ब्रिगेडियर वीरेश श्रीवास्तव आणि गोदरेजचे माजी व्यवसाय प्रमुख सुरेंद्र वैद्य मार्गदर्शन करणार आहेत.

‘विकसित भारत’ मोहिमेत संरक्षण व अंतराळ क्षेत्रातील सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योगांची भूमिका या विषयावर होणाऱ्या चर्चेत वरुण खंदारे, किरण जाधव (अक्युरेट कंट्रोल्स), रावळनाथ शेंडे (श्री रेफ्रिजरेशन), अजय भागवत (रेणू इलेक्ट्रॉनिक्स) आणि चेतन धारिया (अनंत डिफेन्स) सहभागी होणार आहेत. रेल्वे व पायाभूत सुविधा क्षेत्रावरील सत्रात महाराष्ट्र मेट्रो




रेलचे डॉ. हेमंत सोनवणे, क्रिसचे कार्यकारी संचालक सुमित गर्ग आणि आरडीएसओचे अरुण कुमार उद्योग क्षेत्रातील संधींवर भाष्य करणार आहेत. कृत्रिम बुद्धिमत्ता आणि एकात्मिक तंत्रज्ञान सत्रात डीआरडीओ अध्यक्षांचे तंत्रज्ञान सल्लागार मनीष भारद्वाज, ‘इंटेलिमेंट’चे प्रमुख प्रशांत पानसरे आणि ‘ॲक्टीन’चे मुख्य कार्यकारी अधिकारी विकास महाजन हे डिजिटल परिवर्तन, एआय आणि इंटरनेट ऑफ थिंग्जच्या बदलत्या परिदृश्यावर मार्गदर्शन करणार आहेत. हिंदू मंदिरांचे अर्थकारण या सत्रात लेखिका शेफाली, गिरीश कुलकर्णी आणि प्रशांत सचान धार्मिक पर्यटन, संस्कृती आणि रोजगारनिर्मिती यांवरील संधींवर चर्चा करणार आहेत.

‘ज्ञान, माध्यम आणि कथानक शक्ती’ या विषयावरील परिसंवादात डॉ. आशिष कुलकर्णी, कॅप्टन प्रवीण चतुर्वेदी, प्रसन्न जोशी आणि शहजाद पूनावाला सहभागी होणार आहेत. ‘एआय इन एज्युकेशन, जर्नालिझम अँड गव्हर्नन्स’ या विषयावरील चर्चेत अनुराग तिवारी, अनुपमा बसूर आणि जीटी सहभागी होणार असून शिक्षण, पत्रकारिता आणि प्रशासन क्षेत्रातील कृत्रिम बुद्धिमत्तेच्या वाढत्या वापराबाबत मार्गदर्शन करणार आहेत. याशिवाय शहरी विकास, औद्योगिक पायाभूत सुविधा, लॉजिस्टिक्स, विकास मार्गिका आणि पुरवठा साखळी व्यवस्थापन या विषयांवरही स्वतंत्र परिसंवाद आयोजित करण्यात आले आहेत.

परिषदेचा समारोप केंद्रीय सहकार व हवाई उड्डाण राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ व राज्याचे सांस्कृतिक व माहिती तंत्रज्ञान मंत्री आशिष शेलार यांच्या हस्ते होणार आहे. यावेळी ‘शक्ती स्टार्टअप शोकेस’चे आयोजन करण्यात आले असून संरक्षण, नागरी तंत्रज्ञान, माध्यम तंत्रज्ञान आणि डीप-टेक क्षेत्रातील नवउद्योजकांना आपले प्रकल्प सादर करण्याची संधी मिळणार आहे. समारोप सत्रात विविध क्षेत्रांतील मान्यवरांचा गौरव करण्यात येणार असून दिवसातील चर्चांचा आढावा आणि पुढील दिशा जाहीर केली जाणार आहे.

फोरमच्या पुणे जिल्हा चॅप्टरचे अध्यक्ष गौरव त्रिपाठी यांनी पत्रकार परिषदेत ही माहिती दिली. 'शक्ती समिट' मधून प्रत्यक्ष भागीदारी, गुंतवणुकीच्या संधी, स्टार्टअप नेटवर्किंग, क्षेत्रनिहाय सहकार्य आणि दीर्घकालीन आर्थिक संस्था निर्माण होण्याची अपेक्षा आहे. भविष्यात 'शक्ती समिट'ला वार्षिक प्रमुख परिषद म्हणून विकसित करण्याबरोबरच व्यवसाय सहकार्य, भांडवली उपलब्धता, युवा सहभाग आणि राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय संपर्क यासाठी सातत्यपूर्ण व्यासपीठ उभारण्याचा फोरमच्या पुणे जिल्हा शाखेचा मनोदय असल्याचे त्रिपाठी यांनी सांगितले.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### नागरिकांना ऑनलाईन सेवा विहीत वेळेत उपलब्ध करुन द्याव्यात : सुधाकर तेलंग

पुणे (दैनिक संध्या) : महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम २०१५ अन्वये नागरिकांना ऑनलाईन सेवा विहीत वेळेमध्ये पारदर्शकपणे उपलब्ध करुन देण्यात याव्यात; या सेवा नागरिकांना घरपोच देण्याबाबत कार्यवाही करावी अशा सूचना राज्य लोकसेवा आयोगाच्या पुणे विभागाचे राज्य आयुक्त सुधाकर तेलंग यांनी दिल्या. उपविभागीय अधिकारी कार्यालयात आयोजित आढावा बैठकीत ते बोलत होते. यावेळी बारामती एमआयडीसीचे प्रादेशिक अधिकारी हणुमंत पाटील, उप विभागीय अधिकारी उत्तम दिघे, तहसीलदार स्वप्नील रावडे, गट विकास अधिकारी किशोर माने, नगर परिषदेचे मुख्याधिकारी पंकज भुसे, आदी उपस्थित होते. श्री. तेलंग म्हणाले, महाराष्ट्र राज्यातील नागरिकांना राज्यशासनातर्फे दिल्या जाणाऱ्या सेवा पारदर्शक, गतिमान व कालबध्द पद्धतीने देण्याकरीता महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ पारित करण्यात आला आहे. त्यानुसार या कायद्यान्वये पुरविण्यात येणा-या सर्व सेवा सुविधांची प्रभावी अंमलबजावणी करावी. अधिनियमांच्या अनुषंगाने पारदर्शकता, उत्तरदायित्व, कालबध्द सेवा, कार्यक्षम सेवा, माहिती तंत्रज्ञानाचा वापर व ई-प्रशासन संस्कृतीचा अवलंब करणे याबाबत अधिकाऱ्यांना मार्गदर्शन केले. बारामती तालुक्यामध्ये एकूण १४७ इतके महा ई-सेवा व आपले सरकार सेवा केंद्र आहेत. यापैकी किमान ५ आदर्श आपले सरकार सेवा ग्रामपंचायत व आपले सरकार सेवा केंद्र तयार करावेत. तसेच सर्व महा ई-सेवा व आपले सरकार केंद्रांकरिता सेवा-सुविधाबाबतचे प्रशिक्षण लवकरच आयोजित करणेत येईल, असेही श्री. तेलंग म्हणाले. श्री. तेलंग यांनी मौजे माळेगाव बु. येथील महा ई-सेवा केंद्राची पाहणी केली. यावेळी तालुक्यातील सर्व शासकीय कार्यालयांचे विभाग प्रमुख उपस्थित होते.

### अभ्यासक्रमात नकाशा समाविष्ट करण्याच्या मागणीसाठी ‘महाराष्ट्र धर्म मोर्चा’चे आयोजन


पुणे (दैनिक संध्या) : हिंदू पदपादशाही आणि मराठा साम्राज्याच्या इतिहासाच्या गौरवासाठी शुक्रवारी, दि. २२ रोजी सकाळी ९ वाजता ‘महाराष्ट्र धर्म मोर्चा’चे आयोजन करण्यात आले आहे. लाल महाल ते जिल्हाधिकारी कार्यालय असा हा मोर्चा निघणार असून, छत्रपती शिवाजी महाराजांच्या वंशज सातारा गादीच्या छत्रपती वृषालीराजे भोसले या प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थित राहणार आहेत. ‘अटक ते कटक मराठा साम्राज्याचा नकाशा’ या संकल्पनेवर आधारित या मोर्चाद्वारे मराठा इतिहासाबाबत जनजागृती करण्यात येणार आहे. आयोजकांनी महाराष्ट्र शासनाने केंद्र सरकार आणि महाराष्ट्र सरकारशी संवाद साधून अटक येथील मराठा साम्राज्याच्या नकाशाची पुनर्स्थापना करावी, सदर विषयाला राज्य शासनाने अधिकृत भूमिका देऊन महाराष्ट्रातील जनतेच्या भावना केंद्र शासनापर्यंत ठामपणे पोहोचवाव्यात आदि मागण्यांसाठी हा मोर्चा काढण्यात येणार आहे. “ज्यांनी स्वाभिमान पाळला तोच खरा नकाशा आहे,” असा संदेश देत या मोर्चासाठी नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

### आई तुळजाभवानी मालिकेत रंगणार भव्य अलौकिक विवाहसोहळा

■ २८ एप्रिल ते २८ मे दररोज रात्री ९ वाजता कलर्स मराठीवर ‘विवाहसोहळा विशेष महिना’

मुंबई (दैनिक संध्या) : कलर्स मराठीवरील लोकप्रिय ‘आई तुळजाभवानी’ मालिकेत सध्या तुळजाभवानी आणि महादेवांच्या अलौकिक विवाहसोहळ्याची भव्य तयारी सुरू असून, संपूर्ण त्रिखंडातील देवी-देवतांच्या साक्षीने हा दिव्य सोहळा रंगणार आहे. ‘अलौकिक विवाहाचा अद्भुत महिना’ म्हणून साजऱ्या होत असलेल्या या विशेष पर्वाचे प्रसारण २८ एप्रिल ते २८ मे दररोज रात्री ९ वाजता कलर्स मराठीवर करण्यात येत आहे. या विवाहसोहळ्यात ब्रह्मा, विष्णूंसह तिन्ही लोकांतील ऋषी-मुनी, योग-योगिनी आणि विविध देवी-देवतांचा दिव्य लवाजमा पाहायला मिळणार आहे. जवळपास १५० ते १७५ कलाकार आणि तंत्रज्ञांची मोठी टीम गेल्या दोन महिन्यांपासून या विशेष पर्वासाठी कार्यरत आहे. भव्य सेट्स, आकर्षक सजावट, पारंपरिक दागदागिने आणि विविध रंगसंगतीतील ४० ते ४५ उंची साड्यांमुळे हा विवाहसोहळा अधिक दिमाखदार ठरणार आहे. मराठी टेलिव्हिजनवर पहिल्यांदाच इतक्या भव्य प्रमाणात ग्राफिक्सचा वापर करण्यात आला असून, प्रत्येक विवाहविधी अभ्यासपूर्वक आणि पौराणिक परंपरेनुसार साकारण्यात आला आहे. या विशेष पर्वात देवी आणि महादेवांच्या विवाहाची बातमी त्रिलोकात पसरते आणि हा विवाह सृष्टीच्या संतुलनाचा महत्त्वपूर्ण क्षण मानला जातो. वैकुंठातून विष्णू आणि लक्ष्मी महालात येतात. वधूसारखी सजलेली देवी पाहून लक्ष्मी आनंद व्यक्त करते, तर विष्णू आगामी संघर्षाची चाहूल देतात.

### हंगामा ओटीटीने नवीन ओरिजिनल सिरीज ‘लूटेरी दुल्हन’ लॉन्च केली




मुंबई (दैनिक संध्या) : भारतातील प्रमुख डिजिटल मनोरंजन प्लॅटफॉर्मपैकी एक असलेल्या हंगामा ओटीटी ने 19 मे 2026 रोजी आपली नवीन ओरिजिनल सिरीज ‘लूटेरी दुल्हन’ लॉन्च केली आहे. ही मध्य प्रदेशच्या पार्श्वभूमीवर आधारित एक तीक्ष्ण आणि रोमांचक क्राइम ड्रामा सिरीज आहे. या सिरीजमध्ये पूजा ए गोर आणि सांविका या दोन अभिनेत्री प्रमुख भूमिकेत आहेत, तसेच मनमोहन तिवारीही दमदार भूमिकेत आहेत. ही सिरीज एका मोठ्या आणि उच्च-दावाच्या तपासासोबतच दोन अशा महिलांचे प्रभावी चित्रण दाखवते, ज्या अशा जगात आपला मार्ग शोधत आहेत जे कदाचित कधीच त्यांच्या साठी बनलेले नव्हते. ‘लूटेरी दुल्हन’ ही कथा मध्य प्रदेशात घडणाऱ्या विचित्र गुन्ह्यांच्या मालिकेभोवती फिरते, जिथे काही नवरे लग्नानंतर रातोरात अचानक गायब होणाऱ्या नवरीकडून लुटले जातात. सुरुवातीला लोक याकडे दुर्लक्ष करतात, पण सब-इन्स्पेक्टर संध्या यादव यांना यात एक पॅटर्न दिसतो आणि त्या या प्रकरणाचा शोध घेण्यास सुरुवात करतात. संध्या यादव ही शिस्तबद्ध आणि हुशार पोलीस अधिकारी आहे, जिला स्वतःला सिद्ध करायचे आहे. समाजातील लग्नाबद्दलच्या दबावाचा सामना करत ती या तपासात पूर्णपणे झोकून देते. तपासादरम्यान तिची भेट मायाशी होते. एक अत्यंत हुशार आणि चतुर फसवणूक करणारी महिला, जिने जगण्यासाठी गुन्हेगारीचा मार्ग निवडला आहे. माया एक असे नेटवर्क चालवते जे कायद्यापेक्षा एक पाऊल पुढे राहून पुरुषांना आपला शिकार बनवते. जसे-जसे संध्या मायाच्या जवळ पोहोचते, हा केस अधिक वैयक्तिक बनत जातो आणि त्यामुळे तिच्या मनातील असुरक्षितता, एकाग्रता आणि ती ज्या स्त्रीचा पाठलाग करत आहे तिच्याबद्दलची अधिक खोल समज निर्माण होते. दुसरीकडे, माया देखील कायद्याला चकवत स्वतःचे स्वातंत्र्य मिळवण्याचा प्रयत्न करत असते. ही कथा दोन महिलांमधील तणावपूर्ण “कॅट-अँड-माउस” संघर्ष दाखवते. एक कायद्याचे पालन करणारी, तर दुसरी त्या कायद्याला आव्हान देणारी. दोघीही पुरुषप्रधान समाजात आपापल्या पद्धतीने जगण्यासाठी संघर्ष करत असतात. शेवटी प्रश्न असा उरतो — संध्या मायाला पकडू शकेल का, की माया पुन्हा एकदा व्यवस्थेला चकवत स्वतःचे स्वातंत्र्य मिळवेल?

# जागतिक पातळीवर पंतप्रधान ‘रिजेक्ट माल’!

## काँग्रेस नेते नाना पटोलेंची नरेंद्र मोदींवर टीका, म्हणाले- त्यांच्यामुळे देशाची मान शर्मेने खाली गेली

मुंबई (दै. संध्या) :

सर्वोच्च न्यायालयातील एका सुनावणीदरम्यान न्यायमूर्तींनी तरुण पिढीचा उल्लेख 'कॉकरोच' असा केल्याच्या पार्श्वभूमीवर आणि सोशल मीडियावर सुरू असलेल्या 'कॉकरोच जनता पार्टी'च्या ट्रेंडचा संदर्भ देत, काँग्रेसचे नेते नाना पटोले यांनी केंद्र सरकारवर जोरदार निशाणा साधला आहे. देशाच्या तरुण पिढीला अशा प्रकारची उपमा दिली जाणे अत्यंत दुर्दैवी असल्याचे सांगत, तरुणांचा सातत्याने होणारा अपमान आणि वाढती बेरोजगारी यामुळेच आजच्या तरुण वर्गात केंद्र सरकारविरोधात तीव्र असंतोष खदखदत असल्याचे पटोले यांनी स्पष्ट केले. नाना पटोले म्हणाले, देशातील सुशिक्षित तरुण-तरुणी आणि पदव्युत्तर पदव्या घेऊनही बेरोजगार बसले आहेत. दुसरीकडे पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि गृहमंत्री अमित शहा यांच्याकडून कधी त्यांना पकोडे तळण्याचा सल्ला दिला जातो, तर कधी इतर गोष्टी




सांगितल्या जातात. तरुणांचा हा पदोपदी होणारा अपमान आता त्यांच्या सहनशीलतेच्या पलीकडे गेला आहे. पंतप्रधानांमुळे जागतिक पातळीवर देशाची मान शरमेने खाली गेली आहे. जागतिक पातळीवर पंतप्रधान रिजेक्ट माल आहेत, अशी टीका नाना पटोले यांनी केली आहे. मोदींच्या परदेश दौरे आणि त्यात होणाऱ्या घडामोडींवरून नाना पटोले यांनी जोरदार हल्लाबोल केला आहे. पुढे बोलताना नाना पटोले म्हणाले, देवेंद्र फडणवीस नेहमी सांगतात की, पंतप्रधानांच्या परदेश दौऱ्यांमुळे देशाचा फायदा होतो, अनेक महत्त्वपूर्ण करार केले जातात. मात्र, आता फडणवीसांनीच यावर उत्तर दिले पाहिजे की, इटलीमध्ये जाऊन तिथल्या महिला राष्ट्राध्यक्षांना चॉकलेटची भेट देणे कितपत योग्य आहे? पंतप्रधानांचे हे वर्तन हास्यास्पद असल्याची टीका पटोले यांनी केली आहे. काही दिवसांपूर्वी राहुल गांधी यांच्यावर रिजेक्ट माल म्हणून देवेंद्र फडणवीसांनी टीका केली होती. त्यावर बोलताना नाना पटोले म्हणाले, जे राहुल गांधींना रिजेक्ट माल म्हणत होते, त्यांनी आता पहावे की, त्यांचे स्वतःचे पंतप्रधान आज जागतिक पातळीवर रिजेक्ट माल ठरत आहेत. पंतप्रधानांच्या अशा कृतींमुळे देशाची प्रतिष्ठा धुळीस मिळत आहे. पंतप्रधानांच्या परदेश दौऱ्यांमुळे देशावर मोठ्या प्रमाणावर आर्थिक भार पडत असून, या दौऱ्यांमधून देशाच्या पदरात काय पडले? असा सवालही त्यांनी उपस्थित केला आहे.

## ‘मॅच फिक्सिंग’च्या निर्माती पल्लवी गुर्जर यांना ‘बेस्ट डेब्यू प्रोड्युसर’ पुरस्कार

### सिने ड्रीम्स इंटरनॅशनल फिल्म फेस्टिव्हलमध्ये प्रतिष्ठेचा सन्मान; चित्रपटाच्या प्रभावी मांडणीचे कौतुक

मुंबई (दै. संध्या) :

सिने ड्रीम्स इंटरनॅशनल फिल्म फेस्टिव्हलतर्फे पीव्हीआर लिडो येथे आयोजित भव्य पुरस्कार सोहळ्यात ‘मॅच फिक्सिंग’ या चर्चित चित्रपटाच्या निर्माती पल्लवी गुर्जर यांना प्रतिष्ठेचा ‘बेस्ट डेब्यू प्रोड्युसर’ पुरस्कार प्रदान करण्यात आला.

‘मॅच फिक्सिंग’ या चित्रपटाद्वारे चित्रपटसृष्टीत दिलेल्या उल्लेखनीय योगदानाची दखल घेत त्यांचा गौरव करण्यात आला. प्रभावी विषय, उत्कंठावर्धक कथा आणि विचार करायला भाग पाडणाऱ्या सादरीकरणामुळे या चित्रपटाला प्रेक्षक आणि समीक्षकांकडून मोठी प्रशंसा मिळाली आहे. वास्तववादी मांडणी, दमदार पटकथा आणि उत्कृष्ट अभिनयामुळे हा चित्रपट समकालीन




सिनेमातील महत्त्वपूर्ण कलाकृती म्हणून ओळखला जात आहे.

पुरस्कार स्वीकारताना पल्लवी गुर्जर म्हणाल्या, “सिने ड्रीम्स इंटरनॅशनल फिल्म फेस्टिव्हलकडून ‘बेस्ट डेब्यू प्रोड्युसर’ पुरस्कार मिळणे हा माझ्यासाठी अत्यंत अभिमानाचा आणि आनंदाचा क्षण आहे. ‘मॅच फिक्सिंग’ हा चित्रपट प्रचंड मेहनत, समर्पण आणि उत्कटतेने तयार करण्यात आला आहे. हा सन्मान संपूर्ण कलाकार आणि तांत्रिक टीमचा आहे. त्यांच्या अथक परिश्रमामुळेच ही कथा प्रभावीपणे पडद्यावर साकारता आली.”

त्या पुढे म्हणाल्या, “या गौरवासाठी मी फेस्टिव्हलच्या परीक्षक मंडळाची तसेच प्रेक्षकांच्या प्रेम आणि पाठिंब्याची मनःपूर्वक आभारी आहे. ‘मॅच फिक्सिंग’चा प्रवास आव्हानात्मक असला तरी अत्यंत समाधानकारक होता. विविध वयोगटातील आणि पार्श्वभूमीतील प्रेक्षकांना भिडणारा आशयपूर्ण सिनेमा देण्याचा आमचा प्रयत्न होता.”

सिने ड्रीम्स इंटरनॅशनल फिल्म फेस्टिव्हलच्या आयोजकांनी सांगितले की, ““मॅच फिक्सिंग’च्या निर्माती पल्लवी गुर्जर यांना ‘बेस्ट डेब्यू प्रोड्युसर’ पुरस्कार प्रदान करताना आम्हाला आनंद होत आहे. चित्रपटाची प्रभावी कथा, उच्च दर्जाची निर्मिती आणि अर्थपूर्ण मांडणी यामुळे परीक्षक मंडळावर विशेष छाप पडली. संपूर्ण टीमचे आम्ही अभिनंदन करतो.”

सिने ड्रीम्स इंटरनॅशनल फिल्म फेस्टिव्हल हा जगभरातील स्वतंत्र चित्रपट निर्माते आणि नवोदित सर्जनशील प्रतिभेला व्यासपीठ उपलब्ध करून देणारा प्रतिष्ठित महोत्सव मानला जातो. विविध प्रकारच्या उत्कृष्ट चित्रपटांचे प्रदर्शन करताना नव्या कल्पना, ताजे विषय आणि नाविन्यपूर्ण कथनशैलीला प्रोत्साहन देणे हा या महोत्सवाचा मुख्य उद्देश आहे.

## कॉकरोच जनता पार्टीच्या माध्यमातून तरुणांची भडास व्यक्त

जालना (दै. संध्या) :

सध्याचे सत्ताधारी लोकशाहीला मानत नाहीत आणि विरोधक विरोधकांची भूमिका नीट पार पाडत नाहीत. त्यामुळे कॉकरोच जनता पार्टीच्या माध्यमातून तरूणांच्या मनातील भडास व्यक्त होत असल्याचं वक्तव्य ओबीसी नेते लक्ष्मण हाके यांनी केलं. एका क्लिकवर जग एकत्र आलं आहे. त्यामुळे सत्ताधाऱ्यांना घरी बसवायला तरुण मागे पुढे बघणार नाहीत असंही ते म्हणाले. सावध व्हा, नाहीतर तुमचा करेक्ट कार्यक्रम करतील, असा इशाराही त्यांनी सत्ताधाऱ्यांना दिला. तुम्ही Gen Z ला समजून घेतलं नाही, तर तुमच्यावर सुनामी येईल. ही सुनामी समुद्रातून येईल, आभाळातून येईल की अजून कुठल्या मार्गाने येईल, याची तुम्ही कल्पना करू शकत नाही, असा इशारा यावेळी लक्ष्मण हाके यांनी दिला. तुम्ही कॉर्पोरेट वर्ल्डचे राजकारण करत असाल, तर ग्रामीण भागामध्ये काय चालू आहे, दीन-दलित, भटक्या-विमुक्त आणि शेतकऱ्यांचे काय चालू आहे, याचाही विचार करा, असा सल्ला त्यांनी दिला. लक्ष्मण हाके म्हणाले की, "Gen Z ला सिव्हिक सेन्स द्या. त्यांच्याकडे सिव्हिक सेन्स (Civic Sense) नसेल तर इथे लोकशाही, मतदान आणि सत्ता परिवर्तन राहिले बाजूला... नेपाळमध्ये ज्या पद्धतीने उठाव आणि क्रांती झाली, त्याच पद्धतीने हा देशदेखील क्रांतीच्या उंबरठ्यावर उभा राहील. तरुण जनरेशनला समजून घ्या."

## शक्ती प्रेस लिमिटेडचा ४९.२८ कोटी रुपयांचा राइट्स इश्यू

नागपूर (दै. संध्या) :

■ २९ मेपर्यंत अर्जाची संधी

■ प्रिंटिंग व पॅकेजिंग व्यवसाय विस्तारासाठी उभारणार निधी; प्रति शेअर २० रुपये दर निश्चित

■ विद्यमान प्रत्येक १ इक्विटी शेअरमागे ७ राइट्स शेअर्सचा हक्क

■ राइट्स इश्यूसाठी अर्ज प्रक्रिया २९ मे २०२६ पर्यंत सुरू

■ राइट्स हक्क हस्तांतरणाची अंतिम तारीख २५ मे २०२६

■ विस्तार योजना आणि कार्यक्षमता वाढीसाठी निधीचा वापर

■ २०२५-२६ च्या पहिल्या नऊ महिन्यांत १२.७२ कोटी रुपयांचे उत्पन्न

मध्य भारतातील प्रिंटिंग आणि पॅकेजिंग क्षेत्रातील आघाडीची कंपनी असलेल्या शक्ती प्रेस लिमिटेडने विस्तार योजनांना गती देण्यासाठी आणि आर्थिक स्थिती अधिक मजबूत करण्याच्या उद्देशाने ४९.२८ कोटी रुपयांचा राइट्स इश्यू जाहीर केला आहे. या इश्यूसाठी अर्ज प्रक्रिया ७ मेपासून सुरू झाली असून ती २९ मे २०२६ रोजी बंद होणार आहे. या राइट्स इश्यूअंतर्गत कंपनी १० रुपये दर्शनी मूल्य असलेले पूर्ण भरलेले २,४६,४१,४०० इक्विटी शेअर्स जारी करणार आहे. प्रति शेअर २० रुपये दराने हा इश्यू खुला करण्यात आला असून विद्यमान भागधारकांना प्रत्येक १ इक्विटी शेअरमागे ७ राइट्स शेअर्स घेण्याचा हक्क देण्यात आला आहे. भागधारकांना त्यांच्या राइट्स हक्कांचे स्टॉक एक्सचेंजवर हस्तांतरण करण्यासाठी २५ मे २०२६ ही अंतिम तारीख निश्चित करण्यात आली आहे. विशेष म्हणजे, १४ मे २०२६ रोजी कंपनीच्या शेअरची बाजारातील किंमत सुमारे २६.८५ रुपये होती, जी राइट्स इश्यूसाठी निश्चित केलेल्या २० रुपयांच्या दरापेक्षा अधिक आहे. कंपनीने स्पष्ट केले की, या इश्यूमधून मिळणारा निधी उत्पादन क्षमता वाढवणे, कामकाजाची कार्यक्षमता सुधारणे तसेच प्रिंटिंग आणि पॅकेजिंग व्यवसायातील विस्तार योजनांसाठी वापरण्यात येणार आहे.

## देशाची एकात्मता व अखंडतेसाठीच इंदिराजी, राजीवजी गांधी यांचे बलिदान

पुणे (दै. संध्या) :

■ जेष्ठ नेते ऊल्हासदादा पवार

■ राजीव गांधी स्मारक समिती तर्फे “भारतरत्न राजीव गांधी” स्मृती अभिवादन कार्यक्रम संपन्न

■ ‘पंतप्रधान पदाची उंची व देशाची प्रतिष्ठा’ भारतरत्न राजीव गांधी यांनी आपल्या कार्यकाळात स्व कर्तृत्वाने वाढवली - गोपाळदादा तिवारी



स्वातंत्र्योत्तर भारतात पं. नेहरू, शास्त्रीजी, इंदीराजीं पासून आलेला आधुनिकतेचा व तंत्रज्ञानाचा वसा आणि वारसा राजीव गांधींनी तसाच पुढे नेला. महात्मा गांधी, सरदार पटेलांच्या ‘स्वातंत्र्य लढ्याचा’ मुळ हेतू हा देशाचे ऐक्य, अखंडता, एकात्मता, समता, मानवता, सार्वभौमत्व व लोकशाही तत्वांची बूज प्रस्थापित करणे व देशातील शेवटच्या माणसाचा सर्वांगीण विकास हाच होता. यासाठी इंदिराजी, राजीवजी गांधी यांनी प्रसंगी प्राणांची आहुती दिली हे गांधी कुटुबियांचे योगदान न विसरण्याजोगे आहे असे उद्गार काँग्रेस चे जेष्ठ नेते उल्हासदादा पवार यांनी भारतरत्न दिवंगत पंतप्रधान राजीव गांधीं यांना अभिवादनपर कार्यक्रमात केले.

कात्रज येथील प्राणी संग्रहालया समोरील राजीव गांधी यांच्या प्रतिमेस पुष्पहार - अभिवादन प्रसंगी ते बोलत होते. त्यांचे हस्ते राजीव गांधी यांचे प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला. या वेळी कवयित्री श्रध्दा बेलसरे यांची स्व राजीव गांधी यांचे वरील कविता ही उल्हास दादांनी वाचून दाखवली..! राजीव गांधींनी अल्पकाळात देशाचे सामर्थ्य, प्रतिष्ठा व पंतप्रधानपदाची उंची’ आपल्या कर्तुत्वाने वाढवली व जगात अलीप्ततावादी राष्ट्रांचे नेतृत्व केल्याचे” राजीव गांधी स्मारक समिती’चे संस्थापक अध्यक्ष गोपाळदादा तिवारी यांनी स्वागत प्रास्ताविक प्रसंगी सांगितले. ते पुढे म्हणाले की देशास २१ व्या शतकाची दृष्टी दाखवणाऱ्या राजीव गांधींनी देशात आणलेल्या ‘संगणक व मोबाईल क्रांती’ मुळेच कोरोना सारख्या संकटात ही देश ‘वर्क फ्रॅाम होम’ करू शकला, याचे निर्विवाद श्रेय राजीव गांधींनाच जाते.

या प्रसंगी.. पुणे जिल्हा अध्यक्ष लहुआण्णा निवंगुणे, राजीवजी जगताप, सुभाषशेठ थोरवे, रामभाऊ शेडगे, नंदुशेठ पापळ, आबा जगताप, भोला वांजळे, द स पोळेकर, धनंजय भिलारे, अॅड स्वप्नील जगताप, सुभाष जेधे, अशोक काळे, गणेश शिंदे, अॅड सचिन अडसुळ, संजय अभंग, गणेश मोरे, अॅड विजय तिकोणे, शिवाजी भोईटे, महेश हराळे, सौ मनिषा फाटे, रमेश सोनकांबळे, विकास दवे, ऊदय लेले, राजेश सुतार, दिलीप लोळगे, गोरख पळसकर, नरसिंह अंदोली, बाळासाहेब पवार, हरिदास अडसुळ, बाळासाहेब प्रताप, इ कार्यकर्ते मित्र परीवार, पुणे उपस्थित होते.

या वेळी मा उल्हासदादा पवार व पुणे जिल्हा दक्षीण अध्यक्ष लहुआण्णा निवंगुणे यांना शाल व तुळशीचे रोप देऊन राजीव जगताप व सुभाष थोरवे यांचे हस्ते सन्मान करण्यात आला. संजय अभंग, धनंजय भिलारे, गणेश मोरे यांनी कार्यक्रमाचे आयोजन केले तर भोला वांजळे यांनी आभार प्रदर्शन केले.

## इंदिरा युनिव्हर्सिटीने ट्विशा शर्माच्या स्मरणार्थ ‘इंदिरा स्त्री’ उपक्रम सुरू

पुणे (दै. संध्या) :

इंदिरा युनिव्हर्सिटी, पुणे येथे आज ट्विशा शर्मा हिच्या स्मरणार्थ प्रार्थना सभेचे आयोजन करण्यात आले. ट्विशा ही इंदिरा युनिव्हर्सिटीची माजी विद्यार्थिनी आणि तरुण मुलगी होती. हुंडाबळीमुळे झालेल्या तिच्या दुर्दैवी निधनाने संपूर्ण विद्यापीठाला मोठा धक्का बसला आहे. या घटनेमुळे दुःखातून कृतीकडे वाटचाल करण्याची प्रेरणा सर्वांना मिळाली आहे.

या प्रार्थना सभेत ट्विशाचे आई-वडील ऑनलाईन सहभागी झाले होते. सभागृहात काही क्षण शांतता पाळण्यात आली. त्या शांततेत अनेक भावना दडलेल्या होत्या .

इंदिरा युनिव्हर्सिटीच्या प्रेसिडेंट तसेच इंदिरा ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट्सच्या चेअरपर्सन आणि मुख्य मार्गदर्शिका डॉ. तरिता शंकर यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या या सभेत ‘इंदिरा स्त्री’ या विशेष




सहाय्य उपक्रमाची अधिकृत सुरुवात करण्यात आली. हा उपक्रम युनिव्हर्सिटीशी संबंधित सर्व महिलांसाठी सुरू करण्यात आला असून, त्यांच्या आयुष्यातील कोणत्याही टप्प्यावर त्यांना मदत, मार्गदर्शन आणि आधार मिळावा हा त्यामागील उद्देश आहे. शिक्षण पूर्ण झाल्यानंतरही हा आधार कायम राहणार आहे. या कार्यक्रमाला प्राध्यापक, विद्यार्थी आणि संस्थेतील वरिष्ठ सदस्य उपस्थित होते. सर्वांनी ट्विशाच्या निधनाबद्दल दुःख व्यक्त केले. मात्र, फक्त दुःख व्यक्त करून थांबणे पुरेसे नाही, तर समाजात बदल घडवण्यासाठी कृती करणेही तितकेच महत्त्वाचे आहे, याची जाणीव सर्वांना झाली.

डॉ. तरिता शंकर म्हणाल्या, “ट्विशासोबत जे घडले, ते कोणत्याही मुलीसोबत घडू नये. पण अशा घटना आपल्या समाजात अजूनही घडत आहेत आणि अनेकदा त्याबद्दल कोणी बोलत नाही. आज आम्ही एक स्पष्ट संदेश देत आहोत की, तुम्ही आमच्या कुटुंबाचा भाग असाल तर तुम्हाला कधीही एकटे सोडले जाणार नाही. हे फक्त एक आश्वासन नाही, तर आजपासून आम्ही ते प्रत्यक्षात पाळायला सुरुवात करत आहोत.” हुंडाबळीमुळे आजही भारतात अनेक महिलांचे जीव जात आहेत. अनेक वेळा अशा घटना समाजाच्या भीतीमुळे किंवा दबावामुळे दडपल्या जातात आणि त्यावर खुलेपणाने चर्चा होत नाही. आजची ही सभा म्हणजे अशा घटनांकडे दुर्लक्ष न करण्याचा आणि त्याविरोधात आवाज उठवण्याचा ठाम संदेश होता. ‘इंदिरा स्त्री’ या उपक्रमाद्वारे महिलांना भावनिक आधार, समुपदेशन, मानसिक आरोग्य सहाय्य, करिअर मार्गदर्शन, कायदेशीर मदतीसाठी मार्गदर्शन, तक्रार निवारण आणि आपत्कालीन मदत दिली जाणार आहे. कोणत्याही महिलेला तिच्या अडचणींमध्ये एकटे वाटू नये, यासाठी समाजाने अधिक संवेदनशील आणि जबाबदार होण्याची गरज असल्याचे यावेळी अधोरेखित करण्यात आले.

या सभेत वक्त्यांनी हुंड्यासाठी होणाऱ्या हिंसाचाराचे गंभीर वास्तव मांडले. शिक्षण पूर्ण करून कॅम्पस सोडल्यानंतरही अनेक महिलांना एकटेपणा आणि मानसिक तणावाचा सामना करावा लागतो, यावरही त्यांनी प्रकाश टाकला. तसेच संस्थेच्या चौकटीबाहेरही महिलांना आधार देणारी मजबूत मदत व्यवस्था उभी करण्याची गरज त्यांनी व्यक्त केली. त्यांचा संदेश अतिशय स्पष्ट होता — ही सभा ट्विशाला फक्त श्रद्धांजली देण्यासाठी नव्हती, तर तिच्या नावाने केलेली एक ठाम मागणी होती की, तिचा मृत्यू शांततेत विसरला जाणारा आणखी एक आकडा बनू नये.

ट्विशाच्या निधनाने एक महत्त्वाची गोष्ट समोर आली आहे — एखाद्या महिलेकडे सर्व पर्याय संपल्यानंतर मदत मिळून उपयोग होत नाही. तिला अडचणीत सापडण्यापूर्वीच आधार, मार्गदर्शन आणि साथ मिळणे गरजेचे आहे. डॉ. तरिता शंकर यांनी संस्थेशी जोडलेल्या सर्व महिलांसाठी भावनिक संदेश देताना सांगितले, “जर तुम्ही कोणत्याही अडचणीत असाल, घाबरलेले असाल किंवा मनातील दुःख कुणाशीही शेअर करू शकत नसाल, तरी आम्ही तुमच्यासोबत आहोत. तुम्ही या लढाईत एकट्या नाही आहात. फक्त तुमचा आवाज उठवा, आम्ही आधीपासूनच तुमच्या पाठीशी उभे आहोत हे तुम्हाला दिसेल. या कुटुंबातील कोणत्याही महिलेला तिची लढाई शांततेत एकटीने लढावी लागणार नाही.”

## थोडक्यात पण महत्वाचे...



### ‘जॉगर्स पार्क’ परिसरातील अनधिकृत बांधकामावर महापालिकेची कारवाई

पिंपरी (दैनिक संध्या) : पिंपरी चिंचवड महानगरपालिकाच्या फ क्षेत्रीय कार्यालयाच्या वतीने प्रभाग क्र.११ येथील जॉगर्स पार्क उद्यान परिसरातील अनधिकृत बांधकामांवर कारवाई करत सुमारे १५०० चौरस मीटर क्षेत्र अतिक्रमणमुक्त करण्यात आले. शहरातील सार्वजनिक जागा मोकळ्या ठेवणे आणि अनधिकृत बांधकामांवर नियंत्रण ठेवणे या उद्देशाने ही कारवाई करण्यात आली. आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांच्या निर्देशानुसार आणि अतिरिक्त आयुक्त तृप्ती सांडभोर यांच्या नियंत्रणाखाली करण्यात आलेल्या या कारवाईदरम्यान उप आयुक्त अतुल पाटील, प्रशासन अधिकारी महादेव बोरे, बांधकाम परवानगी विभागाचे उप अभियंता किरण सगर व कनिष्ठ अभियंता प्रताप मोरे, तसेच उद्यान स्थापत्य व क्रीडा विभागाचे कनिष्ठ अभियंता वैभव विटकरे उपस्थित होते. याशिवाय बांधकाम परवानगी व अनधिकृत बांधकाम नियंत्रण विभागातील स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक (बीट निरीक्षक) साक्षी जांभुळकर, निकिता भोईटे, विकास वारभुवन आणि रूपक शिनगारे यांनीही कारवाईत सक्रिय सहभाग नोंदविला. सदर कारवाईसाठी फ, अ आणि क क्षेत्रीय कार्यालयांमधील एकूण ५७ महाराष्ट्र सुरक्षा दलाचे जवान तैनात करण्यात आले होते. तसेच १७ अतिक्रमण पोलीस, ६ जेसीबी मशीन, ८ मजूर आणि ३ वाहन चालक यांच्या सहाय्याने ही कारवाई प्रभावीपणे पार पाडण्यात आली.




### रावेत गोळीबार प्रकरणी उत्तराखंडमधून बिश्नोई गँगच्या तिघांना अटक

पिंपरी (दैनिक संध्या) : रावेत येथील फर्निचर व्यापाऱ्यावर बिश्नोई गँगच्या नावाने करण्यात आलेल्या गोळीबार प्रकरणी पिंपरी-चिंचवड पोलिसांना मोठे यश मिळाले आहे. या प्रकरणात अराजू बिश्नोई याच्याशी संबंधित असलेल्या तिघांना उत्तराखंडमधून अटक करण्यात आली आहे. पिंपरी-चिंचवड पोलिसांच्या गुंडा विरोधी पथकाचे प्रमुख सहाय्यक पोलीस निरीक्षक हरीश माने आणि त्यांच्या पथकाने ही कारवाई केली. अटक करण्यात आलेल्यांमध्ये प्रवीण राम निवासे (वय २३, हरियाणा), पंकज कुलदीप रहाठी (वय २१, हरियाणा) आणि सागर अजय पाल (वय २१, हरियाणा) यांचा समावेश आहे. सूत्रांच्या माहितीनुसार, आरोपींना उत्तराखंडमधून ताब्यात घेण्यात आले असून त्यांना रात्री उशिरा पुण्यात आणण्यात येणार आहे. या प्रकरणात आणखी काही धागेदोरे पोलिसांच्या हाती लागण्याची शक्यता असून पुढील तपास सुरू आहे.

### मालमत्ताकरात पालिकेकडून विविध सवलती, 30 जूनपर्यंत कर भरल्यास 10% सवलत

पिंपरी (दैनिक संध्या) : पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या करसंकलन व करआकारणी विभागाच्या वतीने शहरातील मालमत्ताधारकांसाठी मालमत्ताकर भरण्यावर विविध सवलती जाहीर करण्यात आल्या असून, नागरिकांनी या सवलतींचा लाभ घेत वेळेत मालमत्ता कराचा भरणा करावा, असे आवाहन उपायुक्त सचिन पवार यांनी केले आहे. ३० जूनपर्यंत संपूर्ण कराचा ऑनलाईन भरणा करणाऱ्या नागरिकांना १० टक्क्यांपर्यंत सवलत दिली जात असून, कुटुंबातील महिलेच्या नावावर असलेल्या एका निवासी मालमत्तेला ३० टक्क्यांपर्यंत विशेष सवलतीचा लाभ देण्यात येत आहे. महापालिकेच्या करसंकलन मोहिमेला नागरिकांकडून चांगला प्रतिसाद मिळत असून, आतापर्यंत तब्बल एक लाख ८२ हजार ३३५ मालमत्ताधारकांनी विविध कर सवलतींचा लाभ घेतला आहे. यामध्ये मोठ्या प्रमाणावर नागरिकांनी ऑनलाईन पद्धतीने कर भरून १० टक्के सवलतीचा लाभ घेतला आहे. नागरिकांना घरबसल्या सुलभ पद्धतीने कर भरण्याची सुविधा उपलब्ध करून दिल्यामुळे ऑनलाइन भरण्याकडे कल वाढत असल्याचे दिसून येत आहे. ऑनलाईन कर भरणा प्रणालीमुळे नागरिकांचा वेळ वाचत असून, पारदर्शक व सोयीस्कर पद्धतीने कर भरण्यास प्रोत्साहन मिळत असल्याचे महापालिकेच्या कर संकलन विभागाने स्पष्ट केले आहे. तसेच अधिकाधिक नागरिकांनी कर सवलतींचा लाभ घ्यावा आणि थकीत कराचा भरणा करावा, यासाठी महापालिकेच्या कर संकलन विभागाकडून व्यापक जनजागृती मोहीम राबविण्यात येत आहे. यामध्ये एसएमएस, कॉलिंग, होर्डिंग, समाज माध्यमे तसेच विविध जनजागृती उपक्रमांच्या माध्यमातून नागरिकांपर्यंत माहिती पोहोचविण्याचे काम सुरू आहे.


# विधान परिषदेसाठी संदीप वाघेरे इच्छुक
## राष्ट्रवादीच्या आक्रमक चेहऱ्याला संधी मिळणार?

पिंपरी (दै. संध्या)

पिंपरी-चिंचवडच्या राजकारणात आक्रमक, आणि संघर्षशील नेतृत्व म्हणून ओळख असलेले राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नगरसेवक संदीप वाघेरे यांनी विधान परिषदेच्या स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघातून उमेदवारीसाठी पक्ष नेतृत्वाकडे अधिकृत मागणी केली आहे. पुणे महानगर स्थानिक प्राधिकरण मतदारसंघातून निवडणूक लढविण्याची इच्छा त्यांनी व्यक्त केल्याने राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आले आहे.

पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेत राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष विरोधी बाकावर असताना पक्षाची भूमिका आक्रमकपणे आणि ठामपणे मांडण्यात संदीप वाघेरे नेहमीच अग्रेसर राहिले आहेत. विविध नागरिकांच्या प्रश्नांवर त्यांनी सभागृहात सातत्याने आवाज उठवत सत्ताधाऱ्यांना धारेवर धरले आहे. त्यांच्या याच प्रभावी आणि संघर्षशील भूमिकेच्या जोरावर त्यांनी पक्षाकडे विधान परिषदेच्या उमेदवारीची मागणी केली असल्याचे बोलले जात आहे.

संदीप वाघेरे हे पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेत दुसऱ्यांदा निवडून आलेले नगरसेवक असून नुकतेच त्यांनी भाजपमधून राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश केला आहे. दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निकटवर्तीयांपैकी एक म्हणून त्यांची ओळख आहे. भाजपमध्ये असतानाही अजित पवार यांच्याशी त्यांचे जवळचे संबंध आणि





विश्वासाचे नाते कायम असल्याचे राजकीय वर्तुळात मानले जाते.

दरम्यान, संदीप वाघेरे यांना विधान परिषदेची उमेदवारी मिळाल्यास पिंपरी-चिंचवड शहरात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला मोठी उभारी मिळू शकते, असा विश्वास व्यक्त केला जात आहे. पिंपरी-चिंचवड महानगरपालिका हा राष्ट्रवादी काँग्रेसचा एकेकाळचा अभेद्य बालेकिल्ला मानला जात होता. तो पुन्हा काबीज करण्यासाठी विधान परिषद ही मोठी राजकीय संधी ठरू शकते, असे मत स्वतः संदीप वाघेरे यांनी व्यक्त केले आहे.

पिंपरी-चिंचवड शहराची उभारणी, विकास आणि शहराचा नावलौकिक वाढविण्यात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा मोठा वाटा असून उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी या शहराला मूर्त स्वरूप दिले, असेही वाघेरे यांनी नमूद केले. त्यामुळे राष्ट्रवादी काँग्रेसला पुन्हा बळकट करण्यासाठी पिंपरी-चिंचवड शहरातून विधान परिषदेत आक्रमक आणि प्रभावी चेहरा म्हणून संदीप वाघेरे यांना संधी मिळणार का? याबाबत आता राजकीय चर्चांना वेग आला आहे.

## माजी पंतप्रधान दिवंगत राजीव गांधी यांच्या पुण्यतिथीनिमित्त पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने अभिवादन

पिंपरी (दै. संध्या)

"आम्ही भारताचे नागरिक, आपल्या देशाच्या अहिंसा व सहिष्णुतेच्या परंपरेविषयी दृढ निष्ठा बाळगून या द्वारे, सर्व प्रकारच्या दहशतवादाचा व हिंसाचाराचा आमच्या सर्व शक्तीनिशी मुकाबला करण्याची गांभिर्यपूर्वक प्रतिज्ञा करत आहोत. तसेच आम्ही सर्व मानवजातींमध्ये शांती, सामाजिक एकोपा आणि सामंजस्य टिकवू व वर्धिष्णू करू आणि मानवी जीवित मूल्ये धोक्यात आणणाऱ्या या विघटनकारी शक्तींचा प्रतिकार करू, अशी शपथ महानगरपालिकेच्या पदाधिकारी, अधिकारी, कर्मचारी यांच्यासह शेकडो युवकांनी घेतली.



यावेळी देशातील दहशतवाद व हिंसाचार विरोधात एकत्र येऊन देशाच्या अखंडतेसाठी लढा देण्याचा निर्धारही उपस्थितांनी व्यक्त केला.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने भारताचे माजी पंतप्रधान भारतरत्न राजीव गांधी यांच्या पुण्यतिथी निमित्त महापालिकेच्या मुख्य प्रशासकीय इमारतीमधील त्यांच्या प्रतिमेस महापौर रवि लांडगे यांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.

अभिवादनाच्या वेळी उपमहापौर शर्मिला बाबर, सहशहर अभियंता बापूसाहेब गायकवाड, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक यांच्यासह महानगरपालिका कर्मचारी, सामाजिक कार्यकर्ते व नागरिक उपस्थित होते.

माजी पंतप्रधान भारतरत्न राजीव गांधी यांचा पुण्यतिथी दिवस हा दरवर्षी दहशतवाद व हिंसाचार विरोधी दिन म्हणून पाळला जातो. तसेच या दिवशी दहशतवाद व हिंसाचार विरोधी शपथ देखील घेतली जाते. त्या अनुषंगाने उपस्थितांनी आज दहशतवाद व हिंसाचार विरोधी शपथ घेतली. प्रफुल्ल पुराणिक यांनी शपथेचे वाचन केले.

## महापौर लांडगेंना जीवे मारण्याची धमकी; थेट सिपी ऑफिसमध्ये फोन आल्याने खळबळ

पिंपरी (दै. संध्या)



पिंपरी-चिंचवडचे महापौर रवि लांडगे यांना जीवे मारण्याची धमकी देण्यात आल्याने शहरात एकच खळबळ उडाली आहे. पिंपरी-चिंचवड पोलिसांच्या ‘समाधान’ हेल्पलाईनवर फोन करून ही धमकी देण्यात आली.

महापौर रवि लांडगे यांनी दिलेल्या माहितीनुसार, आशिष जमदाडे-पाटील नावाच्या व्यक्तीने हा फोन केला होता. संबंधित व्यक्ती काही महिन्यांपूर्वी क्रीडा विषयक कामानिमित्त महापौरांना दोन वेळा भेटली होती. मात्र, त्यानंतर अचानक थेट जीवे मारण्याची धमकी दिल्याने पोलिस यंत्रणा सतर्क झाली.

या प्रकरणाची गंभीर दखल घेत भोसरी पोलिसांनी आशिष जमदाडे-पाटील याला ताब्यात घेऊन चौकशी केली. चौकशीदरम्यान संबंधित व्यक्ती मानसिक तणावाखाली असल्याचे निदर्शनास आले. त्यामुळे त्याला समज देऊन सोडण्यात आल्याची माहिती महापौर रवी लांडगे यांनी दिली.

दरम्यान, या घटनेमुळे राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आले असून पोलिसांकडून पुढील तपास सुरू आहे.



## राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर जयंती महोत्सव समितीच्या अध्यक्षपदी खरात यांची निवड

पिंपरी (दै. संध्या)

राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर जयंती महोत्सव समिती पिंपरी-चिंचवड शहराच्या 2026-2027 या कार्यकाळासाठी अशोक गोरख खरात यांची सर्वानुमते अध्यक्षपदी निवड करण्यात आली. रविवारी (दि.17 मे) काळभोर नगर येथे झालेल्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. बैठकीचे अध्यक्षस्थान मावळत्या अध्यक्षा विनाताई सोनवलकर यांनी भूषविले.

यावेळी मावळत्या अध्यक्षा विनाताई सोनवलकर यांनी अध्यक्षपदाची सूत्रे नवनिर्वाचित अध्यक्ष अशोक खरात यांच्याकडे सुपूर्त केली. आगामी अहिल्यादेवी होळकर जयंती महोत्सव उत्साहात आणि नियोजनबद्ध पद्धतीने पार पडावा, यासाठी विविध समित्यांची स्थापना करण्यात आली.

जेवण व्यवस्था समिती प्रमुखपदी बिभीषण घोडके, बॅनर व्यवस्था समिती प्रमुखपदी गणेश खरात, सोशल मीडिया समिती प्रमुखपदी विठ्ठल देवकाते, व्यासपीठ व बैठक व्यवस्था समिती प्रमुखपदी महावीर काळे सर, फटाके व आतिषबाजी समिती प्रमुखपदी अशोक खरात, कार्यक्रम पत्रिका व पत्रक व्यवस्था प्रमुखपदी राजाभाऊ दुर्गे, मिरवणूक व्यवस्था प्रमुखपदी अरुण पाडुळे, सत्कार समिती प्रमुखपदी आशाताई काळे, झेंडे व्यवस्थापन समिती प्रमुखपदी संजय नाईकवाडे, पुरस्कार्थी निवड समिती प्रमुखपदी संतोष पांढरे तर अहिल्यादेवी स्मारकाजवळील सत्कार समिती प्रमुखपदी रेखा दूधभाते यांची नियुक्ती करण्यात आली.

या बैठकीला विनाताई सोनवलकर, अशोक खरात, राजाभाऊ दुर्गे, धनंजय तानले, महावीर काळे, संतोष पांढरे, अरुण पाडुळे, आशा काळे, सोनाताई गडदे, रेखा दूधभाते, गणेश खरात, विठ्ठल देवकाते, नरेंद्र चऱ्हाटे, बिभीषण घोडके, सुरेश चौधरी, संजय नाईकवाडे, शंकर दातीर, हिराकांत गाडेकर, नवनाथ देवकाते यांच्यासह धनगर समाजातील अनेक पदाधिकारी, कार्यकर्ते व महिला भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

## शहरात ‘मेडिकल बंद’ला १०० टक्के प्रतिसाद; २५०० हून अधिक औषध दुकाने ठेवली बंद...

पिंपरी (दै. संध्या)

विविध प्रलंबित मागण्यांकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी बिधवारी (दि.२०) पुकारण्यात आलेल्या ‘मेडिकल बंद’ आंदोलनाला पिंपरी-चिंचवड शहरात १०० टक्के प्रतिसाद मिळाला. शहरातील २५०० हून अधिक औषध विक्रेत्यांनी मेडिकल स्टोअर्स पूर्णपणे बंद ठेवून या आंदोलनात सहभाग नोंदवला.

मुख्य बाजारपेठांसह अंतर्गत भागातील मेडिकल दुकाने कडकडीत बंद असल्याने रस्त्यांवर शुकशुकाट पाहायला मिळाला. या आंदोलनामुळे रुग्णांचे आणि त्यांच्या नातेवाईकांचे हाल होऊ नयेत, यासाठी केमिस्ट असोसिएशन आणि प्रशासनाकडून विशेष हेल्पलाईन सुरू करण्यात आली आहे. यावेळी फार्मासिस्ट म्हणून महापालिकेचे महापौर रवी लांडगे यांनी ऑनलाइन औषध विक्रीस ठाम विरोध दर्शविला आहे.




शहरातील केमिस्ट अँड ड्रगिस्ट असोसिएशनच्या आवाहनाला प्रतिसाद देत सकाळपासूनच सर्व व्यापाऱ्यांनी आपली दुकाने बंद ठेवली. भोसरी, पिंपरी, चिंचवड, निगडी, वाकड, सांगवी आणि हिंजवडी यांसारख्या प्रमुख भागांतील तब्बल २५०० पेक्षा जास्त औषध दुकानांवर ‘आज मेडिकल बंद राहील’ असे फलक पाहायला मिळाले. असोसिएशनच्या वतीने सांगण्यात आले की, ऑनलाइन औषध विक्रीला प्रशासनाकडून मिळणारे अभय, औषध प्रशासनाचा कथित त्रास आणि इतर व्यावसायिक मागण्यांसाठी हे लाक्षणिक आंदोलन करण्यात आले आहे. सर्व औषध विक्रेत्यांनी एकत्र येत प्रशासनाविरोधात तीव्र घोषणाबाजी केली आणि आपल्या मागण्यांचे निवेदन जिल्हाधिकाऱ्यांना सादर केले.

अचानक पुकारलेल्या बंदमुळे नागरिकांची काही प्रमाणात गैरसोय झाली. मात्र, रुग्णांची अडचण होऊ नये यासाठी काही २४ तास सुरू असलेली मेडिकल दुकाने आणि हॉस्पिटल संलग्न फार्मसी सुरू ठेवण्यात आल्या होत्या. तातडीच्या औषधांसाठी हेल्पलाईन क्रमांकही जारी करण्यात आले होते, त्याद्वारे रुग्णांना जवळच्या उपलब्ध मेडिकलची माहिती देण्यात येत होती. तसेच गंभीर रुग्णांना घरपोच औषध सेवा देण्याची व्यवस्थाही काही ठिकाणी स्वयंसेवकांच्या माध्यमातून करण्यात आली आहे.

## पिंपरी-चिंचवड शहर वाहतूक कोंडीमुक्त करण्यासाठी सक्षम ‘पार्किंग पॉलिसी’ लवकरच – अभिषेक बारणे

पिंपरी (दै. संध्या)



> पिंपरी-चिंचवड वेगाने वाढणारे शहर असून येथील वाहतूक कोंडीचा प्रश्न सोडवण्यासाठी केवळ तात्पुरते उपाय करून चालणार नाही, तर एक शाश्वत आणि शिस्तबद्ध यंत्रणा उभारण्याची गरज आहे. याच उद्देशाने आम्ही या नव्या पार्किंग धोरणावर सविस्तर चर्चा केली आहे. बीआरटीएस विभागाच्या सादरीकरणानंतर त्यात अधिक सुधारणा करण्यासाठीच्या सूचना केल्या आहेत, ज्या या धोरणाला अधिक परिपूर्ण बनवतील. हे धोरण राबवताना केवळ वाहतूक सुरळीत करणे एवढाच हेतू नसून, पादचारी आणि सायकल चालवणाऱ्यांनाही सुरक्षित रस्ते मिळवून देणे हा आमचा प्रयत्न आहे. ऑन-स्ट्रीट आणि ऑफ-स्ट्रीट पार्किंगचे दर ठरवताना सर्वसामान्य नागरिकांवर आर्थिक भार पडणार नाही याची पूर्ण काळजी घेतली जाईल. सर्व तांत्रिक त्रुटी दूर करून, ‘आपले शहर, आपली शिस्त’ या भावनेतून हे उत्तम पार्किंग धोरण लवकरच नागरिकांच्या सेवेत आणले जाईल.
>
> – अभिषेक बारणे, स्थायी समिती सभापती, पिंपरी चिंचवड महापालिका.

शहरातील वाढती वाहनांची संख्या आणि त्यामुळे निर्माण होणारी वाहतूक कोंडी यावर कायमस्वरूपी उपाययोजना करण्यासाठी प्रशासकीय पातळीवर वेगवान हालचाली सुरू झाल्या आहेत. शहरात एक सक्षम आणि शिस्तबद्ध ‘पार्किंग पॉलिसी’ तयार करण्यासाठी बीआरटीएस विभाग आणि महापालिकेच्या संबंधित वरिष्ठ अधिकाऱ्यांसोबत नुकतीच एक महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. महापालिका आणि पोलीस प्रशासन यांच्या संयुक्त समन्वयाने हे नवे धोरण लवकरच शहरात अंमलात आणले जाणार आहे, अशी माहिती स्थायी समिती सभापती अभिषेक बारणे यांनी दिली आहे.

या बैठकीदरम्यान बीआरटीएस विभागाकडून नवीन पार्किंग पॉलिसीचे सविस्तर सादरीकरण (प्रेझेंटेशन) करण्यात आले. या सादरीकरणामध्ये धोरणाची तांत्रिक आणि व्यावहारिक बाजू मांडण्यात आली. त्यावर सर्व बाजूंनी सविस्तर चर्चा झाल्यानंतर, धोरण अधिक लोकाभिमुख आणि त्रुटीरहित करण्यासाठी काही महत्त्वाच्या ठिकाणी आवश्यक दुरुस्त्या व सुधारणा करण्याच्या सूचना स्थायी समिती सभापती अभिषेक बारणे यांच्याकडून देण्यात आल्या. या सूचनांचा समावेश करून हे नवीन पार्किंग धोरण अत्यंत प्रभावीपणे आणि लवकरच अंमलात आणले जाणार असल्याचे प्रशासनाकडून स्पष्ट करण्यात आले आहे.

या नव्या पार्किंग धोरणामध्ये आधुनिक तंत्रज्ञानाचा आणि व्यावहारिक उपायांचा समावेश करण्यात आला आहे. यामध्ये प्रत्येक भागाच्या गरजेनुसार ‘एरिया बेस्ट पार्किंग’ व्यवस्था विकसित केली जाईल, तर नागरिकांच्या सोयीसाठी ‘कलर कोडिंग सिस्टीम’ लागू केली जाणार आहे. याशिवाय, रस्त्यालगत घर असणाऱ्या स्थानिक रहिवाशांना त्रास होऊ नये म्हणून त्यांना विशेष ‘पार्किंग परमिट’ दिले जाईल. शहरातील मुख्य रस्त्यांवर होणारी जड वाहनांची पार्किंग पूर्णपणे बंद करून त्यांच्यासाठी शहराबाहेर जागा निश्चित केली जाणार आहे.

विशेष म्हणजे, अनावश्यक पार्किंग टाळण्यासाठी थेट सॅटेलाईटद्वारे जागांची पडताळणी करण्यात येणार असून, या संपूर्ण व्यवस्थेवर देखरेख ठेवण्यासाठी स्वतंत्र ‘पार्किंग मॅनेजमेंट’ कक्ष स्थापन केला जाईल. या धोरणात वाहनचालकांसह पादचारी आणि सायकलस्वारांसाठीही स्वतंत्र व सुरक्षित जागा सुनिश्चित करण्यात आली आहे. या बैठकीला सहशहर अभियंता बापूसाहेब गायकवाड, कार्यकारी अभियंता सुनील पवार, आयटीडीपी चे प्रतिनिधी आणि इतर प्रशासकीय अधिकारी उपस्थित होते.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### यंदा माऊलींचा रथ ओढण्याचा मान रानवडे कुटुंबीयांच्या बैलजोडीला..!

आळंदी (दैनिक संध्या) : संत ज्ञानेश्वर महाराजांच्या आषाढी पायी वारी पालखी सोहळ्यात रथ ओढण्याचा मान यंदा आळंदीतील प्रगतशील शेतकरी हर्षवर्धन रानवडे आणि तुळशीराम रानवडे यांच्या बैलजोडीला मिळाला आहे. संत ज्ञानेश्वर महाराज पायी पालखी सोहळा व बैलजोड समितीची बैठक समाधी मंदिरातील सभागृहात पार पडली. यावेळी सर्वानुमते हा निर्णय घेण्यात आला. बैलजोड समितीचे सदस्य तथा विद्यमान नगरसेवक रामदास भोसले यांनी यासंदर्भातील माहिती दिली. आषाढी वारीतील रथ ओढण्याचा मान हा अत्यंत प्रतिष्ठेचा मानला जातो. त्यामुळे रानवडे कुटुंबीयांच्या बैलजोडीची निवड झाल्याने परिसरातून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. संत ज्ञानेश्वर महाराजांच्या पालखी सोहळ्याला महाराष्ट्राच्या सांस्कृतिक आणि अध्यात्मिक परंपरेत विशेष महत्त्व आहे. लाखो वारकऱ्यांच्या उपस्थितीत पार पडणाऱ्या या सोहळ्यात रथ ओढण्याचा मान मिळणे ही मोठी गौरवाची बाब मानली जाते.

### नारायणगाव येथे मोफत कुस्ती प्रशिक्षण शिबिराचे आयोजन

नारायणगाव (दैनिक संध्या) : राजमुद्रा सामाजिक सेवा संस्था व जुन्नर तालुका कुस्तीगीर संघ आणि शिवनेरी ॲथलेटिक सोसायटी यांच्या संयुक्त विद्यमाने नारायणगाव येथे प्रथमच मोफत कुस्ती प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. हे शिबीर 1 ली ते 9 वीच्या विद्यार्थ्यांसाठी असून ते 1 मे ते 30 मे 2026 या कालावधीत दररोज सायंकाळी 5 ते 7 या वेळेत हनुमान मंदिर परिसर, हनुमान चौक नारायणगाव येथे पार पडणार आहे. या शिबिरामध्ये कुस्ती कोच सुरेश काकडे व जिल्हा कुस्तीगर संघाचे उपाध्यक्ष विलास कदम हे मुख्य प्रशिक्षक म्हणून मुलांना कुस्तीचे मार्गदर्शन करणार आहेत. महिनाभराचे हे प्रशिक्षण पूर्ण केल्यानंतर रविवार दि. 31 मे रोजी सर्व सहभागी मुलांना मान्यवरांच्या हस्ते प्रशस्तीपत्रक व रोख बक्षीस देऊन गौरविण्यात येणार आहे. या मोफत कुस्ती प्रशिक्षण उपक्रमासाठी ग्रामपंचायत नारायणगाव व वारुळवाडी,हर्षल वाजगे,गुंजाळ ट्रेडर्स तसेच पंचायत समिती सदस्या जयश्री बनकर यांनी विशेष सहकार्य व प्रोत्साहन दिले आहे. तरी ज्या विद्यार्थ्यांना या मोफत शिबिरात सहभागी व्हायचे आहे त्यांनी विलास कदम सर (मो.9890088195),नरसुडे सर (मो.9860203879),संदेश केदारी (मो.9518576843),ऋषी तोडकरी (मो.9529029323),अतिश बुचके (मो.8421186418),रोहन बनकर (मो.7709756090),सोमनाथ चौधरी (मो.9766548623),शुभम खैरे (मो.9881774439),कुणाल आवाळे (मो.9730837151) यांच्याशी संपर्क करावा असे आवाहन राजमुद्रा सामाजिक सेवा संस्था यांच्या वतीने करण्यात आले आहे.



### जयदरला शॉर्टसर्किटमुळे टपऱ्यांना भीषण आग

कनाशी (दैनिक संध्या) :कळवण तालुक्यातील जयदर गावात मंगळवारी पहाटे शॉर्टसर्किटमुळे भीषण आग लागून रस्त्यावरील पाच टपऱ्या जळून खाक झाल्या. या दुर्घटनेत किराणा दुकान, मोबाईल दुकान व ऑनलाइन साहित्य विक्रीच्या टपऱ्यांसह अंदाजे 15 ते 20 लाख रुपयांचे आर्थिक नुकसान झाले आहे. चार सुशिक्षित तरुणांनी उभारलेला व्यवसाय डोळ्यादेखत उध्वस्त झाल्याने त्यांच्यासमोर उदरनिर्वाहाचा गंभीर प्रश्न उभा ठाकला आहे. जयदर येथे मंगळवारी पहाटेच्या सुमारास एका टपरीतून अचानक धूर येऊ लागला व काही क्षणातच आगीच्या ज्वाळा दिसू लागल्या. वाऱ्यामुळे आग वेगाने पसरली व शेजारील इतर चार टपऱ्यांनाही तिने विळखा घातला. आग एवढी भीषण होती की अर्ध्या तासातच पाचही टपऱ्या पूर्णपणे जळून खाक झाल्या. घटनेची माहिती मिळताच स्थानिक नागरिकांनी तातडीने आग विझवण्याचा प्रयत्न केला. कळवण नगरपंचायतीचा अग्निशमन बंबही घटनास्थळी दाखल झाला. अथक प्रयत्नांनंतर आगीवर नियंत्रण मिळवण्यात यश आले, मात्र तोपर्यंत टपऱ्यांमधील सर्व साहित्य जळून गेले होते. मोबाईल दुकानातील इलेक्ट्रॉनिक साहित्य, किराणा माल व इतर वस्तू पूर्णपणे भस्मसात झाल्या. जयदर गावातील जीवा गांगुर्डे, भीवा गांगुर्डे, सागर पवार व सागर गायकवाड या चार सुशिक्षित होतकरू तरुणांनी कुटुंबाचा उदरनिर्वाह करण्यासाठी छोटेखानी व्यवसाय सुरू केला होता. किराणा, मोबाईल रिपेअरिंग, रिचार्ज व ऑनलाइन सेवा केंद्र अशा टपऱ्या टाकून ते स्वावलंबी होण्याचा प्रयत्न करत होते. "नोकरी मिळत नाही म्हणून आम्ही चौघांनी मिळून कर्ज काढून दुकाने टाकली. हळूहळू व्यवसाय वाढत होता. पण पहाटे आलेल्या आगीने आमचे स्वप्नच जाळून टाकले. दुकानातला एकही रुपयाचा माल वाचला नाही. आता कर्ज कसे फेडायचे आणि घर कसे चालवायचे, हा प्रश्न पडला आहे," असे सागर पवार यांनी डोळ्यात पाणी आणून सांगितले.

### जुन्नरच्या शिवकालीन बारव व मलिक अंबर नहर संवर्धनाची मागणी

जुन्नर (दैनिक संध्या) : प्राचिन जुन्नर शहराची पाणीपुरवठा योजना मोगल काळातील नगररचनाकार, वास्तुविशारद मलिक अंबर यांनी तयार केली आहे. मात्र काळाच्या ओघात आणि वाढत्या शहरिकरणामुळे ही पाणी योजना लुप्त होत आहे. या पाणी योजनेवरील तलाव, बारव शेवटच्या घटका मोजत आहेत. यांच्या संवर्धनासाठी राज्य सरकारच्या बारव संवर्धन योजनेत याचा समावेश करण्यात यावा. अशी मागणी आमदार शरद सोनवणे यांनी सांस्कृतिक मंत्री ॲड. आशिष शेलार यांच्याकडे केली आहे. तर सह्याद्री गिरीभ्रमण संस्था देखील या मागणीसाठी आग्रही आहे. प्राचिन जुन्नर शहर वसवताना नगररचनाकार मलिक अंबर यांनी पाणीपुरवठा योजना केली. यासाठी जुन्नर शहराच्या भोवती पद्मावती आणि बादशहा तलावांची उभारणी केली. या पाणी योजनेद्वारे जुन्नर शहरात खापराच्या पाईपलाईन द्वारे पाणी पुरवठा करण्यात येत होता. यानुसार प्रत्येक पेठेतील प्रत्येक घरात आड होते. या आडांना सायफपण पद्धतीने पाणी पुरवठा होत होता. यासाठी जुन्नर शहरात सय्यदवाडा आणि बारव परिसरात बारव बांधण्यात आली होती. मात्र आता शहरिकरणामुळे हि पाणी योजना अखेरच्या घटका मोजत आहे. मात्र काही ठिकाणी या पाणीयोजनेचे अवशेष शिल्लक असून, अजुनही याला पाणी येत आहे. शहरातील वाढते शहरीकरण आणि पाण्याची वाढती मागणी यामुळे भविष्यात पाण्याची टंचाई निर्माण होऊ नये, यासाठी बारव आणि मलिक अंबर नहर चे संवर्धन व्हावे असे आमदार सोनवणे यांनी सांगितले.

# चाकण मधील चेंबर दुरुस्तीच्या कामाला तुफान वेग

## साहेबराव कड व विजया जाधव यांच्यावर कौतुकांचा वर्षाव

**चाकण (दै. संध्या)**



सांडपाण्याचा निचरा होण्यासाठी तयार करण्यात आलेले चेंबर अवजड वाहनांमुळे खचल्याने वाहन चालक व पादचाऱ्यांना मोठा मनस्ताप सहन करावा लागत होता. त्यामुळे आता चाकण येथील माणिक चौकातील खचलेले चेंबर नव्याने दुरुस्तीचे काम युद्ध पातळी सुरू करण्यात आले आहे.

पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर चाकण नगरपरिषदेचे नगरसेवक साहेबराव कड व नगरसेविका विजया जाधव यांनी चाकण नगरपरिषदेच्या माध्यमातून या कामाला गती दिली आहे. अत्यंत वर्दळीचा असलेल्या माणिक चौक ते मराठी शाळा या रस्त्यातील चेंबर खचल्याने या चेंबरची दुरुस्ती होणे अत्यंत आवश्यक होते. नगरसेविका विजया जाधव व नगरसेवक साहेबराव कड यांच्या पाठपुराव्यामुळे चाकण नगरपरिषदेचे बांधकाम विभागाचे सभापती रणजित जरे यांच्या सूचनेनुसार नगरपरिषदेचे अधिकारी श्रीराम गायकवाड यांच्या माध्यमातून चेंबर दुरुस्तीचे काम सुरू आहे.

विजया जाधव यांनी नव्याने सुरू करण्यात येणाऱ्या चेंबरच्या कामाचे पूजन केले. यावेळी महावीर पतसंस्थेचे संचालक दत्तात्रय जाधव, चाकण हार्ट फाउंडेशनचे अध्यक्ष सुनिल शहा, चाकण सोसायटीचे संचालक अशोक परदेशी, चाकण पतसंस्थेचे संचालक निलेश टिळेकर, उद्योजक अनिल जोशी, विनायक निखळ, हर्षल जाधव, आकाश जाधव, चेतन जाधव, रोहन जाधव, प्रयाग थोरात, विजय सुतार, बळीराम परदेशी, डॉ. उबाळे, महेंद्र थिटे, गोपाळ निखळ, दिनेश उबाळे, जयराम परदेशी, अतुल जोशी, दत्तात्रय शिंदे, चिंतन थिटे, तसेच ठेकेदार चेतन कौटकर आदींसह विविध क्षेत्रातील प्रतिष्ठित मान्यवर, ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.


### गर्भलिंग निदान आणि बेकायदेशीर गर्भपात प्रकरणात आणखी एक सोनोग्राफी मशीन हस्तगत

**शिरसगाव (दै. संध्या)**

लोणी पोलीस स्टेशन येथे दाखल झालेल्या बेकायदा गर्भलिंग चाचणी व गर्भपात प्रकरणात आतापर्यंत 16 पेक्षा जास्त आरोपींना अटक करण्यात आले आहे .सदर गुन्ह्याचा तपास लोणी पोलीस स्टेशन या ठिकाणी सुरु आहे आतापर्यंत या प्रकरणात 16 आरोपीचेवर अटक करण्यात आले आहेत.त्यापैकी पुणे येथून अटक केलेल्या तीन आरोपींकडे बारकाईने चौकशी केली असता त्यांनी असेच आणखी एक लिंगनिदान चाचणी करणारे मशीन मारुती विशवनाथ ढोरे वय 48 रा.केशवनगर वडगाव मावळ याला विकल्याचे तपासात समोर आले आहे.त्यानुसार लोणी पोलीस स्टेशन व अप्पर पोलीस अधीक्षक कार्यालय श्रीरामपूर येथील पथकाने सदर आरोपींचा शोध घेणेकामी कामगिरी केली. मंगळवारी दिवसभर नमूद पत्त्यावर शोध घेतला असता यातील आरोपी मिळून आला.त्याला देखील पथकाने विचारपूस केली असता त्याच्याकडे सोनोग्राफी करणारे पोर्टेबल मशीन मिळून आले.सदरचे मशीन पोलीस पथकाने ताब्यात घेऊन जप्त करण्यात आले.याच मशीनच्या सहाय्याने हा आरोपी देखील लिंग निदान चाचणी करीत होता असे निष्पन्न झाले आहे.विशेष म्हणजे हा डॉक्टर नाही तरी देखील हा या पद्धतीच्या चाचण्या करीत होता.या आरोपीची शारीरिक स्थिती अटक करण्यासारखी नसल्याचे दिसून आल्याने त्याला तपासकामी हजर राहण्याची समज देण्यात आली आहे.आणखी काही डॉक्टर यांना या पुणे येथील आरोपींनी लिंग निदान चाचणी करणारे मशीन विकल्याचे तपासात कबुली दिली आहे .त्या दृष्टीने पोलीस पथक अतिशय गांभीर्याने तपास करीत आहे. अनेक डॉक्टर एजंट अजूनही उघड होत आहेत.ज्या ज्या आरोपींकडे असे मशीन असण्याची शक्यता आहे त्याची माहिती पोलिसांना मिळालेली असून त्यादृष्टीने तपास सुरु आहे.केवळ कायदेशीर बाजू या गुन्ह्यांमागे नसून एक सामाजिक जबाबदारीची जाणीवसुद्धा पोलीस प्रशासनाकडून या गुन्ह्यात दाखविण्यात येत आहे.असे अप्पर पोलीस अधीक्षक श्रीरामपूर सोमनाथ वाघचौरे यांनी सांगितले.

## १० वर्षीय चिमुरडीवर बिबट्याचा जीवघेणा हल्ला; पाठीवर, मांडीवर गंभीर जखमा, जुन्नर तालुक्यातील घटना

**ओतूर (दै. संध्या)**



जुन्नर तालुक्यातील ओतूर येथील वाकचौरे वस्ती परिसरात गुरुवार (दि. २१ मे) रोजी सकाळी सहा वाजण्याच्या सुमारास १० वर्षीय मुलीवर बिबट्याने जीवघेणा हल्ला केल्याची धक्कादायक घटना घडली. या घटनेमुळे परिसरात भीतीचे वातावरण पसरले आहे. काव्या महेंद्र वाकचौरे (रा. वाकचौरे वस्ती, ओतूर) ही आपल्या बहिणीसोबत सकाळी फिरण्यासाठी बाहेर गेली असता दबा धरून बसलेल्या बिबट्याने तिच्यावर अचानक झडप घातली. या हल्ल्यात काव्या हिच्या पाठीवर, पोटावर व मांडीवर गंभीर जखमा झाल्या.

दरम्यान, सोबत असलेल्या बहिण कल्याणी हिने आरडाओरडा केल्याने बिबट्या घटनास्थळावरून पसार झाला. स्थानिक नागरिकांनी तत्काळ धाव घेत जखमी काव्याला प्राथमिक आरोग्य केंद्रात दाखल केले. यावेळी डॉ. प्रशांत गोरे व डॉ. वैष्णवी ठिकेकर यांनी प्राथमिक उपचार केले. त्यानंतर पुढील उपचारासाठी तिला नारायणगाव येथील ग्रामीण रुग्णालयात हलविण्यात आले. वनपरिक्षेत्र अधिकारी चैतन्य कांबळे यांच्या मार्गदर्शनाखाली वनविभागाच्या पथकाने घटनास्थळी पाहणी करून बिबट्याला पकडण्यासाठी विविध ठिकाणी चार पिंजरे लावण्यात आहे असून त्या ठिकाणी गस्त देखील घातली जाणार आहे असे वनविभागाने सागितले.

‘१७ कोटींचे रुग्णालय, पण सुविधा अपुऱ्या! ठरत आहेत. ओतूर येथे १ मे रोजी नव्याने सुरू झालेल्या ग्रामीण रुग्णालयाबाबत या घटनेनंतर गंभीर प्रश्न उपस्थित झाले आहेत. सुमारे १७ कोटी रुपये खर्चून उभारलेल्या या रुग्णालयात अत्यावश्यक सुविधा नसल्याचे समोर आले आहे. विशेषतः बिबट्याच्या हल्ल्यासारख्या आपत्कालीन परिस्थितीत आवश्यक असलेले अँटी-रेबीज सिरम उपलब्ध नसल्यामुळे जखमी रुग्णांला नारायणगाव येथे हलवावे लागले. त्यामुळे स्थानिक नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.

## राष्ट्रीय काँग्रेस पक्षाच्या पुणे जिल्हाध्यक्ष पदी कमलाकर सातव पाटील यांची निवड

**कोरेगावमुळ (दै. संध्या)**



राष्ट्रीय काँग्रेस पक्षाच्या पुणे जिल्हाध्यक्षपदी वाघोली गावचे माजी उपसरपंच तथा ज्येष्ठ नेते कमलाकर सातव पाटील यांची निवड करण्यात आली आहे. काँग्रेस पक्षातील निष्ठावंत व सक्रिय कार्यकर्ते म्हणून ओळख असलेल्या कमलाकर सातव पाटील यांच्या सामाजिक व राजकीय कार्याची दखल घेत पक्षश्रेष्ठींनी त्यांच्यावर पुणे जिल्ह्याची महत्त्वाची जिल्हाध्यक्ष पदाची जबाबदारी सोपवली आहे.

माजी उपसरपंच म्हणून कार्यरत असताना कमलाकर सातव पाटील यांनी गावातील पाणीपुरवठा, रस्ते, स्वच्छता, वीजपुरवठा, गटार व्यवस्था यांसारख्या जनसामान्यांच्या मूलभूत प्रश्नांवर विशेष लक्ष केंद्रित केले होते. नागरिकांच्या अडचणी जाणून घेत प्रशासनाकडे सातत्याने पाठपुरावा करून अनेक प्रश्न मार्गी लावल्यामुळे त्यांनी सर्वसामान्यांमध्ये विश्वासार्ह नेतृत्वाची प्रतिमा निर्माण केली.

याआधीच्या काळात काँग्रेस पक्षात निष्ठावंत राहत कमलाकर सातव पाटील यांनी काँग्रेसचे हवेली तालुकाध्यक्ष, पुणे जिल्हा उपाध्यक्ष व बाजार समितीचे संचालक पद भूषविले आहेत. या पदांवर काम करताना ग्रामीण भागातील जनसंपर्क, संघटन कौशल्य आणि कार्यकर्त्यांशी असलेली जवळीक यामुळे सातव पाटील यांनी पक्षामध्ये स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली आहे. सत्ताधाऱ्यांच्या धोरणांवर अभ्यासपूर्ण आणि आक्रमक भूमिका मांडणारे नेतृत्व म्हणूनही त्यांच्याकडे पाहिले जाते.

त्यामुळे त्यांच्या निवडीमुळे सत्ताधाऱ्यांना एक सक्षम आणि प्रभावी विरोधी पक्षनेता मिळाल्याची प्रतिक्रिया राजकीय वर्तुळातून व्यक्त होत आहे. त्यांच्या निवडीबद्दल वाघोली परिसरासह पुणे जिल्ह्यातील काँग्रेस कार्यकर्ते, पदाधिकारी आणि विविध स्तरांतील नागरिकांकडून त्यांचे अभिनंदन करण्यात येत आहे. अशी माहिती वाघोलीचे सामाजिक कार्यकर्ते तथा उद्योजक संतोष सातव पाटील यांनी दिली.

## जुन्नर तालुक्यात जागतिक परिचारिका दिन उत्साहात साजरा

**जुन्नर (दै. संध्या)**



रुग्णसेवेलाच आपले ईश्वरकार्य मानून अहोरात्र सेवा बजावणाऱ्या आणि रुग्णांच्या आयुष्यात आशेचा किरण निर्माण करणाऱ्या परिचारिकांच्या त्यागाचा व समर्पणाचा गौरव करण्यासाठी जुन्नर येथे 'जागतिक परिचारिका दिना'निमित्त विशेष गौरव सोहळ्याचे शानदार आयोजन करण्यात आले होते. पंचायत समिती आरोग्य विभाग जुन्नर, डिसेंट फाउंडेशन (पुणे) आणि जुन्नर तालुका सर्व परिचारिका भगिनी यांच्या संयुक्त विद्यमाने महालक्ष्मी मंगल कार्यालय, बारव (जुन्नर) येथे हा सोहळा उत्साहात संपन्न झाला.

या कार्यक्रमाप्रसंगी जुन्नर तालुक्यातील १३ प्राथमिक आरोग्य केंद्रांमधून उत्कृष्ट रुग्णसेवा करणाऱ्या प्रत्येकी एक अशा एकूण १३ परिचारिकांचा डिसेंट फाउंडेशनच्या वतीने 'फ्लोरेन्स नाइटिंगेल स्मृती आदर्श परिचारिका पुरस्कार २०२६' देऊन मान्यवरांच्या शुभहस्ते विशेष सन्मान करण्यात आला. कोरोना काळ असो वा दैनंदिन आरोग्य सेवा, स्वतःच्या कुटुंबाची पर्वा न करता रुग्णांना नवीन आयुष्य देणाऱ्या परिचारिका भगिनींचे कौतुक करणे आणि त्यांना प्रोत्साहन देणे हा या पुरस्काराचा मुख्य उद्देश होता.

या सोहळ्यासाठी जुन्नर पंचायत समितीच्या माजी सभापती कमलताई शेळकंदे, तालुका आरोग्य अधिकारी डॉ. अश्विनी कुळमेथे, डिसेंट फाउंडेशनचे संस्थापक जितेंद्र बिडवाई, सचिव डॉ. एफ. बी. आतार, सरपंच नीता ताजने आदी मान्यवर प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. याप्रसंगी आरोग्य विभागातील अधिकारी, कर्मचारी आणि तालुक्यातील परिचारिका भगिनी अत्यंत मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

केवळ पुरस्कार वितरणच नव्हे, तर अहोरात्र सेवेत व्यस्त असणाऱ्या परिचारिका भगिनींना आनंदाचे काही क्षण मिळावेत यासाठी या सोहळ्यात विविध मनोरंजक खेळ, फॅशन शो आणि लकी ड्रॉ अशा सांस्कृतिक कार्यक्रमांचे देखील आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाची सांगता सर्व उपस्थितांच्या स्नेहभोजनाने झाली.

कार्यक्रमाचे उत्कृष्ट सूत्रसंचालन अमोल पानसरे यांनी केले, तर उपस्थित सर्वांचे आभार रंजना कदम सिस्टर यांनी मानले. हा सोहळा यशस्वी करण्यासाठी सुनीता गाडेकर, उज्वला गवळी, अनिता कसार, संगीता बनकर, प्रीती झगडे, डिसेंट फाउंडेशनचे पदाधिकारी, आरोग्य विभागाचे कर्मचारी आणि जुन्नर तालुक्यातील परिचारिका भगिनींनी अथक परिश्रम घेतले. या कौतुकास्पद उपक्रमाबद्दल संपूर्ण जुन्नर तालुक्यातून आरोग्य विभागाचे आणि डिसेंट फाउंडेशनचे विशेष आभार मानले जात आहेत.



### बाणेर–पाषाण–सूस उड्डाणपुलावर पादचाऱ्यांचा जीवघेणा प्रवास; स्कायवॉकची मागणी तीव्र

**सूस (दै. संध्या)**

पाषाण आणि सूस या भागांना जोडणाऱ्या राजमाता जिजाऊ उड्डाणपुलामुळे वाहनांची वाहतूक तर सुरळीत झाली. मात्र, पादचारी नागरिकांच्या नशिबी असलेली पायपीट आणि जीवघेणा प्रवास अद्याप संपलेला नाही. महामार्गाच्या दोन्ही बाजूंना ये-जा करण्यासाठी पुलावर जिने नाहीत.

तसेच, या ठिकाणी महामार्ग पार करणाऱ्या पादचाऱ्यांसाठी स्काय वॉकही करण्यात आला नसल्याने नागरिकांना जीव मुठीत धरून महामार्ग ओलांडावा लागत आहे. प्रशासनाच्या या दिरंगाईमुळे अपघाताची वाट पाहताय का? असा संतप्त सवाल स्थानिक नागरिक विचारत आहेत. महामार्गाच्या पलीकडे आपल्या दैनंदिन कामासाठी जाणाऱ्या नागरिकांची मोठी गैरसोय होत आहे. या ठिकाणी महामार्गाच्या अलीकडे व पलीकडे दोन्हींकडे मोठमोठ्या कंपन्या झाल्या आहेत. अनेक कर्मचारी वर्ग आपला जीव मुठीत धरून दररोज महामार्ग पार करतो.

# उष्णतेचा कहर! इंदापूर तालुक्यात शेतकरी, मजूर आणि नागरिक हैराण

## ४२ अंशांच्या पुढे तापमान; ऊस उत्पादन आणि दूध व्यवसायावरही परिणाम

**इंदापूर (दै. संध्या)**




इंदापूर तालुक्यात गेल्या तीन महिन्यांपासून वाढत्या उष्णतेचा व तीव्र उकाड्याचा प्रकोप कायम असल्याचे चित्र मंगळवारी (दि. 19) दिसून आले. सध्याच्या वाढत्या उष्णतेने शेतकरी, शेतमजूर व समाजातील सर्वच घटक त्रस्त झाले आहेत. दिवसा अंगाची लाहीलाही होत असल्याने दुपारच्या सुमारास रस्ते देखील ओस पडू लागले आहेत.

चालू वर्षी अचानकपणे वाढलेली तीव्र स्वरूपाची उष्णता व वाढलेल्या आद्रतेने उकाड्याची असह्य तीव्रता दिसून येत आहे. तापमानाने 42 अंश सेल्सिअसचा पारा ओलांडल्याने ज्येष्ठ नागरिक व बालकांना तीव्र उष्णतेचा सामना करावा लागत आहे. दुपारी रस्त्यांवर गर्दी तुरळक दिसत आहे. वाढत्या उष्णतेमुळे दुपारी बाजारपेठा ओस पडत आहेत, तर दुपारी शेतमजूर शेतात काम करणे बंद करून विश्रांती घेताना दिसत आहेत.

वाढत्या उष्णतेने ऊस पिकांच्या वाढीवर विपरीत परिणाम झाल्याची माहिती अकलूज येथील सहकार महर्षी शंकरराव मोहिते पाटील साखर कारखान्याचे माजी उपाध्यक्ष सुरेश मेहेर (सुरवड) यांनी दिली. त्याचा परिणाम उसाच्या टनेजमध्ये होऊ शकतो, अशी भीती त्यांनी व्यक्त केली.

वाढत्या उष्णतेने जनावरांच्या दूध देण्याच्या क्षमतेवर परिणाम झाला आहे. त्यामळे दूध उत्पादक शेतकऱ्यांमध्ये काळजीचे वातावरण दिसून येत आहे, असे निरा भीमा कारखान्याचे संचालक राजकुमार जाधव (सराफवाडी) यांनी सांगितले.

सध्याच्या वाढत्या उष्णतेने तरुण नागरिक व वृद्धांमध्ये बालकांच्या तुलनेत जास्त अशक्तपणा येणे, चिडचिड करणे व उष्माघाताची लक्षणे वाढत्या उन्हामुळे दिसत आहेत. सध्याच्या वाढत्या तीव्र उन्हामुळे नागरिक व बालकांनी दुपारी शक्यतो घराबाहेर पडणे टाळावे. सायंकाळी घराबाहेर पडावे, असे आवाहन डॉक्टरांनी केले आहे.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### पीसीसीओई येथे सार्वत्रिक मानवी मूल्य विषयावर प्रशिक्षण संपन्न

पिंपरी (दैनिक संध्या) : पिंपरी चिंचवड कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग येथे 'सार्वत्रिक मानवी मूल्ये' या विषयावर तीन दिवसीय प्रशिक्षण कार्यशाळा संपन्न झाली. एआयसीटीईच्या मान्यतेने व्यवस्थापन विकास प्रशिक्षण कार्यक्रम अंतर्गत ही कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. या प्रशिक्षणात पीसीईटी संस्था आणि ११० महाविद्यालयांमधील प्रशासकीय अधिकाऱ्यांनी व प्रतिनिधींनी नोंदणी केली होती. पीसीसीओई यूएचव्ही नोडल केंद्र प्रमुख पीसीसीओईचे संचालक डॉ. गोविंद कुलकर्णी, शैक्षणिक अधिष्ठाता डॉ. राजेश्वरी कन्नन आणि एसपीपीयूचे शैक्षणिक अधिष्ठाता डॉ. प्रमोद पाटील, पीसीसीओईचे सर्व विभागप्रमुख, अधिष्ठाता, सहयोगी अधिष्ठाता आदी उपस्थित होते. या प्रशिक्षणामध्ये आत्म-शोध, नातेसंबंधांमधील सुसंवाद, नैतिक आचरण आणि संस्थात्मक पद्धतींमध्ये वैश्विक मानवी मूल्यांचे एकत्रीकरण या विषयावर उपस्थित सहभागींनी मत व्यक्त केले. तिसऱ्या दिवशी पॅनल चर्चा झाली. या पॅनेल मध्ये पीसीसीओईचे उप संचालक डॉ. नीळकंठ चोपडे, डॉ. राजेश्वरी कन्नन, डॉ. शीतल भंडारी, डॉ. लीना शर्मा, डॉ. संदीप पाटील आणि डॉ. राजेश फुरसुळे यांचा समावेश होता. ज्यांनी अभ्यासक्रम एकीकरण, प्राध्यापक प्रशिक्षण आणि मूल्य आधारित संस्थात्मक परिसंस्था मजबूत करण्यावर चर्चा केली. डॉ. उमेश जाधव यांच्या नेतृत्वाखाली व डॉ. अनिता माने, डॉ. विनय चिद्री यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या सत्रात किरण नाफडे यांनी निरीक्षक म्हणून काम पाहिले. याचे डॉ. महेश कोल्टे यांनी आयोजन केले होते. समन्वयक म्हणून डॉ. संदीप पाटील आणि मंजुषा देवकुळे यांनी काम केले. समारोप सत्रात पीसीसीओईच्या विद्यार्थ्यांनी विकसित केलेल्या वैश्विक मानवी मूल्यांवरील वेबसाइटचे उद्घाटन करण्यात आले. वैश्विक मानवी मूल्यांमधील १४-क्रेडिटच्या बहुविद्याशाखीय उपक्रमांवर चर्चा करण्यात आली. पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टचे अध्यक्ष ज्ञानेश्वर लांडगे, उपाध्यक्ष पद्माताई भोसले, सचिव विठ्ठल काळभोर, खजिनदार शांताराम गराडे, विश्वस्त हर्षवर्धन पाटील, उद्योजक नरेंद्र लांडगे, अजिंक्य काळभोर, कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई यांच्या मार्गदर्शनाखाली हे प्रशिक्षण आयोजित करण्यात आले होते.




### उरणमध्ये औषध विक्रेत्यांचा बंद, सर्वच स्तरातून मिळाला पाठिंबा

उरण (दैनिक संध्या) : ऑनलाइन विक्री होत असलेल्या शेड्युल औषधांविरुद्ध, तसेच तरुण पिढीला सहज डॉक्टरांच्या प्रिस्क्रिप्शन शिवाय उपलब्ध होत असलेल्या नशा येणाऱ्या औषधांच्या , ऑनलाइन सहज उपलब्ध होणाऱ्या अँटिबायोटिक्स औषधांचा अनियमित वापर आणि त्यामुळे होणारे रेजिस्टन्स बाबत जनहितार्थ रुग्णांच्या भल्यासाठी २० मे रोजी पूर्ण भारतभर औषध विक्रेत्यांनी बंद पुकारला गेला होता. त्यास सहयोग म्हणून केमिस्ट अँड डिस्ट्रीब्युटर्स असोसिएशन रायगड डिस्ट्रिक्ट (सी डी ए आर डी ) चे अध्यक्ष लीलाधर पाटील आणि जिल्हा सचिव प्रवीण नावंदर यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्ह्याकडून आलेल्या सूचनानुसार उरण तालुका केमिस्ट्री डिस्ट्रीब्यूशन असो. उरण तालुकाने औषध विक्री बंद पुकारला होता. ऑनलाइन डुप्लिकेट औषध विक्रीच्या संकटासमोर आपला व्यवसाय अबाधित राखण्यासाठी तसेच सर्व जनतेचा स्वास्थासाठी सभासदांनी एकजुटीने उभे राहिले. उरण मधील सर्व १२० मेडिकल बंद मध्ये सामील झाले होते.याचा काही अशी नियमिय औषधे हवी असणाऱ्या रुग्णांना फटका बसला. परंतु ज्या रुग्णांना अत्यावश्यक औषध हवी होती त्यांना औषधे पुरवण्याची व्यवस्था संघटनेचे पदाधिकारी यांनी केली होती त्यामुळे कुठेही बंद मुळे अत्यावश्यक औषधे हवी असलेल्या रुग्णांस त्रास जाणवला नाही. रायगड जिल्हा केमिस्ट असोसिएशन चे पदाधिकारी मनोज ठाकूर ,उरण तालुका अध्यक्ष उमाकांत पानसरे, उरण तालुका सचिव राजेश्वर गावंड यांनी या संदर्भात माहिती दिली.

### राज्यपालांच्या हस्ते भिकू इदाते, रवींद्र प्रभूदेसाई यांच्या पुस्तकांचे प्रकाशन

मुंबई (दैनिक संध्या) : भटके विमुक्त विकास परिषदेचे संस्थापक अध्यक्ष व समरसता मंचचे दीर्घ काळ कार्याध्यक्ष राहिलेले पद्मश्री भिकु (दादा) इदाते यांच्या इंग्रजी अनुवादित 'पिलग्रीम ऑफ समरसता' या ग्रंथाचे प्रकाशन राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांच्या हस्ते लोकभवन मुंबई येथे झाले. नीलिमा देशपांडे यांनी दादा इदाते यांच्या जीवन कार्यावर लिहिलेल्या 'समरसतेचा वारकरी' या ग्रंथाचे सदर ग्रंथ हे इंग्रजी भाषांतर असून ऋतुराज पत्की यांनी ते अनुवादित केले आहे. ग्रंथाला सरसंघचालक डॉ. मोहन भागवत यांची प्रस्तावना आहे. राज्यपालांच्या हस्ते उद्योजक तसेच पितांबरी समूहाचे व्यवस्थापकीय संचालक डॉ. रवींद्र प्रभूदेसाई यांच्या 'आधुनिक शेतीचे मॉडेल' व 'आपलं कोकण' या दोन पुस्तकांचे देखील लोकभवन येथे प्रकाशन करण्यात आले. भिकू इदाते यांच्या पुस्तकामुळे वाचकांना राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या समरसता तसेच इतर आंदोलनाची माहिती होईल आज तंत्रज्ञानाच्या काळात देखील ग्रंथांचे महत्त्व कायम असून ग्रंथ हाती धरून वाचणे हा अद्भुत अनुभव असतो असे राज्यपालांनी सांगितले. नवी पिढी ग्रंथ वाचन करीत नाही हा समज चुकीचा आहे असे सांगून नव्या पिढीने वाचनाचे केवळ व्यासपीठ बदलले आहे वाढदिवस तसेच विवाह प्रसंगी ग्रंथ भेट देण्याची प्रथा सुरू व्हावी अशी अपेक्षा राज्यपालांनी यावेळी बोलताना व्यक्त केली. लेखक भिकू इदाते यांनी आपल्या प्रास्ताविकातून समरसता मंचाची निर्मिती, त्या माध्यमातून हाती घेतलेली वेगवेगळी आंदोलने, फुले आंबेडकर संदेश यात्रा, विमुक्त व भटक्या समाजाची स्थिती इत्यादी विषयांवर विवेचन केले. 'पितांबरी'चे रवींद्र प्रभुदेसाई यांनी 'आधुनिक शेतीचे मॉडेल' व 'आपलं कोकण' या ग्रंथांविषयी माहिती दिली. पुस्तक प्रकाशन सोहळ्याला हिंदुस्तान प्रकाशन संस्था व साप्ताहिक विवेकचे मार्गदर्शक पद्मश्री रमेश पतंगे तसेच साप्ताहिक विवेक तसेच पितांबरी उद्योग समूहातील संचालक उपस्थित होते.



# बकरी ईदच्या पार्श्वभूमीवर आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांच्या अध्यक्षतेखाली नियोजन बैठक संपन्न

**पिंपरी (दै. संध्या)**

बकरी ईदच्या अनुषंगाने दरवर्षीप्रमाणे सर्व संबंधित विभागांनी परस्पर समन्वय साधून नागरिकांना पुरविण्यात येणाऱ्या सुविधांमध्ये कोणत्याही त्रुटी राहणार नाही याची दक्षता घ्यावी, अशा सूचना आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी दिल्या. तसेच या सणाचे महत्त्व लक्षात घेता नागरिकांनीही प्रशासनास सहकार्य करून नियमांचे पालन करावे, असे आवाहन देखील त्यांनी केले.

बकरी ईद सणाच्या पार्श्वभूमीवर पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने महापालिका प्रशासन, पोलीस विभाग तसेच शहरातील विविध संघटनांच्या प्रतिनिधींसमवेत नियोजन बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. चिंचवड येथील ऑटो क्लस्टर सभागृहात आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांच्या अध्यक्षतेखाली ही बैठक संपन्न झाली, त्यावेळी ते बोलत होते.

या बैठकीस अतिरिक्त आयुक्त विक्रांत बगाडे, मुख्य अभियंता संजय कुलकर्णी, सहशहर अभियंता प्रेरणा सिनकर, उप आयुक्त संदीप खोत, अण्णा बोदडे, कार्यकारी अभियंता माणिक चव्हाण, सुनीलदत्त नरोटे, विजयसिंह भोसले, महेश कावळे, विशेष अधिकारी किरण गायकवाड, पशुवैद्यकीय अधिकारी डॉ. अरूण दगडे, सुरक्षा अधिकारी प्रमोद निकम यांच्यासह पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयाचे सहाय्यक पोलीस आयुक्त प्रविण मोरे, पोलीस निरीक्षक भोजराज मिसाळ, महेंद्र कदम तसेच कुरेशी जमात व्यापारी संघटनेचे युसूफ कुरेशी, गफूर कुरेशी, जमील कुरेशी, शकिल कुरेशी, मौलाना



तनवीर, मौलाना फल्जेहक, सबिर कुरेशी, करीम कुरेशी, अकबर कुरेशी, तायपाज कुरेशी, ईर्शाद कुरेशी, शफिक काझी, ऐफाज कुरेशी आदी उपस्थित होते.

महापालिकेच्या वतीने कुर्बानीसाठी निश्चित करण्यात आलेल्या तात्पुरत्या ठिकाणी आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. यामध्ये पत्राशेड, मंडप, पुरेसा पाणीपुरवठा, मोबाईल टॉयलेट व्हॅन, स्वच्छतेसाठी आवश्यक मनुष्यबळ तसेच वेस्ट संकलनासाठी स्वतंत्र यंत्रणा उपलब्ध करण्यात येणार असल्याची माहिती बैठकीत देण्यात आली.

कुर्बानीसाठी आणण्यात येणाऱ्या जनावरांच्या व्यवस्थेसाठी स्वतंत्र जागा, पिण्याच्या पाण्याची सुविधा तसेच अतिरिक्त पाणीपुरवठ्यासाठी टँकर आणि हौदांची व्यवस्था करण्यात येणार आहे. कुर्बानीनंतर निर्माण होणारा कचरा व वेस्ट तात्काळ उचलण्यासाठी विशेष पथके कार्यरत राहणार असून परिसरात स्वच्छता राखण्यावर भर देण्यात येणार आहे. याशिवाय, सुरक्षेच्या दृष्टीने आवश्यक पोलीस बंदोबस्त ठेवण्यात येणार असून संबंधित विभागांना आवश्यक त्या सूचना देण्यात आल्या आहेत. कुर्बानीसाठी मागील वर्षीप्रमाणे नेहरू नगर डॉक पॉइंट येथील जागा निश्चित करण्यात आल्याची माहिती उप आयुक्त संदीप खोत यांनी यावेळी दिली.

बैठकीदरम्यान विविध संघटनांच्या प्रतिनिधींनी पाणीपुरवठा अधिक प्रमाणात उपलब्ध करून देणे, जनावरे बांधण्यासाठी किमान तीन ते चार दिवस आधी अतिरिक्त जागा उपलब्ध करणे तसेच मंडप आणि पत्राशेड परिसरात सातत्याने स्वच्छता राखण्याबाबत सूचना मांडल्या. महापालिका प्रशासनाच्या वतीने या मागण्यांची योग्य दखल घेण्यात येईल, असे यावेळी स्पष्ट करण्यात आले.

## सर्वसामान्यांना मोठा फटका, आठवड्यात दुसऱ्यांदा पेट्रोल-डिझेलचे दर वाढले

**पिंपरी (दै. संध्या)**

आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत कच्च्या तेलाच्या वाढत्या किंमतीमुळे आणि मिडिल ईस्टमधील वाढता लष्करी तणाव याचा थेट फटका आता भारतीय ग्राहकांच्या खिशाला बसू लागला आहे. देशातील सरकारी तेल कंपन्यांनी मंगळवारी सकाळी पेट्रोल आणि डिझेलच्या किमतींमध्ये प्रति लीटर सुमारे ९० पैशांची आणखी एक मोठी वाढ केली आहे. सर्वसामान्य जनतेसाठी हा एकाच आठवड्यात बसलेला दुसरा मोठा झटका आहे, कारण अवघ्या काही दिवसांपूर्वी म्हणजेच गेल्या शुक्रवारी तेल कंपन्यांनी इंधन दरात तब्बल ३ रुपयांची मोठी वाढ केली होती. या लागोपाठ झालेल्या दरवाढीमुळे देशातील नागरिक होरपळून निघाले असून बाजारात चिंतेचे वातावरण आहे.

ही दरवाढ म्हणजे जागतिक पातळीवर सुरू असलेल्या राजकीय आणि लष्करी संकटाचा थेट परिणाम आहे. अमेरिका आणि इराण यांच्यातील वाढता संघर्ष तसेच 'हॉर्मुझ सामुद्रधुनी' या सागरी व्यापारी मार्गावरील कच्च्या तेलाचा पुरवठा खंडित होण्याची निर्माण झालेली भीती यामुळे आंतरराष्ट्रीय बाजारात क्रूड ऑइलचे दर प्रति बॅरल १०० डॉलरच्या पार गेले आहेत. गेल्या आठवड्यात करण्यात आलेल्या ३ रुपयांच्या दरवाढीमुळे कंपन्यांचा हा दैनंदिन तोटा जवळपास २५ टक्क्यांनी कमी झाला होता, परंतु मूळ खर्च आणि प्रत्यक्ष विक्री किंमत यांमधील मोठी तूट भरून काढण्यासाठी कंपन्यांना ही नवीन दरवाढ करणे भाग पडले आहे.

## जळगावात चोरट्यांचा धुमाकूळ; दोन घरफोड्यांत दीड लाखांहून अधिक ऐवज लंपास

**जळगाव (दै. संध्या)**

शहरातील रायसोनी नगर तसेच ग्रामीण भागातील उमाळा शिवारात दोन वेगवेगळ्या ठिकाणी घरफोडीच्या घटना घडल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. अज्ञात चोरट्यांनी बंद घरांचे कडी-कोंडे तोडून रोख रक्कम आणि सोन्या-चांदीचे दागिने असा एकूण दीड लाखांहून अधिक किंमतीचा मुद्देमाल लंपास केला. या प्रकरणी रामानंद नगर आणि



एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

रामानंद नगर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील रायसोनी नगर येथे ही घटना घडली. येथील रहिवासी पंकज सुरेश भावसार (वय ४१) हे कामानिमित्त बाहेर गेले असताना १५ मे रोजी पहाटे ५ ते १८ मे रोजी सकाळी ६ वाजेदरम्यान अज्ञात चोरट्यांनी त्यांच्या घराच्या मुख्य दरवाजाचे कुलूप आणि कडी-कोंडा तोडून घरात प्रवेश केला. त्यानंतर कपाटातील लॉकर फोडून चांदीचे कडे, चांदीचे शिक्के तसेच विविध मूल्यांच्या नोटांमध्ये ठेवलेली ४० हजार रुपयांची रोकड असा एकूण ५५ हजार रुपयांचा मुद्देमाल चोरून नेला.

## दुबईत 'झाडाला पिकलाय आंबा' गाण्याची क्रेझ, मराठमोळा संगीतकार सागर पाटिलचं मराठी गाणं ट्रेंडिगला

**दुबई (दै. संध्या)**

दुबईस्थित मराठमोळा संगीतकार आणि सांस्कृतिक उद्योजक सागर पाटील (BeatXX) यांनी त्यांचे नवीन गाणे "झाडाला पिकलाय आंबा – द मँगो अँथम" नुकतेच दुबईत प्रदर्शित केले आहे. भारतीय संस्कृती, आणि संगीताचा उत्साहपूर्ण संगम असलेले हे गाणे सोशल मीडियावर प्रेक्षकांचे विशेष लक्ष वेधून घेत आहे. 'द मँगो अँथम' हे केवळ एक मनोरंजनात्मक गाणे नसून भारतीय संस्कृतीशी असलेली भावनिक नाळ आहे. विशेषतः मराठी संस्कृतीचा अभिमान आणि परदेशात राहणाऱ्या भारतीयांच्या ओळखीचे प्रतीक म्हणूनही पाहिले जात आहे. आकर्षक संगीत, लक्षवेधी व्हिज्युअल्स आणि सहज गुणगुणता येईल अशी रचना यामुळे हे गाणे तरुणांमध्ये लोकप्रिय होत आहे.



संस्कृती जपणारा कलाकार सागर पाटील हे केवळ संगीत क्षेत्रापुरते मर्यादित नसून UAE मधील मराठी आणि भारतीय संस्कृतीच्या जतनासाठी सातत्याने कार्यरत आहेत. ते प्रथा.UAE या सांस्कृतिक उपक्रमाचे संस्थापक असून या माध्यमातून त्यांनी विविध पारंपरिक कार्यक्रम आणि सांस्कृतिक कार्यशाळांचे यशस्वी आयोजन केले आहे. गणेशोत्सव, शिवजयंती, दहीहंडी, दुर्ग मोहिम यांसारख्या उपक्रमांद्वारे UAE मधील नव्या पिढीला भारतीय संस्कृती प्रत्यक्ष अनुभवण्याची संधी मिळाली आहे. त्यांच्या या कार्यामुळे अनेक मराठी आणि भारतीय कुटुंबांमध्ये सांस्कृतिक जडणघडण अधिक दृढ झाली आहे. मध्यपूर्वेत ढोल-ताशाचा जागतिक ठसा सागर पाटील यांनी मध्यपूर्वेत पारंपरिक ढोल-ताशा संस्कृतीच्या प्रसारातही महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. दुबईतील विविध मोठ्या सांस्कृतिक कार्यक्रमांमध्ये आणि आंतरराष्ट्रीय मंचांवर त्यांनी महाराष्ट्रीयन तालवाद्यांची ओळख प्रभावीपणे सादर केली आहे. संगीतकार सागर पाटील त्यांच्या संगीत प्रवासाविषयी सांगतात, "'BeatXX' या कलाकार नावाखाली मी स्वतःची स्वतंत्र आणि वेगळी संगीतशैली निर्माण केली आहे. मी संपूर्ण आखाती देश म्हणजेच मिडल ईस्ट देशात पहिल मराठी ढोल ताशा पथक सुरू केलं. त्यासाठी मला नुकताच महाराष्ट्र शासनाकडून "मराठी भाषा सन्मान" पुरस्कार मिळाला आहे. भावना, कथा आणि सांस्कृतिक संदर्भ यांचा आधुनिक संगीताशी केलेला संगम यामुळे संगीताची खास ओळख ठरली आहे.



## मंगलप्रभात लोढांनी दिली दहशतवाद व हिंसाचार विरोधी दिनाची शपथ

**मुंबई (दै. संध्या)**

माजी पंतप्रधान राजीव गांधी यांच्या पुण्यतिथीनिमित्त दहशतवाद व हिंसाचार विरोधी दिनानिमित्ताने मंत्रालयात कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नावीन्यतामंत्री मंगलप्रभात लोढा यांनी राजीव गांधी यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण केला. तसेच मंत्रालयातील अधिकारी, कर्मचाऱ्यांना दहशतवाद व हिंसाचार विरोधी दिनाची शपथ दिली.

यावेळी सामान्य प्रशासन विभागाचे अवर सचिव रामदास कोळेकर, कार्यासन अधिकारी सुरेश उतेकर, सहाय्यक कक्ष अधिकारी राजेंद्र बच्छाव, अमोल चव्हाण, विजय शिंदे यांच्यासह मंत्रालयातील अधिकारी कर्मचारी उपस्थित होते.

# एअरबीएनबीवर आता होमस्टेव्यतिरिक्त कार रेंटल्स, किराणा मालाची घरपोच सेवा, विमानतळ पिकअप, आणि बरेच काही

**पुणे (दै. संध्या)**

आम्ही मागील वर्षी 'एअरबीएनबी एक्सपीरियन्सेस' आणि 'एअरबीएनबी सर्व्हिसेस' सुरू करून एअरबीएनबीचा विस्तार घरांपलीकडे केला. त्याचा भाग म्हणून तुम्ही प्रथमच एअरबीएनबीवर राहण्यासाठी जागा बुक करू शकत होता, एखाद्या स्थानिक व्यक्तीसोबत शहर फिरू शकत होता आणि खासगी शेफकडून रात्रीचे जेवण बनवून घेऊ शकत होता. तेव्हापासून, जगभरातील लाखो लोकांनी याचा अनुभव घेतला आहे.

एअरबीएनबीचे सह-संस्थापक आणि सीईओ ब्रायन चेस्की म्हणाले. प्रवास केवळ सोयीस्कर नसावा, तर तो अर्थपूर्ण असावा. सर्वोत्तम सहली तुम्हाला नवीन गोष्टी शोधायला, शिकायला आणि एक समृद्ध अनुभव घेऊन घरी परतायला मदत करतात. एअरबीएनबीमध्ये आम्ही हे घडवत आहोत आणि या उन्हाळ्यात आम्ही लोकांना हे साध्य करण्याचे इतर अनेक मार्ग देत आहोत — राहण्याच्या अप्रतिम जागा आणि एअरबीएनबीसारखा अनुभव देणाऱ्या बुटीक हॉटेल्सपासून ते अविस्मरणीय विश्वचषक अनुभव आणि तुमचा प्रवास अधिक सोपा करणाऱ्या सेवांपर्यंत बरेच काही उपलब्ध आहे.

तुमचा उत्तम मुक्काम तुम्ही चेक-इन करण्याच्या आधीच सुरू होतो. त्यामुळेच आम्ही विमानातून उतरल्याच्या क्षणापासून ते निघेपर्यंतच्या क्षणापर्यंत तुमच्या प्रवासाच्या प्रत्येक टप्प्यासाठी नवीन सेवा देत आहोत. यंदा प्रवाशांना एअरबीएनबीवर बुक करता येतील अशा नवीन सेवांची ही केवळ सुरुवात आहे.

किराणा सामानाची डिलिव्हरी - तुम्ही प्रवासादरम्यान एअरबीएनबीवर किराणा सामानाची ऑर्डर स्वीकारून तुम्ही चेक-इन करण्यापूर्वीच सर्व सामान घरपोच होते . एअरबीएनबी पाहुण्यांना शून्य डिलिव्हरी आणि ५० डॉलर्स किंवा त्याहून अधिकच्या ऑर्डरवर १० डॉलर्सची सूट मिळते. इन्स्टाकार्टसोबत भागीदारीत अमेरिकेतील २५ हून अधिक शहरांमध्ये उपलब्ध.

विमानतळ पिकअप - वेलकम पिकअप्सद्वारे तुमच्या एअरबीएनबीवरून येण्या-जाण्यासाठी खाजगी कार सेवा बुक करता येईल. एअरबीएनबी पाहुण्यांना प्रत्येक राइडवर २० टक्के सूट मिळते. आता जगभरातील १६० हून अधिक शहरांमध्ये उपलब्ध आहे.

सामान ठेवण्याची सोय - बाऊन्ससोबतच्या आमच्या भागीदारीद्वारे चेक-इन करण्यापूर्वी किंवा चेक-आउट केल्यानंतर तुमच्या बॅग्स ठेवून ॲपमध्ये जवळपासची ड्रॉप-ऑफ ठिकाणे पाहणे एअरबीएनबीच्या गेस्टना १५ टक्के सूट आणि १७५ शहरांमधील १५,००० हून अधिक ठिकाणांवर प्रवेश मिळतो.

कार रेंटल्स- एअरबीएनबीचे जवळपास एक चतुर्थांश पाहुणे त्यांच्या मुक्कामादरम्यान गाडी भाड्याने घेतात. तुम्ही एअरबीएनबीवर पहिल्यांदा गाडी भाड्याने घ्याल, तेव्हा तुम्हाला तुमच्या पुढील मुक्कामासाठी, अनुभवासाठी किंवा निवडक सेवांसाठी २० टक्के रकमेचा परतावा मिळेल.

पाहुण्यांना एअरबीएनबी अनुभव खूप आवडतात. त्यामुळे ते त्यांना सरासरी ५ पैकी ४.९३ स्टार्स देतात. या उन्हाळ्यात आम्ही प्रवाशांना सर्वाधिक आवडणाऱ्या श्रेणींमध्ये - जसे प्रेक्षणीय स्थळे, खाद्यसंस्कृती आणि कार्यक्रम - स्थानिक तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाखाली हजारो अधिक अनुभव जोडत आहोत.

एअरबीएनबीच्या खास शैलीत पाहा ऐतिहासिक स्थळे – ७५ टक्के पेक्षा जास्त प्रवासी नवीन शहरात प्रवास करताना एखाद्या ऐतिहासिक स्थळाला भेट देतात. आता तुम्ही जगातील सर्वात प्रसिद्ध ठिकाणे, त्या ठिकाणांची इत्थंभूत माहिती असलेल्या स्थानिक तज्ज्ञांसोबत पाहू शकता.

खाद्यसंस्कृती - आम्ही २,५०० हून अधिक खाद्यसंस्कृतीचे अनुभव देत आहोत, जे तुम्हाला एखाद्या ठिकाणाची ओळख निर्माण करणाऱ्या शेफ, बाजारपेठा आणि खाद्यपदार्थांच्या पडद्यामागील गोष्टी पाहण्याची संधी देतात. शेफ्स टेबल आणि ग्रँड सेंट्रल मार्केटसोबतच्या भागीदारीत तुम्ही रोममधील मिशेलिन-तारांकित 'पास्कुची अल पोर्टिसिओलो'चे शेफ जियानफ्रँको पास्कुची यांच्यासोबत ६-कोर्स फूड आणि वाइन पेअरिंगच्या अनुभवात सामील होऊ शकता, किंवा पॅरिसमधील जगातील सर्वोत्तम बारपैकी एक असलेल्या 'डी वी'मध्ये कॉकटेल्स बनवू शकता.

फिफा विश्वचषक २०२६ - आम्ही सहा यजमान शहरांमध्ये फिफा विश्वचषकाचे अनुभव देत आहोत. अमेरिका विरुद्ध ऑस्ट्रेलियाचा सामना पाहण्यासाठी विश्वचषक विजेत्या ॲबी वामबॅक आणि ज्युली फाउडी यांच्यासोबत लॉस एंजेलिसमध्ये एका खास वॉच पार्टीमध्ये सामील व्हा. किंवा अर्जेंटिनाचे फुटबॉल आयकॉन आणि इंटर मियामीचे माजी व्यवस्थापक, हॅवियर माशेरानो यांच्यासोबत प्रशिक्षण घेण्यासाठी मैदानावर उतरा.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### रेनवडीच्या बंधाऱ्याचे दुरुस्ती झाल्याने शेतकऱ्यांमध्ये समाधान

नारायणगाव (दैनिक संध्या) : जुन्नर तालुक्यातील पिंपरी कावळ येथीलकुकडी नदीवरील रेनवडी कोल्हापूर बंधाऱ्याची रेलिंग तुटली होती. त्यामुळे या बंधाऱ्यावर अपघातदेखील झाले होते. त्यासंदर्भात पुणे जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष पांडुरंग पवार यांनी महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास मंडळाचे कार्यकारी संचालक हनुमंत गुणाले, कुकडी पाटबंधारे विभागाचे कार्यकारी अभियंता प्रशांत कडूसकर, पुणे परीमंडळ अधिकारी वैशाली नारकर यांच्याकडे या कोल्हापूर बंधाऱ्याची दुरुस्तीबाबत निवेदनाद्वारे मागणी केली होती. पवार यांनी या बंधाऱ्याच्या संदर्भात सतत पाठपुरावा केल्यामुळे त्यांच्या मागणीला यश आले असून रेनवडी या बंधाऱ्यासह अजून तीन बंधारे दुरुस्तीसाठी 34 लाख रुपयांचा निधी मंजूर झाला आहे. जुन्नर व पारनेर तालुक्यातील रेनवडी व पिंपरी कावळ दरम्यान कुकडी नदीवर सन 1995 च्या दरम्यान कोल्हापूर पद्धतीचा हा बंधारा बांधण्यात आला होता. अनेक वर्षांचा बंधारा, झाल्यामुळे दोन्ही काठचा भरावा वाहून गेला होता. तसेच पुलावरील रेलिंग सुद्धा तुटले होते. आता या पुलाला रेलिंग बसवली असून काँक्रीटीकरणाचे काम पूर्ण झाले आहे.या कोल्हापूर बंधाऱ्यामुळे पिंपरी कावळ, पारगाव तर्फे आळे, मंगरूळ, रेनवडी तसेच परिसरातील गावातील शेतकऱ्यांना सिंचनाचा लाभ होत आहे.




### श्रीक्षेत्र आळंदी नगरीत अधिकमासानिमित्त आध्यात्माची पर्वणी

आळंदी (दैनिक संध्या) : अधिकमासानिमित्त श्रीक्षेत्र आळंदी नगरीत सध्या भक्ती, नामस्मरण आणि आध्यात्माची पर्वणी अनुभवायला मिळत आहे. शहरातील विविध मंदिरे, मठ, धर्मशाळा आणि भक्तनिवासांमध्ये अखंड हरिनाम सप्ताह, भागवत कथा, कीर्तन, प्रवचन, सत्संग आणि भजन कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असून संपूर्ण परिसर हरिनामाच्या गजराने दुमदुमून गेला आहे. अधिकमासाला हिंदू धर्मात विशेष धार्मिक महत्त्व असल्याने राज्याच्या विविध भागांतून मोठ्या संख्येने भाविक आळंदीत दाखल होत आहेत. पहाटेच्या काकडा आरतीपासून रात्री उशिरापर्यंत विविध धार्मिक कार्यक्रम सुरू असल्याने शहरात भक्तिमय वातावरण निर्माण झाले आहे. संत साहित्य, अभंग, गवळणी आणि हरिपाठाच्या माध्यमातून भाविकांना अध्यात्माची अनुभूती मिळत आहे. शहरातील प्रमुख माऊली मंदिरांमध्ये दररोज प्रवचनकार, कीर्तनकार आणि हभप मंडळींची सेवा सुरू असून भागवत धर्म, संत परंपरा आणि नामस्मरणाचे महत्त्व यावर मार्गदर्शन केले जात आहे. अनेक ठिकाणी महिलांसाठी भजन मंडळे, युवकांसाठी हरिपाठ आणि सामूहिक नामजपाचे उपक्रमही राबविण्यात येत आहेत.




### बेकायदेशीर झाड कत्तलीविरोधात रिपब्लिकन आझाद सेनेचे बेमुदत धरणे आंदोलन

पुणे (दैनिक संध्या) : मार्केटयार्ड येथील कृषी उत्पन्न बाजार समितीच्या परिसरामध्ये बेकायदेशीरपणे झाडांच्या फांद्या कापून, झाडांची कत्तल करणाऱ्या संबंधितांवर तात्काळ कठोर कारवाई करण्यात यावी, या मागणीसाठी रिपब्लिकन आझाद सेनेच्या वतीने बिबेवाडी क्षेत्रीय कार्यालयासमोर बेमुदत धरणे आंदोलन करण्यात आले. या आंदोलनादरम्यान रिपब्लिकन आझाद सेनेच्या शिष्टमंडळाने बिबेवाडी क्षेत्रीय कार्यालयाच्या सहाय्यक आयुक्त श्रीमती शीतल वाकडे यांची भेट घेऊन त्यांना मागण्यांचे निवेदन सादर केले. मार्केटयार्ड सारख्या गजबजलेल्या भागात पर्यावरणपूरक झाडांची अशा प्रकारे बेकायदेशीरपणे कत्तल करणे अत्यंत गंभीर असून, दोषींवर प्रशासनाने त्वरित कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी संघटनेच्या वतीने करण्यात आली आहे. रिपब्लिकन आझाद सेनेचे संस्थापक अध्यक्ष अजय भाऊ शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या या आंदोलनात पुणे शहराध्यक्ष दत्ता कांबळे, पश्चिम महाराष्ट्र महिला अध्यक्षा शीला उपाध्ये, पश्चिम महाराष्ट्र उपाध्यक्ष रवींद्र कुचेकर आणि पुणे जिल्हा कार्याध्यक्ष संजय खंडागळे प्रामुख्याने सहभागी झाले होते. याशिवाय आंदोलनात हिरा कांबळे, संदीप चव्हाण, महादेव कांबळे, आकाश शिंदे, सचिन कदम, राहुल शेळके, नागेश शिंदे, भावेश कांबळे, रुपेश चव्हाण, आदित्य कांबळे, निलेश शिंदे, ऋषिकेश कांबळे, गणेश शिंदे, श्रेयश कांबळे, समर्थ शिंदे, रुद्र कांबळे, रोहित कांबळे, अर्जुन धनवाल, सक्षम कुचेकर आदी पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### हॉटेल चालविणाऱ्या महिलेच्या पतीवर प्राणघातक हल्ला

चाकण (दैनिक संध्या) : हॉटेल चालविणाऱ्या महिलेच्या पतीवर काचेच्या बाटलीने गंभीर वार केल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. हॉटेलमध्ये येऊन कारण नसताना शिवीगाळ व दमदाटी करणाऱ्या ग्राहकांना संबंधित महिलेने बाहेर जाण्यास सांगितल्याचा राग आल्याने सोमवारी ही घटना घडली. ममता योगेश कोळेकर (वय २८, रा. करंजविहीरे, ता. खेड ) यांनी याप्रकरणी उत्तर महाळुंगे इंगळे एमआयडीसी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली. महाळुंगे पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, शांताराम धोंडीबा नवले (वय ४१) व दिनेश ज्ञानेश्वर जाधव (वय ३९) यांच्या विरोधात महाळुंगे पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करून त्यांना अटक करण्यात आली. अधिक माहिती अशी की, खेड तालुक्याच्या पश्चिम पट्ट्यातील करंजविहीरे येथे साई सिद्धी या नावाचे हॉटेल आहे.

# प्रियांका पवारांची सहाय्यक पोलीस निरीक्षकपदावर बढती

जेजुरी (दै. संध्या)

महाराष्ट्र पोलीस दलातील संवेदनशील प्रकरणे हाताळणाऱ्या कर्तव्यदक्ष पोलीस उपनिरीक्षक म्हणून ओळख निर्माण करत, सामाजिक भान, महिलांप्रती संवेदनशीलता आणि गुन्हे तपासातील कार्यक्षमतेमुळे विशेष ठसा निर्माण करणाऱ्या पोलीस उपनिरीक्षक श्रीमती प्रियांका पवार-वांजळे यांची सहाय्यक पोलीस निरीक्षक पदी नियुक्ती झाली आहे. महिला विषय महत्त्वाचे गंभीर गुन्हे तपास, नागरिकांची सुरक्षा व समुपदेशन तसेच तपासातील कार्याची दखल पुणे पोलीस दलात त्यांचा गौरव करण्यात आला आहे.

प्रियांका पवार या मूळच्या पुणे जिल्ह्यातील अहिरे गावच्या असून त्यांचे सासर लातूर येथे आहे. त्यांनी पुण्यातील महर्षी कर्वे स्त्री शिक्षण संस्था येथे एम.ए. पर्यंत शिक्षण पूर्ण केले. त्यानंतर त्यांनी एमपीएससी परीक्षा उत्तीर्ण होऊन महाराष्ट्र पोलीस दलात २०१५ रोजी रुजू झाल्या आहेत. सन २०१५ ते २०१६ या कालावधीत त्यांनी महाराष्ट्र पोलीस अकॅडमी येथे एक वर्षाचे प्रशिक्षण पूर्ण केले. प्रशिक्षणानंतर सन २०१६ ते २०२१ या काळात मुंबई पोलीस आयुक्तालयांतर्गत शिवाजी पार्क पोलीस स्टेशन, दादर विभाग तसेच शाहूनगर पोलीस स्टेशन, धारावी विभाग येथे त्यांनी जबाबदारीने कर्तव्य बजावले. यानंतर सन २०२१ ते २०२४ दरम्यान लोणीकंद पोलीस स्टेशन व



येरवडा पोलीस स्टेशन येथे कार्यरत असताना त्यांनी महिलांवरील अत्याचार, लहान मुलांवरील गुन्हे, कौटुंबिक वाद यांसारख्या संवेदनशील प्रकरणांमध्ये प्रभावी तपास व समुपदेशनाचे काम केले. अनेक तणावग्रस्त कुटुंबांमध्ये संवाद घडवून आणत कुटुंब संस्था टिकवण्यासाठी त्यांनी प्रयत्न केले. तसेच मानसिक विकलांग व अनाथ बालकांना सामाजिक संस्थांमध्ये प्रवेश मिळवून देण्यासाठीही त्यांनी पुढाकार घेतला. सोशल मीडियाच्या वाढत्या प्रभावाच्या पार्श्वभूमीवर शाळा महाविद्यालयांमध्ये जाऊन विद्यार्थ्यांना सायबर सुरक्षितता, सोशल मीडिया वापरातील धोके आणि कायदेशीर बाबींविषयी मार्गदर्शन करण्याचे कामही त्यांनी सातत्याने केले आहे. सामाजिक कार्याची आवड असल्याने सातत्याने समाजातील विविध घटकातील लोकांशी संवाद साधत होत्या. वेगवेगळ्या माध्यमातून समाजाच्या प्रत्येक घटकापर्यंत मदत करण्याचा त्यांनी त्यांच्या कार्यक्षेत्रामध्ये प्रयत्न केला आहे. सध्या सन २०२४ ते २०२६ या कालावधीत त्या सी आय डी पुणे ग्रामीण येथे कार्यरत असून विविध गुन्ह्यांच्या तपासात योगदान देत आहेत. सामान्य कुटुंब असलेली पार्श्वभूमी असताना खडतर प्रयत्नांतून तसेच सामाजिक संघर्षातून त्यांनी प्रतिकूल परिस्थितीवर मात करत यशाची पायरी गाठली आहे. कर्तव्यनिष्ठा, सामाजिक जाणीव आणि संवेदनशीलपण जपणारे पोलीस अधिकारी म्हणून प्रियांका पवार यांचे कार्य अनेकांसाठी प्रेरणादायी ठरत आहे.

## बालकांवर अत्याचार करणाऱ्या नराधमांना फाशी द्या; जयश्री ताटे यांची मागणी


चाकण (दै. संध्या)

अल्पवयीन मुलाने अवघ्या तीन वर्षांच्या मुलावर अनैसर्गिक अत्याचार करून गळा चिरून खून केल्याचा धक्कादायक प्रकार खेड तालुक्यातील खालुंब्रे येथे उघडकीस आला. नसरापूर येथे सुट्टीसाठी आलेल्या चिमुकलीवर अत्याचार करून निघरून खून झाला. तसेच हिंजवडी येथे एका उच्चभ्रू सोसायटी मधील एका सुरक्षारक्षकाने नऊ वर्षीय मुलीसोबत अश्लील चाळे केल्याच्या संतापजनक घटनांच्या निषेधार्थ खेड तालुक्यात संतप्त प्रतिक्रिया उमटल्या आहेत. संबंधित नराधमांना तात्काळ फाशीची शिक्षा देण्यात यावी, अशी जोरदार मागणी भापसे पार्टीच्या महिला आघाडीच्या प्रदेशाध्यक्षा जयश्री ताटे यांनी केली आहे. खालुंब्रे येथे तीन वर्षाच्या बालकावर अमानुष अत्याचार करून हत्या करण्यात आल्याची घटना घडली. तसेच नसरापूर येथे एका चिमुकल्या मुलीवर अत्याचार करून खून करण्यात आला. त्यामुळे या

परिसरात तीव्र संतापाची लाट उसळली आहे. माणुसकीला काळीमा फासणाऱ्या अशा प्रकारच्या अमानुष गुन्ह्यांवर आळा बसविण्यासाठी नराधमांना कोणतीही दया न दाखवता तात्काळ कठोर शिक्षा देण्यात यावी, अशी ठाम भूमिका जयश्री ताटे व भाग्यश्री ताटे यांनी घेतली आहे. अशा धक्कादायक घटना रोखण्यासाठी राज्य शासनाने कायद्यात अधिक कठोर तरतुदी करून स्वतंत्र कायदा लागू करण्याची गरज आहे.

गंभीर गुन्ह्यांमध्ये तातडीने आणि कठोर शिक्षा झाली तरच समाजात कायद्याबद्दल विश्वास निर्माण होईल. अन्यथा भीतीचे वातावरण वाढण्याची शक्यता आहे. शासनाने अशा धक्कादायक प्रकरणाची गांभीर्याने दखल घेऊन त्यावर तातडीने कारवाई केली पाहिजे, असे जयश्री ताटे यांनी सांगितले.

## जेजुरी गड हिरवाई ने नटला



महाराष्ट्राचे कुलदैवत असणाऱ्या खंडोबा देवाचा जेजुरी गड गुलमोहर आणि इतर वृक्षांनी बहरला असून जेजुरीच्या होळकर तलवा काठा वरून छायाचित्रकार महेश शिंदे यांनी जेजुरी गडाचे विलोभनीय दृश्य आपल्या कॅमेरात टिपले आहे.

## माजी आमदार दिप्ती चवधरींनी स्विकारला पुणे शहर जिल्हा काँग्रेस कमिटी (पश्चिम विभाग) च्या अध्यक्षपदाचा पदभार

पुणे (दै. संध्या)

पुणे शहर जिल्हा काँग्रेस कमिटी (पश्चिम विभाग) च्या अध्यक्ष पदाचा पदभार माजी अध्यक्ष अरविंद शिंदे यांच्या कडून दिप्तीताई चवधरी यांनी काँग्रेस भवन येथे पक्षाच्या प्रमुख पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीमध्ये स्विकारला.

अखिल भारतीय काँग्रेस कमिटीचे सरचिटणीस मा. के. सी. वेणूगोपाल यांच्या आदेशाने व महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष मा. हर्षवर्धन सपकाळ यांच्या मान्यतेने माजी आमदार मा. दिप्तीताई चवधरी यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

आज काँग्रेस भवन येथे पार पडलेल्या पदभार स्विकारण्याच्या कार्यक्रमामध्ये बोलताना अरविंद शिंदे म्हणाले की, “माझ्या सारख्या कार्यकर्त्याला काँग्रेस पक्षाने पुण्यासारख्या शहराचे अध्यक्ष पद दिले ही माझ्या आयुष्यातील खुप मोठी गोष्ट आहे. अध्यक्ष असताना शहरातील निष्ठावान व सर्वसामान्य



कार्यकर्त्यांना घेवून व पदाधिकारी व नगरसेवकांना विचारात घेवून पक्षाचे काम गेली ४ वर्ष मी प्रामाणिकपणे केले काँग्रेस पक्षाच्या नगरसेवकांची संख्या वाढविली. यावेळी अनेक ज्ञात - अज्ञात कार्यकर्त्यांनी व नेत्यांनी सहकार्य केले त्यामुळे मी पक्षाची धुरा सांभाळू शकलो.”

नवनिर्वाचित अध्यक्ष दिप्ती चवधरी यावेळी म्हणाल्या की, “काँग्रेस पक्षाचे काम करीत असताना एक काँग्रेसची कार्यकर्ती ते पुणे शहर जिल्हा काँग्रेस कमिटीची अध्यक्ष या प्रवासामध्ये अनेकांनी मला साथ दिली. पक्षाचे प्रामाणिकपणे केलेल्या कामाचे फळ आज अध्यक्ष पदाच्या रूपाने मला मिळाले. यामागे प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष मा. हर्षवर्धन सपकाळ, महाराष्ट्राचे प्रभारी, मा. रमेश चेन्नीथला, मा. सतेज उर्फ बंटी पाटील, निरिक्षक मा. विनोद सुलतानपुरी व पुणे शहर काँग्रेसचे वरिष्ठ नेते व कार्यकर्ते यांच्या सहकार्याने काँग्रेस पक्षाच्या हिताचे काम मी करेन. त्याचबरोबर येणाऱ्या काळात काँग्रेस पक्षाला उर्जा प्राप्त करण्यासाठी सर्व सामान्य कार्यकर्ते व नेते यांच्या विचारांची काँग्रेस करण्याचा प्रयत्न करेन.”

यानंतर पुणे शहर काँग्रेस सेवादल अध्यक्ष लतेंद्र भिंगारे व पुणे शहर काँग्रेस ज्येष्ठ नागरिक संघाचे अध्यक्ष द. स. पोळेकर यांनी दिप्तीताईंचा सत्कार करून त्यांना पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या.

यावेळी नगरसेवक रफिक शेख, सुनिल शिंदे, माजी नगरसेवक अजित दरेकर, मेहबुब नदाफ, चंद्रशेखर कपोते, राजेंद्र भुतडा, बाळासाहेब अमराळे, प्राची दुधाने, राजाभाऊ कदम, सेवादल प्रमुख लतेंद्र भिंगारे, अजिज सय्यद, सोशल मिडीया अध्यक्ष गुलाम हुसेन खान, सुरेश नांगरे, फिरोज शेख, मुन्ना खंडेलवाल, ऋग्वेदिता सपकाळ, हर्षद हांडे, वैभव डांगमाळी, ॲड. ताम्हणकर विनोद चौरे, नितीन वायदंडे, कुशल चव्हाण, गणेश साळुंके, राजू बजेरी, राजेश जाधव, भारत पवार, राहुल वंजारी, बबन गोल्डे, स्नेहा रेणूसे, अन्वर पठाण, सुंदर ओव्हाळ, विकास कांबळे, अन्वर शेख, महेश पवार, विक्रम शहाणे, विजय सरोदे, सेल्वराज ॲन्थोनी, विल्सन मॅसी, भोला वांजळे, गणेश गुगळे आदी उपस्थित होते.

## पुणे महापालिकेत 71 स्वच्छता कर्मचाऱ्यांवर चौकशीचे आदेश

पुणे (दै. संध्या)

महापालिकेच्या स्वच्छता विभागातील कर्मचाऱ्यांची उपस्थिती आणि कामकाजावर पुन्हा एकदा गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. ‘पगार एका विभागातून आणि काम दुसऱ्या ठिकाणी’ अशा प्रकारामुळे शहरातील स्वच्छता व्यवस्थेवर परिणाम होत असल्याचा आरोप राष्ट्रवादी काँग्रेसचे नगरसेवक दत्ता बहिरट यांनी महापालिकेच्या मुख्य सभेत केला. याप्रकरणी 71 स्वच्छता कर्मचाऱ्यांबाबत चौकशीचे आदेश देण्यात आले आहेत.

महापालिकेच्या सोमवारी झालेल्या मुख्य सभेत बहिरट यांनी पॉइंट ऑफ इन्फर्मेशनद्वारे घोले रोड क्षेत्रीय कार्यालयाच्या अखत्यारीतील 71 कर्मचाऱ्यांची यादी सादर केली. संबंधित कर्मचाऱ्यांचा पगार घोले रोड क्षेत्रीय कार्यालयातून होत असला, तरी ते प्रत्यक्षात इतर क्षेत्रीय कार्यालयांच्या हद्दीत काम करीत असल्याचा गंभीर आरोप त्यांनी केला. बहिरट यांनी सभागृहात सांगितले की, घोले रोड परिसरात नियमित साफसफाई होत नसल्यामुळे अनेक भागांत घाणीचे साम्राज्य निर्माण झाले आहे.

प्रशासनाकडून कर्मचाऱ्यांची कमतरता असल्याचे कारण दिले जाते. मात्र, प्रत्यक्षात उपलब्ध कर्मचारी इतरत्र कार्यरत असल्याचे समोर आले आहे. त्यामुळे मूळ विभागातील मनुष्य बळावर अतिरिक्त ताण पडत आहे. याप्रकरणी संबंधित कर्मचाऱ्यांना इतरत्र काम करण्याची परवानगी कोणी दिली? त्यामागचे कारण काय होते? अधिकृत आदेश होते का? तसेच परवानगी नसल्यास जबाबदार अधिकाऱ्यांवर काय कारवाई होणार? असे सवालही बहिरट यांनी उपस्थित केले. याशिवाय रिक्त जागांसाठी बदली कर्मचारी का उपलब्ध करून दिले नाहीत? याचाही जाब त्यांनी प्रशासनाला विचारला.

# 'दगडूशेठ'च्या जय गणेश पालकत्व योजनेतील विद्यार्थ्यांची परीक्षेत उत्तम कामगिरी

**श्रीमंत दगडूशेठ हलवाई सार्वजनिक गणपती ट्रस्ट ; अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत विद्यार्थ्यांनी मिळवले यश**

पुणे (दै. संध्या)

श्रीमंत दगडूशेठ हलवाई सार्वजनिक गणपती ट्रस्ट, सुवर्णयुग तरुण मंडळतर्फे सुरु असलेल्या जय गणेश पालकत्व योजनेतील विद्यार्थ्यांनी इयत्ता १० वी - १२ वी च्या परीक्षेत उत्तम कामगिरी केली. योजनेतील ११ विद्यार्थ्यांनी दहावी आणि २३ विद्यार्थ्यांनी बारावीच्या परीक्षेत यश संपादन केले आहे. ट्रस्टने शैक्षणिक साहित्यासह इतरही गोष्टींच्या माध्यमातून दिलेल्या मदतीमुळे आणि गणरायाच्या आशिर्वादामुळे हे शक्य झाल्याची भावना विद्यार्थ्यांनी व्यक्त केली. योजनेतील अनेक विद्यार्थ्यांची आई ही घरकाम करते, कोणाचे वडील पेंटिंग करतात, कोण कारखान्यात काम करतात तर कोण बिगारी काम करतात. अशा घरच्या अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत या विद्यार्थ्यांनी हे यश मिळविले आहे.








मॉडर्न गर्ल्स हायस्कूलमध्ये शिकणारी समीक्षा भोसले ही विद्यार्थीनी ९४.४० टक्के गुण मिळवित योजनेंतर्गत प्रथम आली आहे. समीक्षा भोसले हिला मर्चंट नेव्ही मध्ये करिअर करण्याची इच्छा आहे. समीक्षा चे वडील हयात नाहीत तर आई स्वयंपाकाची काम करते. तरी देखील प्रतिकूल परिस्थितीत तिने यश मिळविले आहे.

मॉडर्न हायस्कूलमधील आदित्य दहिवलीकर हा ८६.६० टक्के गुण मिळवित द्वितीय आला असून त्याला भविष्यात पीएसआय व्हायचे आहे. तर, नूतन बालविकास मंदिर शाळेतील मृणाली सावंत हिने ८२.२० टक्के मिळवित तृतीय क्रमांक पटकाविला आहे. तिचे वडील बिगारी काम करतात. याशिवाय राधिका जाधव, ओंकार खळे, आदित्य मूर्टे, साईराज जाधव, अस्मय विधाते, किरण म्हेत्रे, हर्षदा गुजले, मंजुनाथ नवटक्के या विद्यार्थ्यांनी देखील उत्तम यश मिळविले आहे.

इयत्ता बारावीच्या परीक्षेत मराठवाडा मित्र मंडळ कॉलेज ऑफ कॉमर्समधील श्रुतिका होडे हिने कॉमर्स विभागातून ८३.१७ टक्के गुण मिळवित योजनेत प्रथम क्रमांक मिळविला आहे. तिला सीएमए होण्याची इच्छा असून त्याकरिता ती मेहनत घेत आहे. स.प.महाविद्यालयातील समृद्धी शिंदे हिने सायन्स विभागातून ८१.१७ टक्के गुण मिळवित योजनेत प्रथम क्रमांक पटकाविला. तिला डाटा ॲनेलिस्ट क्षेत्रात करिअर करायचे आहे. समृद्धी शिंदेचे वडील ड्रायव्हर असून घरची परिस्थिती बेताची आहे.

याशिवाय बारावीमध्ये आर्यन काशिद, प्रतिक्षा भालेराव, अथर्व शिंदे, शिवाजी ढेबे, रोहन चोरडिया, सिद्धेश अडसूळ, पवन पोहनकर, साई जाधव, प्राची आलाटे, रेहान जमादार, स्नेहा तुरे, गौरी कांबळे, प्रिया लादे, साईराज माळोदे, अथर्व भुवड, श्रुती जगताप, दिव्या निवळकर, पूर्वा उपळकर, शुभम मुंडे, विक्रांत कळबंडे, वैष्णवी राऊत यांनी यश संपादन केले आहे. ट्रस्टचे अध्यक्ष सुनील रासने व सर्व विश्वस्तांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले असून भविष्यातील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.